साहित्य संमेलनें आणि साहित्यिक प्रश्न





डॉ. दु. का. सन्त

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें

साहित्य संमेलनें
आणि
साहित्यिक प्रश्न

डॉ. द्रु. का. संत यांचीं प्रमुख पुस्तकें—

★ साहित्य आणि संस्कृति

★ मराठी स्त्री

[या दोनहि पुस्तकांस मुंबई विद्यापीठाचें त्या त्या वर्षाचें तर्खड पारितोषिक मिळालें आहे.]

★ कला-नीति-वाद

★ केशवसुत (काव्यदर्शन)

[हीं पुस्तकें प्रा. स. रा. गाडगीळ यांच्या सहकार्यानें लिहिलीं आहेत.]

★ साहित्य संमेलनें आणि साहित्यिक प्रश्न

साहित्य संमेलनें
आणि
साहित्यिक प्रश्न

: लेखक :

डॉ. दु. का. संत

संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.

विद्वान् सर्वत्र पूज्यते

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणें २

वैशाख, १८८२] [मे, १९६०

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

प्रसिद्धि :
मराठी साहित्य संमेलन
मे १९६० ठाणें.

लेखक :
डॉ. दु. का. संत
प्रथममुद्रण, वैशाख १८८२
किंमत तीन रुपये पन्नास नये पैसे

प्रकाशक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
लोकसंग्रह छापखान्यासाठीं
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २

मराठी साहित्य संमेलनांच्या
सर्व अध्यक्ष महोदयांना

आदरपूर्वक—

धन्यवाद

आज कांही नाही तरी चाळिसांवर साहित्यसंमेलनें होऊन गेलीं आहेत. आरंभी आरंभी साहित्य संमेलनदरवर्षी होत नसे (त्यांना साहित्य-संमेलन हें नांवहि नव्हतें) हें लक्षांत घेतल्यास या संमेलनांचा अितिहास अैशी वर्षांवर पसरलेला आहे. या संमेलनांनी आपण काय साधलें किंवा साधतों याचा विचार अधूनमधून करणें हें साहजिकच अुद्बोधक आणि म्हणून अुपयुक्त असतें. डॉ. दु. का. संत यांचा हा अेक आवडीचा विषय आहे असें म्हणावयास हरकत नाही. या स्वरूपाचा त्यांनी केलेला पहिला प्रयत्न १९४६ च्या महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या ७६ व ७७ या अंकांतून प्रकाशित झाला. त्यांत पहिल्यापासून म्हणजे १८७८ च्या ग्रंथकार-संमेलनापासून ते १९४१ च्या साहित्यसंमेलनापर्यंतचा काल येअून गेला होता. त्यानंतरच्या आठअेक वर्षांच्या कालाचा परामर्श त्यांनी १९५० सालीं घेतला, व नंतरच्या संमेलनांचें सिंहावलोकन ते आता करीत आहेत. या ग्रंथाच्या शेवटल्या प्रकरणांत पहिल्यापासून आजपर्यंत झालेल्या संमेलनांचा साकल्याने विचार करून त्यांचें स्वरूप आणि कार्य यांच्या भूत-भविष्याची चर्चा करून ती आपल्यापुढे त्यांनी मांडिली आहे.

साहित्यसंमेलनें हीं राजकारणापासून वेगळीं काढलीं पाहिजेत अशा प्रकारची मागणी आज जोराने पुढे येत आहे. त्याबरोबरच नवमहाराष्ट्राच्या अुभारणींत साहित्याने आणि साहित्यिकांनी भरीव कामगिरी करावयास पाहिजे अशीहि अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या दोन गोष्टी परस्पर-विभिन्न आहेत हें सांगावयास नको. ह्याचा अर्थ असा की कोणतीहि अैकान्तिक भूमिका घेअून आपलें भागणार नाही. साहित्य म्हणजे वस्तुतः ललित वाङ्मयच होय. अशा वाङ्मयाचें कार्य तें राजकारणापासून वेगळें काढून करणें हें शक्य व अिष्टहि होईल. परंतु आज आपण साहित्य हा शब्द अधिक व्यापक अर्थानें योजितों, अेवढेंच नव्हे तर त्याचें वैशिष्ट्य दाखविण्याकरिता ललित हा अनावश्यक शब्दहि त्याला लावतों. साहित्य-

संमेलनें हीं केवळ ललित-वाङ्मय-संमेलनें राहिलेलीं नसून ललितेतर वाङ्मयाचीं आणि भाषेचींहि संमेलनें असतात. या दुसऱ्या वाङ्मयाचा आणि भाषिक प्रश्नांचा संबंध सरकारी धोरण आणि आश्रय यांच्याशीहि येतो हें आपण पाहतोंच. अशा स्थितींत राजकारणापासून साहित्यसंमेलनें संपूर्णतः बाजूला काढून त्याविषयीचा व्यवहार करणें हें सुकर नाही. डॉ. संतांची विचारसरणी तर समाजवादी आहे, आणि त्यांचें म्हणणें असें आहे की वैचारिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत सरकारचें धोरण जितकें साक्षेपी असावयास पाहिजे तितकें नाही, व म्हणून त्या क्षेत्रांत फार बजबजपुरी माजली आहे. ह्या अपेक्षित साक्षेपाचा अर्थ कांहीहि होऊं शकेल, आणि अतिसाक्षेप हा शंकनीयहि ठरेल. वाङ्मयक्षेत्रांत केवळ सरकारी ' साक्षेप 'च तापदायक ठरतो असें नाही; कांही राजकीय पक्षांचाहि तितकाच, किंबहुना अधिक तापदायक ठरण्याचा संभव असतो. म्हणून साहित्य-क्षेत्रें हीं बंधनकारक ठरावांचीं क्षेत्रें न होता, मतप्रकटन, चर्चा, परिसंवाद यांना अुपकारक अशीं स्थानें होणेंच श्रेयस्कारक ठरेल. संमेलनांचें स्वरूप यापुढे बदलेल असें डॉ. संत यांनाहि वाटतें. तें बदलावयाचें असेल तर, भाषिक, वाङ्मयीन आणि साहित्यिक अशा सर्वच विषयासंबंधी स्वतंत्र व निर्भीड अशी चर्चा आणि विचार जितका अधिक साधेल तितका साधण्याच्या दृष्टीने तो बदल व्हावा अशीच अपेक्षा करणें योग्य होईल. काय होईल तें सांगणें सोपें नाही; काय झालें त्याचें निवेदन साक्षेपाने करण्याचें व्रत डॉ. संत यांनी घेतलेंच आहे. तें त्यांनी असेंच चालवावें अशी माझी त्यांना विनंती आहे. हें काम खरोखर साहित्य-संमेलन आणि तें भरविण्याची अखेरची जबाबदारी ज्या संस्थेवर आहे, त्यांनी करावयाचें आहे. डॉ. संत यांनी केलेल्या त्यांच्या कामाचें हार्दिक स्वागत त्यांनी करावयास हवें, आणि त्यास सर्वतोपरी साहाय्य करावयास पाहिजे. तें होईपर्यंत मला शक्य असणारे धन्यवाद मी त्यांना देत आहें.

पुणें
२ मे, १९६०

रा. श्री. जोग

योगायोग

मराठी साहित्य संमेलनांच्या आजपर्यंतच्या अेकेचाळीस अध्यक्षीय भाषणांचा हा अभ्यास आज वाचकापुढे सादर करण्याचा सुयोग येत आहे याबद्दल लेखकास आनंद होणें स्वाभाविक आहे. या अभ्यासाबद्दल पार्श्व-भूमिवजा थोडें लिहिणें आवश्यक आहे.

प्रस्तुत अध्ययनाचे चार विभाग केलेले आहेत. ते चार स्वतंत्र अध्याय आहेत. आपापल्या परीने प्रत्येक निबंधास थोडी अैतहासिक पृष्ठभूमि व थोडें प्रासंगिक महत्त्व आहे. त्यायोगें (निदान यापैकी पहिले दोन निबंध तरी) निरनिराळ्या काळीं लिहिलेले असले तरी ते आज त्या मूळच्याच स्वरूपांत छापलेले आहेत. त्यांत कोणता मोठा बदल न करण्याचें धोरण बुद्ध्या अवलंबिलें आहे. निदान तशी जरुरी भासली नाही.

पहिल्या निबंधाचें लेखन १९४२ सालीं झालें आहे. त्या वर्षी नाशिक येथे आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेलें त्यावेळेच्या क्रमांकानुसार सव्वीसावें अधिवेशन म्हणून साजरें झालें. त्यानंतर साहित्यपरिषदेचा अिति-हास प्रसिद्ध झाला त्यावेळीं तो वेळपर्यंत होअून गेलेल्या संमेलनांची मोजदाद झाली. १८७८ मध्ये साहित्यिकांचा पहिला मेळावा भरला त्याची दखल घेण्यांत येअून संमेलनांच्या क्रमांकांत फरक करावा असें ठरलें. व प्रत्यक्ष फरक १९४६ पासून अमलांत आलेला आहे. (अधिक खुलासा परिशिष्ट 'अ'मध्ये केलेला आहे.) सहाजिकपणें सोलापूरचें संमेलन २५ वें अधिवेशन म्हणून साजरें झालें.

सव्वीसाव्या (नाशिकच्या) संमेलनाच्या चालकांनी त्या वेळपर्यंत होअून गेलेल्या पहिल्या पंचवीस अध्यक्षीय भाषणांचा परामर्श घेणारे निबंध मागविलेले होते. * त्या वेळीं प्रस्तुत लेखकाने आपला निबंध पाठविला होता. तो पारितोषकार्ह ठरला. ह्या स्पर्धेनिमित्ताने आलेले निबंध प्रा. रा. श्री. जोग, प्रा. द. के. केळकर व प्रा. वि. ह. कुलकर्णी या परीक्षकां-

* प्रत्यक्षांत निबंधाचा विषय—“ गेल्या पंचवीस महाराष्ट्र साहित्य संमेलनांचीं अध्यक्षीय भाषणें व त्यांतून उद्भवणारे साहित्यविषयक प्रश्न ” असा होता.

कडून परीक्षिले गेले असें चालकांनी नंतर जाहीर केलें. [परीक्षकांपासून लेखकांचीं नांवें अर्थातच गुप्त ठेविलीं होतीं]. हा पहिल्या पारितोषकाचा निबंध पुढे १९४६ मध्ये प्रा. रा. श्री. जोग महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक असतांना त्यांनी मजकडून मागवून घेतला व पत्रिकेच्या दोन अंकांतून प्रसिद्ध केला. निबंधाच्या या पार्श्वभूमीमुळे हा निबंध जसाच्या तसाच येथे मुद्रित केलेला आहे. त्यांतील समकालीन अुल्लेख हे १९४२ मधले आहेत. साहित्याभ्यासकांना या धोरणाचें यथार्थत्व पटेल अशी आशा आहे.

त्यानंतरचा दुसरा निबंध १९५० मध्ये लिहिला आहे. माझे मित्र प्रा. ह. श्री. शेणोलीकर त्यावेळीं 'नवा महाराष्ट्र' नांवाचें द्वैमासिक काढीत होते. त्यांनी कवि यशवंत हे मुंबईच्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले त्या-निमित्त अेका अंकांत विशेष लेख छापले होते. त्यावेळीं मी १९४२ ते १९४९ पर्यंतच्या अध्यक्षीय भाषणांचा आढावा लिहिलेला लेख लिहिला व तो त्या अंकांत छापला गेला. तो लेख थोड्याशा (किरकोळ) फरका-निशी येथें अुद्धृत केलेला आहे. अर्थात् या निबंधांतील अुल्लेख हे १९५० मधील आहेत.

तिसऱ्या निबंधांत १९५० नंतरच्या अध्यक्षीय भाषणांचा परामर्श घेतला आहे व चवथ्या निबंधांत आतापर्यंत झालेल्या सर्व संमेलनांवर ओझरता दृष्टिक्षेप टाकून आज निर्माण झालेल्या साहित्यविषयक प्रश्नांचा अूहापोह केलेला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापन होणें हा मराठी जनतेच्या जीवनांतील भाग्याचा क्षण होय. स्वातंत्र्याची परिपूर्ति या क्षणीं साकार झाली, असें कित्येकांस वाटलें तर तें चूक नाही. या अैतिहासिक महत्त्वाच्या क्षणीं नव्या महाराष्ट्राच्या अुंबरठ्यावर उभे राहून ही साहित्यविषयक विचार व घडामोडींची केलेली मीमांसा वाङ्मयाभ्यासास परिपोषक व्हावी या अपेक्षेने हा प्रपंच केला आहे.

पंचवीस ह्या आकड्याप्रमाणे चाळीस ह्या आकड्याससुद्धा मानवी जीवनांत महत्त्व आहे. पहिला निबंध पंचवीस भाषणांचा परामर्श घेणारा होता. संमेलनाने चाळिशी गाठल्यानिमित्त हा अभ्यास गतवर्षी प्रसिद्ध करावा असें मनांत आलें होतें; पण अनेक अडचणींमुळे तें पूर्ण होअू

शकलें नाही. या वर्षी महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत येत आहे व ऐतिहासिक महत्त्वाचा हा मोका साधावा असें मनाने ठरविलें व त्या दृष्टीने हे अध्ययन पूर्ण केलें आहे.

या तीनचार निबंधांमधील भूमिका प्रायः पहिल्या निबंधांतील भूमिकेला सुसंगत अशीच आहे. अध्यक्षीय भाषणांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची मीमांसा प्रामुख्यानें केली आहे. शेवटच्या निबंधांतून मात्र थोडचा व्यापकतेचा अवलंब करून आजच्या विविध साहित्यिक प्रश्नांचा परामर्श घेतला आहे. त्या दृष्टीने विचार-विवेचनास परिपूर्णता आलेली असेल असें वाटतें. वाङ्मयाच्या अभ्यासकांना ह्या अध्ययनाचें महत्त्व पटेल अशी आशा आहे. सोबत दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. साहित्याभ्यासकांना ती नोंदहि महत्त्वाची वाटेल. संमेलनांतील ठरावांचा आढावा घेण्याचें आणखी अेक परिशिष्ट जोडण्याचें ठरविलें होतें. पण अेप्रिलपासून कॉलेजमध्ये विशेष प्रकारची जबाबदारी अंगावर येअून पडल्यामुळे तें परिशिष्ट पूर्ण होअू शकलें नाही. यदाकदाचित् दुसऱ्या आवृत्तीचा योग आला तर तें त्यावेळीं दिलें जाण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन असें आश्वासन देतों.

या निवेदनाला योगायोग हें शीर्षक देण्याचीं दोन-तीन कारणें आहेत. अध्यक्षीय निवडणूक हा वाचकांच्या व अध्यक्षाच्या दृष्टीने योगायोग नव्हे काय? विशिष्ट कालांत व विशिष्ट वर्षी विशिष्ट व्यक्तीलाच अध्यक्षपद प्राप्त व्हावें ह्यांत योगायोगाशिवाय दुसरें काय आहे? अध्यक्षाचें विचार-प्रतिपादन हेंहि त्या त्या कालाच्या—वा वर्षाच्या—गरजेप्रमाणे आकारत नाही काय? अनंत काणेकर आज अध्यक्ष झाले असते तर त्यांनी अध्यक्षीय भाषणांतून आपली भाषामहतीची मीमांसा नक्कीच केली नसती. निदान ती वेगळचा भूमिकेवरून झाली असती. जवळ जवळ प्रत्येक अध्यक्षाबाबत तसें म्हणतां येईल. अध्यक्षीय भाषण अध्यक्षास मुद्दाम लिहावें लागतें. तो लेखकच असल्याने त्याला जें कांही सांगावयाचें असतें ते सांगून झालेलें असतें. पण स्वतःचें असें कांही म्हणणें असल्यास तें आवर्जूनपणें मांडण्याची संधि त्याला अध्यक्षपदामुळें लाभते व वाचकाला त्याच्या परिणतप्रज्ञ अनुभवाचे बोल ऐकावयास मिळतात. हा दोघांच्याहि दृष्टीने योगायोगच नव्हे काय?

हें पुस्तक प्रसिद्ध होत असतांना व्यक्तिगत दृष्टीनेहि असा गमतीचा योग जमून आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रारंभकाळीं या पुस्तकाचें प्रकाशन होत आहे हा पहिला सुयोग. पहिल्या निबंधाचे अेक परीक्षक गुरुवर्य प्रा. रा. श्री. जोग हेच आज संमेलनाध्यक्ष झाले आहेत. त्यांचा आशीर्वाद ह्या पुस्तकास लाभलेला आहे हा दुसरा योगायोग. पहिला प्रबंध लिहिला तेव्हा माझें वास्तव्य ठाणें येथें होतें. आजचें अधिवेशन तेथेच भरत आहे व हें पुस्तक तेथेच प्रकाशित होत आहे. हा तिसरा सुयोग. ह्या बहुविध कारणांमुळे या निवेदनास योगायोग हें नांव देणें सुयोग्य वाटलें.

हें पुस्तक तयार होण्यांत अनेक व्यक्तींचा हातभार लागला त्या सर्वांचे व्यक्तिशः आभार मानणें शक्य नसलें, तरी प्रमुख व्यक्तींच्या बद्दलची कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्य आहे. ह्या अध्ययनास प्रस्तावनावजा चार शब्द लिहिण्याची माझी विनंति गुरु. प्रा. जोग यांनी मान्य केली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. त्यांच्याविषयीची आदरभावना व्यक्त करण्याची संधि मला लाभली याबद्दल मला आनंद वाटतो. त्यांच्या प्रस्तावनेबद्दल मला स्वतःला धन्यता वाटते.

पहिला निबंध तयार होत असतां माझें वास्तव्य ठाणें येथे होतें हा अुल्लेख वर आलेलाच आहे. त्यावेळीं निरनिराळीं भाषणें अुपलब्ध करून देणें व त्यांवर एकंदर चर्चा करणें अि. बाबतींत ठाण्याचे साहित्यिक श्री. रा. म. आठवले यांचें मला अनमोल साहाय्य झालें. त्यांचे मी ह्या ठिकाणीं मनःपूर्वक आभार मानतों. त्याचप्रमाणे त्यावेळीं निरनिराळीं भाषणें अुपलब्ध करून देण्यांत ठाणें ग्रंथसंग्रहालयाच्या चालकांचींहि बरीच मदत झाली त्यांचा मी आभारी आहें.

नंतरचा निबंध "नवा महाराष्ट्र" मध्ये प्रसिद्ध झाला. त्याबद्दल मित्र प्रा. शेणोलीकर यांचा मी उल्लेख करतो. पुस्तक तयार होत असतांना प्रा. गो. म. कुलकर्णी यांच्यांशीं चर्चा केली. त्यांनी प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्यांचा अुल्लेख करतों. आभार मानण्याअितके परकेपणाचे या मित्रवर्यांचे व माझे संबंध नाहीत; पण मनांतील कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा अुल्लेख करणें आवश्यक आहे असें वाटतें.

पहिला निबंध 'पत्रिके'मधून व नंतर पुस्तकांत समाविष्ट करून परवानगी दिल्याबद्दल १९४२ च्या नाशिकच्या साहित्य संमेलनाचे एक पदाधिकारी श्री. पु. रा. बुरकुले यांचे मी आभार मानतों. पुस्तक प्रकाशनाच्या बाबतींत माझ्या मातृसंस्थेने (पुणें अ. वि. गृह) जें साहाय्य दिलें त्याबद्दल मी चालकांचा आभारी आहें.

प्रस्तुत अध्ययनाचा साहित्य परिषदेने पुरस्कार करावा अशी मनीषा होती. तशा प्रकारचें पुरस्करण परिषदेनें करणें औचित्यपूर्णहि ठरलें असतें; पण तांत्रिक अडचणीमुळे तें जमलें नाही. ती एक रुखरुख लागली आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळावर मी गेलीं दोन वर्षें आहे. या अवधींत हें पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आल्याबद्दल मला विशेष समाधान वाटत आहे.

माझ्या अनेक मित्रांनीं सहकाऱ्यांनी, विद्यार्थी मित्रांनी निरनिराळ्या प्रकारचें साहाय्य केलें आहे त्यांचे आभार मानावयास मजजवळ शब्द नाहीत. त्यांना धन्यवाद.

शिवजयंति १८८२
संगमेश्वर कॉलेज,
सोलापूर

— दु. का. संत

प्रकाशकाचे दोन शब्द

मराठी भाषेच्या सखोल अभ्यासासाठीं स्वतंत्र विद्यापीठाची गरज अकरा वर्षापूर्वी पुणें विद्यापीठ स्थापन होऊन पूर्ण करण्यांत आली. तद्वतच राज्यकारभार प्रादेशिक भाषेंतून म्हणजे जनतेच्या बोलभाषेंतून चालावा यासाठीं मराठी भाषिक जनतेचा प्रदेश अेकत्र करून बहुसंख्य मराठी प्रदेशाचें "महाराष्ट्र राज्य" आज स्थापन होत आहे. महाराष्ट्रराज्य-स्थापनेची ही वेळ मराठी भाषेच्या व पर्यायाने साहित्य संमेलनांच्या अितिहासांत अतिशय मंगलप्रद असल्याने या प्रसंगीं आजपावेतों भरलेल्या अेकेचाळीस मराठी साहित्य संमेलनांचा—त्यांतील अुद्दिष्टांचा व विचारांचा—मागोवा घेअून त्याविषयीं अैतिहासिक, टीकात्मक वाङमयीन समीक्षण करणारा अेक ग्रंथ प्रकाशित करावा अशी प्राचार्य डॉ. दु. का. संत यांची फार अिच्छा होती. तसेंच हा ग्रंथ त्यांच्या मातृसंस्थेने–आमच्या संस्थेनें–प्रकाशित करावा असें त्यांना संस्थेबद्दलच्या आपलेपणामुळें वाटत होतें. त्याप्रमाणें प्रस्तुतची साहित्यकृति यंदाच्या ठाणें येथें भरणाऱ्या बेचाळीसाव्या मराठी साहित्य संमेलन प्रसंगीं सादर होत आहे.

मराठी भाषेसाठीं स्वतंत्र विद्यापीठ असावें त्याचप्रमाणें अेकत्रित मराठी प्रदेशांचें अेक घटकराज्य असावें याविषयींच्या मागण्या प्रथम व प्रामुख्यानें मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून करण्यांत आल्या; त्यांचा सातत्याने पुरस्कार करण्यांत आला. मराठी साहित्य संमेलनाचें व्यासपीठ हें महाराष्ट्रीय जनतेच्या सांस्कृतिक आकांक्षा व्यक्त होणारें व्यासपीठ म्हणून समजलें जातें. त्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर भरणाऱ्या या संमेलनास अनन्यसाधारण महत्त्व आहे हें खास.

महाराष्ट्रांत अुच्च शिक्षणाचें माध्यम मराठी असावें याबाबतचा आग्रह अ. वि. गृह प्रकाशनाने १९४८ पासून यथाशक्ति व सक्रिय रीतीनें धरलेला आहे. गेल्या १२ वर्षांत १७ महाविद्यालयीन पुस्तकें मराठी भाषेंतून

आम्ही प्रकाशित केलेलीं आहेत. मराठी भाषेच्या विकासासाठीं चालू असलेल्या आमच्या आजच्या अल्पशा प्रयत्नास दिवसेंदिवस विद्यार्थी व जिज्ञासू वाचकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे, ही गोष्ट वरील अुपक्रमाच्या यशस्वीपणाचें द्योतक म्हणून समजली पाहिजे.

मराठी महाविद्यालयीन पुस्तकांच्या प्रकाशनाप्रमाणेंच मराठी भाषेंतील अेक प्रकाशक म्हणून मराठी साहित्य संमेलन प्रसंगीं आमचा प्रतिनिधि पाठवून या शारदोत्सवाला आम्ही नियमितपणें दरवर्षीं अुपस्थिति देत असतो. मराठीच्या विकासासाठीं पूर्वीप्रमाणेंच यापुढेंहि अ. वि. गृह प्रकाशन यथाशक्ति प्रयत्न करील हें सांगावयास नकोच.

सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयाचे (ॲक्टिंग) प्राचार्य व या पुस्तकाचे लेखक प्रा.डॉ. दु. का. संत यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तुतचा " साहित्य संमेलनें व साहित्यिक प्रश्न " हा ग्रंथ लिहून दिला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. त्याचप्रमाणें ४२ व्या मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. रा. श्री. जोग यांनीं या ग्रंथास विवेचक प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल त्यांचेहि आभारी आहोंत.

साहित्यिक व मराठी जनता यांना मराठी साहित्यसंमेलनाच्या अैतिहासिक व प्रचलित साहित्याच्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथाचा उपयोग होईल अशी आशा आहे.

दि. दा. गांगल

व्यवस्थापक
अ० वि० गृह प्रकाशन
पुणें २

पुणें,
१ मे १९६०

अनुक्रमणिका

पहिलीं पंचवीस अध्यक्षीय भाषणें आणि साहित्यिक प्रश्न

[इ. स. १८७८ ते इ. स. १९४१]

: १ :

वर्तमानकालाच्या क्षितिजावरील भविष्यकालाच्या धूसर धुक्यांतून महाराष्ट्र विद्यापीठाच्या भव्योदात्त शिखराचें दर्शन आज आपणांस अंधुकतेने का होअीना पण होअूं लागलेलें आहे. आणि अर्थात् 'मराठी भाषा मुमूर्षु झाली आहे', 'मराठीची पीछेहाट होत आहे' अि० प्रकारचे अभद्र आक्षेप आज कोणास घेतां येणें शक्य नाही. असें असलें तरी सगळें राष्ट्र आज अशा विचित्र परिस्थितींत सांपडलें आहे, परिस्थितीचे कालाप्रमाणे थंड भासणारे पाश अितक्या वेगाने आवळले जात आहेत की, त्यांचा प्रतिकार कसा करावयाचा, असा प्रश्न राष्ट्रांतील विचारी व्यक्तींपुढे पडला आहे. या परिस्थितीचा देशाच्या साहित्यावर परिणाम होणें अपरिहार्य आहे. साहित्याने प्राप्त परिस्थितींत करावयाच्या कार्याची कितीहि जाणीव असली तरी, परिस्थितीच्या या कचाट्यांत साहित्याचें हें अुद्दिष्ट कार्य त्याकडून पार पडेलच असें सांगतां येत नाही. आज आपणांस अितिहासाचें चांदणें आल्हाद देत नाही, वर्तमानाचा गारठा सहन करवत नाही. साऱ्यांचे डोळे भविष्याच्या अुदरांत कोणकोणत्या गोष्टी दडून बसल्या आहेत हें पाहण्याकडे लागले आहेत. अशाहि वेळीं अितिहासाचें अवलोकन केलें तर तें झालें तर अुद्बोधकच होअील अशा आशेने ह्या विषयावर मी आपले विचार प्रकट करण्याचें धाडस करीत आहें. *

* प्रस्तुत निबंध म. सा. पत्रिकेच्या ७६ व ७७ व्या अंकांत [इ. स. १९४६] मुद्रित झालेला असून तो जशाचा तसाच येथें उद्धृत केला आहे. अधिक खुलासा निवेदनांत आलेला आहेच.

विवेचनाच्या सोयीसाठी विषयाचे दोन विभाग केले आहेत. विषयाचें स्वरूपच तसें आहे. अुद्‌भवणाऱ्या प्रश्नांचा अूहापोह दुसऱ्या विभागांत करणें सोयीचें वाटलें. अर्थात् भाषणाचें समालोचनात्मक विवेचन वा त्यांतील आशय प्रथम भागांत करणें युक्त आहे.

विषयव्याप्तीच्या मर्यादा :—'महाराष्ट्र साहित्य संमेलन' या साहित्यिकांच्या महासभेचीं आजवर पंचवीसच अधिवेशनें झालीं असलीं, तरी त्यांनी व्यापिलेला काल मात्र पंचवीस वर्षांपेक्षा कितीतरी अधिक आहे; 'म. सा. संमेलन' म्हणून धरलें गेलेलें पहिलें संमेलन १८८५ त असल्याचा निर्देश आढळतो, आणि पंचविसावें १९४१ मध्यें सोलापुरास भरलें. या अेकूण पंचवीस अधिवेशनांतून आणि पंचावन्न वर्षांच्या कालावधींत निरनिराळ्या अध्यक्षांनी साहजिक 'साहित्य संमेलना'चें कार्य, ध्येय अि० गोष्टींचा बराच अुहापोह केलेला, आणि तो पाहतां साहित्यविषयाकडे बघण्याचा दृष्टिकोणसुद्धा बराच व्यापक व विशाल होत आलेला दिसावा हेंहि स्वाभाविकच आहे. पहिल्यापहिल्यानें जीं अधिवेशनें भरलीं तीं प्रामुख्यानें ग्रंथकारांचीं म्हणून होतीं, व त्यांतूनच येतां येतां त्यांस पुढे प्रस्तुतचें 'साहित्यसंमेलना'चें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. अर्थात् वर अुल्लेखिलेला फरक त्यांत होत जाणें हें सर्वथा क्रमप्राप्त होतें. हा फरक प्रत्यक्ष कोणकोणता होत गेला व तो कसकसा होत आला आहे हें स्पष्टपणें कळून यावयाचें तर त्या पंचवीस अधिवेशनांच्या अध्यक्षांनी जीं भाषणें केलीं तीं पाहणें व त्यांतून वेळोवेळीं अुपस्थित झालेले साहित्यविषयक प्रश्न आढावारूपानें दृष्टीपुढून जाअूं देणें यांच्या योगानेच तें अुत्तम साध्य होअील.

प्रथमारंभींच हें सांगून टाकणें आवश्यक आहे कीं येथे 'साहित्यविषयक' हा शब्द त्याच्या व्यापक अर्थानेच घ्यावयास पाहिजे. साहित्यशास्त्रांत 'साहित्य' या शब्दास जो अर्थ आलेला आहे तेवढाच संकुचित अर्थ भाषेच्या मौलिक विचाराचे वेळीं धरून भागत नाही; व म्हणून येथेहि तो तसा घेतां येणार नाही. भाषाशास्त्राच्या नियमांप्रमाणे कोणत्याहि जिवन्त नि कर्तृत्ववान् अशा समाजाची, प्रत्यक्ष नित्याच्या व्यवहाराची नि वाङमयाची बोधभाषा म्हणून जिला स्थान प्राप्त झालेलें असतें तिच्या कार्यव्याप्तीचें स्वरूप आपोआपच अतिशय विशाल होतें. मराठी ही तशीच अेका जिवंत नि कर्तृत्ववान्

समाजाच्या नित्य व्यवहाराची बोधभाषा आहे. अर्थात् मराठी भाषेच्या अस्तित्वाच्या, संवर्धनाच्या वा अलंकरणाच्या दृष्टीने जे जे अनेक प्रश्न अद्भवणारे आहेत त्या सर्वांचाच समावेश 'साहित्यविषयक' या सदरांत करावयास हवा. ललितवाङ्मयाच्या व लालित्याच्या शास्त्राचें वाङ्मय, वा विचार-वाङ्मय, हे सर्व भेद साहजिकपणेंच त्यामध्ये येतात.

तशीच दुसरीहि गोष्ट सांगितली पाहिजे, व ती म्हणजे साहित्यविषयक प्रश्न म्हणून जे येथे विवेचावयाचे आहेत ते केवळ अध्यक्षीय भाषणांतून अपस्थित होत असलेले तेवढेच विवेचावयाचे आहेत. वस्तुतः आजपर्यंतच्या संमेलनांतूनच अद्भवलेले प्रश्न जर विचारांत घेतले गेले असते, तर तें अधिक अद्बोधक नि सयुक्तिक झालें असतें. कारण नुसतीं अध्यक्षीय भाषणें हीं कांही तत्कालीन वाङ्मयविषयक चळवळीचीं अेकमेव गमक वा निदर्शक होअू शकत नाहीत. अध्यक्षीय भाषण हा बोलून चालून अेक वैयक्तिक स्वरूपाचा व्यवहार असल्याने त्या त्या अध्यक्षाचें साहित्यांतील व समाजांतील व्यक्तिगत जें स्थान असेल त्यावरच पुष्कळ गोष्टी अवलंबून असतात. साधारणतः बाहेरच्या वातावरणांत त्या त्या काळीं ज्या साहित्यविषयक अपेक्षा अुत्पन्न होअून वावरत असतात किंवा जे साहित्यविषयक प्रश्न घुमत असतात त्यांचे पडसाद तरी अध्यक्षीय भाषणांतून अुमटावयास हवेत व तसे ते अुमटतातहि. परंतु त्यांपैकी कोणत्याहि प्रश्नाचा वा प्रश्नांचा संपूर्ण पुरस्कार किंवा संपूर्ण निरास या गोष्टी, त्या त्या प्रश्नांसंबंधीचा विशिष्ट जिव्हाळा नि तसा अधिकार अध्यक्षांचे ठायीं असल्याविना घडू शकत नाही. अुदाहरणार्थ, मराठी भाषेच्या शुद्धीचा प्रश्न घेतला तर श्रीपाद कृष्णांसारखा संमेलनाध्यक्ष असतांना त्यांच्या भाषणांत बाहेरील वातावरणांतील त्या चळवळीचा पडसाद मात्र अुमटलेला दिसेल, परंतु तिचा निःसंदिग्ध पुरस्कार मात्र डॉ. माधवराव पटवर्धन किंवा बॅ. सावरकर हे संमेलनाध्यक्षपदीं आल्यावर व्हावयाचा हें स्पष्ट आहे. तीच गोष्ट महाराष्ट्र विद्यापीठाची. तो प्रश्न अितर कोणत्याहि अध्यक्षांपेक्षा प्रो. पोतदार हेच थोडें कालांतर झालें तरीहि खऱ्या पोटतिडिकेने पुरस्कारणार.

संमेलनांच्या अितिहासाचें विहंगमावलोकन :—पहिलें साहित्य-संमेलन केव्हा भरलें तें आज निश्चितपणें अवगत नाही. न्या. मू. रानड्यांना

ही कल्पना सुचून त्यांनी त्या संबंधांत पुष्कळ प्रयत्न केले. परंतु १८८५ पर्यंत त्यांच्या प्रयत्नांस मूर्त स्वरूप आलेलें दिसत नाही.[१] अि. स. १८८५ या वर्षीं मात्र पुण्यास त्या हेतूने कांही मंडळी वेद० कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली अेकत्र जमली. आगरकरसुद्धा त्या मेळाव्यांत अुपस्थित होते. त्या वर्षीं बीभत्स वाङमय, तसेंच फारशी शब्दांचा बहिष्कार अि० विषयांवर चर्चा झाली. त्या मेळाव्याची अेकूण संख्या सुमारें ३०० होती. परंतु त्यानंतर त्या गोष्टीला अेकदम खंड पडला. पुढे २० वर्षेंपर्यंत त्याविषयी कांहीच हालचाल झालेली दिसत नाही. १९०५ मध्ये दुसरें संमेलन साताऱ्यास दादासाहेब करंदीकर यांचे अध्यक्षतेखाली भरलें. त्या वेळीं सुद्धा केवळ मौज म्हणून कांही ग्रंथकार अेकत्र जमले होते. १९०६ सालीं पुण्यास गोविंद वा: कानिटकर यांचे अध्यक्षतेखाली तिसरें संमेलन भरलें. त्या वेळेस मात्र ठरावांस व त्यांच्या वरील चर्चेस सुरुवात झाली. विद्यापीठांत मराठीचा प्रवेश अि० चर्चेचे विषय होते. १९०६ ते १९०९ पर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं संमेलनें भरलीं. परंतु पुढे ३ वर्षेंपर्यंत अेकहि भरलें नाही. १९१२, १९१५, १९१७, १९२१ अशीं भरत आलीं. १९२१ पासून १९२६ पर्यंत पुन्हा अेकहि संमेलन भरलें नाही. १९२६ ते १९३६ या अवधींत मात्र नियमितपणें भरलीं. १९३७ हें वर्ष मात्र तसेंच गेलें व पुढे आतापर्यंत तरी क्रमाने तीं भरत आलीं आहेत. तेव्हा १८८५ पासून अेकंदर पंचवीस अधिवेशनें असलीं तरी पहिल्यापासून प्रस्तुत वर्षीच्या २६ व्या संमेलनापर्यंत प्रारंभीं अुल्लेखिल्याप्रमाणे ५५ वर्षांचा काल त्यांनी व्यापिला आहे.

विचारांचा विकास :—गेल्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकांत ह्या देशांत जें पुनरुज्जीवन चालू झालें त्याचें प्रतिबिंब देशाच्या संसाराच्या अितर अंगांप्रमाणे ह्या साहित्यप्रांतांतहि दिसून आल्यावाचून राहत नाही. अिंग्रजांची राजवट येथे सुरू झाल्यावर सुशिक्षित लोकांत विचारांच्या दोन कृत्रिम परंपरा निर्माण झाल्या. अेकीचें वैशिष्टय म्हणजे सामाजिक बाबतींत पुरोगामी (सुधारणावादी) राहावयाचें व राजकीय बाबतींत सरकारशीं

१. पहिलें ग्रंथकारसंमेलन ११ मे १८७८ ला पुणें येथें भरलें होतें असें प्रा. न. र. फाटक यांच्या रानडे चरित्र पृ. २९९ वरून व परिषदेच्या इतिहासावरून म्हणता येअील.

मिळतें घ्यावयाचें हें, व दुसरीचें याच्या अुलट, म्हणजे राजकीय संबंधांत पुरोगामित्व असावयाचें व सामाजिक विषयांना गौणत्व द्यावयाचें. चळवळीच्या वातावरणांत या परंपरा 'मवाळ' व 'जहाल' या नांवांनी ओळखिल्या जातात. या दोन्ही प्रवृत्तींचें प्रतिबिंब येथेहि आपणांस पाहण्यास मिळतें. परंतु राजकारणांतली 'राष्ट्रीय सभा' ही ज्याप्रमाणे मवाळांच्या हातून जहालांच्या हातांत जात जात आज ती पूर्णपणें लोकनियुक्त नि क्रांतिकारक संस्था बनली आहे, तसाच प्रकार मात्र त्या मानाने येथे मुळीच झालेला दिसत नाही. राष्ट्रीय विचारांच्या वर्धनास पूरक व पोषक असें कार्य ह्या साहित्यप्रांतांतील लोकांकडून झालें आहे. परंतु प्रवर्तक विचारांचा झेंडा धरण्याचें कार्य मात्र या सभेकडून झालें नाही हें कटु सत्य आहे. अर्ज-विनंत्यांच्या राजकारणांतून 'राष्ट्र-सभा' कितीतरी पूर्वी बाहेर पडली. परंतु त्याच गोष्टींचा नुसता अन्धुक पडसाद अुमटावयासहि या क्षेत्रांत १९२८ साल अुजाडावें लागलें (परांजपे भाषण). अर्थात् अितक्या मंदगतीने विचारक्रांतीकडे वळणारें हें साहित्यसंमेलन आजहि पूर्णपणें त्या चाकोरींतून बाहेर पडलें नसलें तर त्यांत आश्चर्य नाही.

तीन कालखंड :—या दृष्टीने या कालखंडाचे साधारण स्थूल मानाने तीन भाग पडतात. पहिला विभाग (पहिलें) युद्धपूर्व कालाचा. ह्या कालास 'विशुद्ध राजनिष्ठेचा काल' असें म्हणतां येअील. कारण बहुतेक (नव्हे जवळ जवळ प्रत्येक) अध्यक्षांनी राजाविषयी वा सरकारविषयीचा आपला आदर वा विश्वास स्पष्टपणें बोलून दाखविला आहे. दुसरा भाग साधारणपणें १९२१ ते १९३५ अितका मोठा पडतो. ह्या कालास 'वाङ्मयीन विलासवृत्तीचा काल' असें नांव देतां येअील. ह्या कालांत अेखादा डॉ. केतकरांसारखा अपवाद सोडून दिल्यास साधारणपणें प्रत्येक अध्यक्षाने जणू वाङ्मयाचा प्रांत हा समाज वा राजकारण यापासून अलिप्त आहे असें समजून साहित्याचें शास्त्रीय (मूल्यमापनात्मक) विवेचन केलें आहे. अलंकरणाच्या दृष्टीने ह्यासुद्धा अवस्थेस अेक विशिष्ट महत्त्व आहे. परंतु संवर्धनाची वा अस्तित्वाची व्यापक कल्पना घेतल्यास त्या समजुतीला थारा देअून चालणार नाही. अेकट्या डॉ. केतकरांना काय ती जाणीव झालेली दिसते, व म्हणूनच त्यांचा अपवाद वर काढिला आहे. तथापि सर्वांगीण विकासाचे दृष्टीने ही अवस्थाहि

कांही अधिक वेळ राहिली तरी ती विशेष मारक झाली आहे असें मात्र नव्हे. तिसरा कालखंड १९३६ च्या पुढचा.या कालखंडास साधारण मानाने 'कृति-दौर्बल्याच्या जाणिवेचा काल' हें नांव शोभेल. या काळांतील प्रत्येक अध्यक्षाला या दौर्बल्याची जितक्या तीव्रतेने जाणीव झालेली दिसते, तितक्या तीव्रतेने ती तत्पूर्वी कधीच झालेली दिसत नाही. भाषाशुद्धिविरोधकांच्या आक्षेपांचा समाचार घेण्यापूर्वी डॉ. पटवर्धनांनी या गोष्टीचा स्पष्ट अुल्लेख केला आहे. संकुचित दृष्टि व फटकून वागण्याची प्रवृत्ति त्यांना अगदी सलते आहे असें वाटतें. तीच गोष्ट सावरकरांची. भाषाशुद्धीचीं आचरणात्मक सूत्रें सांगितल्यावर शेवटीं त्यांनी 'लेखण्या मोडा व बन्दुका घ्या' असा संदेश दिला आहे, तो कोणत्या जाणिवेच्या पोटीं ? प्रो. पोतदारांनी सुद्धा 'मराठीचा धेंडा मिरवा' असा अुपदेश केला व प्रा. फडके-खांडेकरांनी जरी दोन वाङ्मय-प्रकार विचारांत घेतले असले तरी त्या दोघांच्याहि भाषणांतून वरील जाणिवेचें प्रतिबिंब स्पष्ट पडलेलें दिसून येतें. त्यांच्यावर कितीहि टीका झालेली असली तरी अेका भयानक वस्तुस्थितीचा आधार त्यांस निश्चितपणें होता असें म्हणणें गैर होणार नाही. खांडेकरांच्या भाषणांत तर ही जाणीव अत्यंत तीव्रतेनें दिसते. साहित्याचें आजच्या विशिष्ट परिस्थितींतलें कार्य त्यांच्याकडून होत नाही, ही वस्तुस्थिति त्यांना अत्यंत अस्वस्थ करून सोडते. अेकूण तीनहि कालखंडांचा साकल्याने विचार करतां साहित्यविषयक विचारांचा गुरुत्वमध्य हा क्रमाक्रमाने समष्टिहिताच्या क्षेत्राकडे झुकत चाललेला आहे, व अलीकडे तर त्याचा वेग झपाट्याने वाढत आहे असें प्रत्ययास येतें.

भाषासामर्थ्याचा प्रत्यय :—केवळ भाषासामर्थ्याच्या वा वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने पाहिलें, तरीसुद्धा मराठी भाषा सामर्थ्यसंपन्न, प्रभावी, सुंदर, व विचारांचें, भावनांचें वा व्यावहारिक गोष्टींचें व्यक्तीकरण करण्यास समर्थ अशी होत आहे याची जाणीव पदोपदीं होते. शैलीला बरेंचसें व्यक्तिनिष्ठ स्वरूप असलें तरी एकंदरीने मराठीची सर्गशक्ति, सौष्ठव नि अिष्टार्थव्यंजकता झपाट्याने वाढत आहे हें अगदी अलीकडचीं भाषणें ओझरतीं वाचलीं असतांहि दिसून येतें. अुपरिनिर्दिष्ट मधल्या कालखंडाने तिच्या अंगीं भाषाशास्त्रीय निवेदनक्षमता आणली, व शेवटच्या कालखंडांत ती सुगमता, सौंदर्य व शुद्धता या गुणांकडे ओढली जात आहे असें स्पष्ट दिसतें.

प्रा. फडक्यांची बोललें जातें तसें लिहिण्याची ढब, खांडेकरांची काव्यमय नि सुंदर लिहिण्याची पद्धति, नि प्रा. पोतदारांची वा भाषाशुद्धिवाल्यांची जुने वा नवे मराठी शब्द ठसकेबाज तऱ्हेने अुपयोगांत आणण्याची प्रवृत्ति यांवरून कोणती गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ? मराठीस येत असलेलें हें विशाल नि प्रगल्भ स्वरूप पाहिलें की क्षणभर आनंदाने हृदय भरून येतें.

भाषणांतील व्यक्तिगत भिन्नता :—गेल्या साठ वर्षांच्या कालखंडांत पुष्कळच मोठमोठ्या धार्मिक, सामाजिक, राजकीय नि आर्थिक इ० घडामोडी होअून गेल्या. त्यांचा निर्देश येथे करण्याचें सामान्यतः कांही कारण नसलें तरी त्या सर्वांची पृष्ठभूमि या साहित्यप्रांतीय घडामोडींना आहे हें लक्षांत घेणें अवश्य आहे. तसेंच साहित्यविषयक चळवळींचाच तेवढा विचार करावयाचा म्हटला तरी सुद्धा त्यांचें प्रतिबिंब सर्व अध्यक्षीय भाषणांतून पडेलच असें नसल्याने तो विचारहि साकल्याने करतां येईल असें नाही. कारण अमुक अेक विषय निवडणें हें सर्वस्वी अध्यक्षाच्या व्यक्तिविशिष्ट, सामाजिक वा वाङ्मयीन स्थानावर वा मानावर अवलंबून आहे. याच कारणाने या भाषणांतून साहित्यविषयक प्रगतीचा क्रम सुसूत्र न राहतां त्यांतून विस्कळितपणा, पुनरुक्ति व पाल्हाळ हे दोष बरेच आढळतात.

प्रथम भाषणांतून आलेल्या समालोचनांवर थोडें लिहिणें आवश्यक आहे. बऱ्याच अध्यक्षांच्या भाषणांतून समालोचनपर अुल्लेख आलेले आहेत. कांहींनी केवळ त्यावरच भर दिलेला आहे, तर कांहींनी त्याचा ओझरता अुपयोग करून घेतला आहे. या समालोचनाचे दोन प्रकार पडूं शकतात. अेक मराठींतील सारस्वताचें आरंभापासून समालोचन करणें हा व दुसरा म्हणजे त्या वर्षांत अगर तत्पूर्वीच्या कालांत प्रसिद्ध झालेल्या मुख्य मुख्य ग्रंथांचें महत्त्व निदर्शन करणें हा. अशीं समालोचनें प्रथमारंभीं किंवा मधून केव्हा केव्हा येणें अिष्ट असलें तरी, तशा प्रकारें समालोचन करणें हा जणू एक प्रकारचा अलिखित संकेतच आहे, अशीच भावना १९३० च्या संमेलनापर्यंत बहुधा प्रत्येक अध्यक्षाची ठाम होअून गेलेली दिसते. वास्तविक अिष्ट असतें तेव्हासुद्धा वाङ्मयाचें समालोचन करणें हें वाटतें तितकें सोपें नसतें. त्याकरिता अवश्य असणारी अैतिहासिक पद्धतीची बैठक प्रा. पोतदारांसारख्या कांही थोड्यांच्याच ठिकाणीं आढळते. त्या अैतिहासिक

पद्धतीचें महत्त्व लक्षांत न आल्याने शिवरामपंत परांजपे किंवा वा. म. जोशी यांसारख्यांकडूनहि निव्वळ पुस्तकांचीं नांवें वाक्यांत चमत्कृतिजनक रीतीने गुंफण्याचीच कसरत झाली आहे ! परंतु अकारण कंटाळी होऊन गेलेल्या त्या अप्रयोजक प्रथेला १९३१ मधील सोळाव्या संमेलनाच्या प्रसंगीं डॉ. केतकरांनी ती साक्षात् मोडूनच प्रथम धक्का दिला. अशा प्रकारचा आढावा घेतला जाणें हें आवश्यक असलें तरी विशेषशा बुद्धिमत्तेची गरज नसणारें निव्वळ कष्टाचें हें काम अध्यक्षाने न करतां अेखाद्या तज्ञ समितीकडून झालें तरी चालण्यासारखें आहे अशी त्यांनी सूचना केली, व ती सर्वस्वीं सयुक्तिक असल्याने त्यांच्यानंतरच्या तीन चार अध्यक्षांव्यतिरिक्त पुढे सर्वांनीच ती अंगीकारिली.

भाषणांचा स्थूल मानानें आशय–(पहिलें) युद्धपूर्वकाल :—या संमेलनास प्रथम 'ग्रंथकारांचें संमेलन' असें स्वरूप होतें हें प्रारंभीं सांगितलेंच आहे. त्यांतहि पहिलीं तीन अधिवेशनें तर केवळ औपचारिकच होतीं. त्यांत ग्रंथकारांच्या ओळखी, भेटीगांठी होअून त्यांना कोणकोणत्या अडचणी येतात यांचा खल व्हावा अशासारखे हेतु होते. अर्थातच त्यांना तोंपर्यंत व्यवस्थितपणा वा कृतिक्षमता आलेली नव्हती. त्यामुळें त्यांच्यांतील अध्यक्षीय भाषणें ग्रथित झालेलींहि कोठे आढळत नाहीत. किंबहुना तशीं कांही भाषणें मूळांतच झालीं तरी होतीं की नाही याविषयी शंकाच आहे. अशा स्थितींत त्या भाषणांना मुळांतच तितकेसें महत्त्व अुरत नाहीं.

१९०६ मध्ये संमेलनाचें तिसरें अधिवेशन भरलें व त्यावेळीं अैतिहासिक कागदपत्रांचा संग्रह प्रसिद्ध करणें; त्याप्रमाणे मुंबअी विद्यापीठांत मराठीचा प्रवेश करून घेणें, आधुनिक कवींना अुत्तेजन देणें व मराठींत विश्वकोश वा भाषेचा कोश रचणें अि० गोष्टींची चर्चा झाली. त्यांपैकी बऱ्याचशा गोष्टी यापूर्वी प्रत्यक्ष चालू असलेल्या हालचालींच्या प्रतिध्वनिरूपच होत्या असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही; अुदा० अितिहासाचार्य राजवाडे यांच्या 'मराठ्यांच्या अितिहासाचीं साधनें' या अैतिहासिक पत्रसंग्रहाचे त्या वेळेपर्यंत निदान आठ खंड प्रसिद्ध होअून गेलेले होते. आणि मराठीला विद्यापीठांत प्रवेश मिळविण्याविषयीची हालचाल तर न्या. मू. रानडे यांच्या वेळेपासूनच चाललेली असल्याचें सुप्रसिद्धच आहे.

पुढील वर्षी वि. मो. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली चवथें अधिवेशन भरलें. त्यांत अध्यक्षांनी ठिकठिकाणीं पसरलेल्या दोन कोटि महाराष्ट्रीयांनी अेक व्हावें, लोकांत साक्षरतेचा प्रचार करून वाङमयाविषयीची अभिरुचि ग्रंथकारांनी अुत्पन्न करावी नि वाढवावी असा अुपदेश केला. पौरस्त्य-पाश्चात्य झगडयांत आपण जपानचें अुदाहरण पुढें ठेवावें अशीहि अेक सूचना त्यांनी त्यांत केली आहे ती बहुधा त्या वेळच्या जपानच्या सर्वत्र गाजत असलेल्या प्रभावाचा परिणाम होती हें स्पष्ट आहे.

१९०८ च्या पुण्याच्या अधिवेशनाचे अध्यक्ष भारताचार्य चिं. वि. वैद्य हे होते. त्यांचें भाषण मात्र खऱ्या ग्रंथकारास साजेसें झालें. कारण त्यांत त्यांनी मराठी भाषेच्या भौगोलिक व्याप्तीचा, तिच्या मूळाचा, अैतिहासिक संशोधनात्मक दृष्टीने विचार केला. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागांस (विदर्भ, कोकण अि. स.) जुन्या ग्रंथांमध्ये केव्हापासून आधार सापडतो अित्यादि विवेचन करून पुढे मराठी भाषेच्या अुत्पत्तिकाळाची व घटनेचीसुद्धा चर्चा त्यांनी केली आहे. शेवटीं आतापर्यंतच्या वाङमयाचा आढावा स्थूलरूपाने घेतला आहे. 'ग्रंथकारांच्या संमेलना'च्या कल्पनेचा बहुतेक येथून पुढे अस्त झालेला दिसतो. कारण त्यापुढे त्यास 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' असें सार्थ नामाभिधान प्राप्त झालें, व त्याचे क्रमांक मात्र पूर्वीचेच धरून तें पुढे चालू झालें.

सहावें अधिवेशन बडोदें येथें डॉ. कान्होबा र. कीर्तिकर यांचे अध्यक्षतेखाली भरलें. त्यांचें भाषण ठराविक साच्याचेंच झालें, अितकेंच नव्हे तर त्या अधिवेशनांत डॉ. भांडारकर, रा. ब. वैद्य, गो. कृ. देवधर अि. चीं जीं निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र भाषणें झालीं, तींच विशेष अुठावाचीं झाल्यामुळें कीर्तिकरांच्या अध्यक्षीय भाषणाला अेक प्रकारचें गौणत्व प्राप्त झालें.*

* त्या संमेलनप्रसंगीं कांहीं साहित्यिकांनी निबंध वाचले होते. त्यांत कविवर्य रे. टिळक, चिं. वि. वैद्य. प्रो. चि. गं. भानू, ग. ज. आगाशे इ. सारख्या तत्कालीन मान्यवर साहित्यिकांनीहि आपले निबंध सादर केले होते. अशा दहा निबंधांचें 'बडोदे संमेलनाकरितां तयार केलेले दहा निबंध' असें पुस्तकहि प्रसिद्ध झालें होतें. गंमत अशी कीं त्या पुस्तकांत संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ह्या गोष्टीचा उल्लेख नाहीं. आणि अध्यक्षांचें भाषण किंवा निबंधहि त्या संकलनांत आलेला नाही.

त्यापुढचें सातवें संमेलन तीन वर्षांनी १९१२ त अकोलें येथे झालें, व तें मात्र बरेंच संस्मरणीय झालें. संमेलनास येथवर जें केवळ औपचारिक स्वरूप होतें त्याच्या जागीं 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'ची स्थापना व तिचें ध्येय, कार्य, अि. ची निश्चिति, त्यांच्या योगाने त्याला रीतसर स्वरूप येण्याचा पाया घातला गेला हेंच त्या संस्मरणीयतेचें मुख्य कारण होय. त्या वर्षी प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाअू आपटे हे अध्यक्ष होते. त्यांचें भाषण त्यांच्या लौकिकास साजेसेंच झालें. त्यांत विचारांची विशालता आहे, आवश्यक तेवढी विद्वत्ता आहे. मायबोलीविषयीचा जाज्वल्य अभिमान आहे व त्यापोटीं आलेली कैवाराची भूमिका पण आहेच. प्रथम अुपनिषदांतील अुतारा देअून 'शब्दब्रह्म, नादब्रह्म व वाग्ब्रह्म' यांची चर्चा केली आहे. नंतर वाङमयाच्या स्वरूपाचें विवेचन करून 'मराठी भाषेची पीछेहाट होत आहे' या आक्षेपास त्यांनीं अुत्तर देण्यास सुरवात केली. तत्पूर्वी आक्षेपकांचे वर्ग कल्पून कोणत्या वर्गास हें अुत्तर आहे ह्याचाहि खुलासा केला आहे. मराठींत वाङमयाची अुन्नति होत आहे हें दाखवितांना बाह्योन्नति व अंतरुन्नति असे अुन्नतीचे भाग केले, व त्या दोन्ही अंगांची मराठींत अुन्नति कशी होत आहे तें सोदाहरण पटविलें. पुष्टयर्थ अिंग्रजी ग्रंथकारांचीं पण अुदाहरणें दिलीं आहेत. तसेंच ही द्विविध अुन्नति झाली तीसुद्धा सरकारकडून, विद्यालयाकडून, अुत्तेजन नसतांना व भाविकांची संख्या कमी असतांना झालेली आहे; व म्हणूनच ती अभिनंदनीय आहे असें स्पष्ट मांडलें आहे. पुस्तकांचे आंकडेसुद्धा मत-पुष्टयर्थ दिले आहेत. नंतर समकालीन ग्रंथकारांची स्थिति पूर्वकालीन ग्रंथकारांच्या स्थितीपेक्षा कशी केविलवाणी असते, त्यांचे कष्ट कसे वाढत जातात, हें दाखवून भूतकालप्रेमी व वर्तमानविद्वेषी लोक सर्व काळीं असणारच, तेव्हा त्यांच्याकडे लक्ष न पुरविलें तरी चालेल असें सांगितलें. आक्षेपकांचा दुसरा मुद्दा म्हणजे चांगलीं पुस्तकें कमी निघतात. त्याचें निरसन जगाच्या नेहमीच्याच वाङमयाची ही स्थिति आहे, तेव्हा हा आक्षेप केवळ मराठीवरच येतो असें नाही, अशा अुत्तराने केलें आहे. (There are few voices and many echoes याहि म्हणीचा आधार दिला आहे.) त्यापुढे त्यांनी शब्दसिद्धीचा प्रश्न विचारांत घेतला. त्यांच्या मताचें विशेष परीक्षण पुढे येअीलच, परंतु परभाषेंतले शब्द आणण्यास त्यांचा विरोध नाही. शेवटीं

तीन चार भरीव सूचना करून अुपनिषदाच्या अुतान्यानेच त्यांनी आपलें भाषण संपविलें आहे. सर्व व्याख्यानांत तळमळ व जिव्हाळा ओथंबून वाहत आहे.

यानंतर तीन वर्षांनी १९१५ मध्ये श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबअीस अधिवेशन भरलें. त्यांच्या छोटेखानी वक्तव्यास भाषण म्हणतां येअील की काय हीच शंका आहे. बादशहांचें शुभचिन्तन दोनदां करून जुन्या ग्रंथांपैकी अेका तरी ग्रंथाचा नैष्ठिक अभ्यास करण्याची आधुनिक विद्वानांस त्यांनी प्रार्थना केली. तसेंच आपल्याजवळ भगवद्गीतेचे पत्र्याचे ठसे असल्याचा पण शेवटीं अुल्लेख केला आहे.

१९१७ या वर्षी ग. ज. आगाशे यांचे अध्यक्षतेखाली संमेलनाचें नववें अधिवेशन भरलें. त्यांतील अध्यक्षांचें भाषण वरील भाषणापेक्षाहि अेका दृष्टीने अधिकच मजेशीर वाटतें. अध्यक्षांनी प्रारंभीं श्रीमंत सयाजीराव, अिंदूरकर व इंग्रज सरकार यांची स्तुति करून दोस्त राष्ट्रांना यश चिंतिल्यानंतर मग विषय म्हणून मागील संमेलनांतील कांही ठरावांवर आपलें मत देण्यास सुरुवात केली. विद्यापीठांतून त्या वेळीं मराठीची हकालपट्टी झाली होती. न्या. मू. रानडयांनी मराठीचा प्रवेश अत्यंत परिश्रमपूर्वक करून घेतला, व तसे परिश्रम करावयाचे तर युनिव्हर्सिटीच्या 'फेलो'ना समजण्यासाठी अिंग्रजींतून मराठी वाङमयाच्या ओळखीवर पुस्तकें प्रसिद्ध करावींत म्हणजे 'सुज्ञ' 'फेलो' आपोआपच तो विचार करतील. कारण 'व्हाइस चॅन्सेलर, डॉ. मॅककिन् हे अत्यंत अुदार आहेत अि. गोष्टी सांगून त्यांचीहि स्तुति आगाशांनी भरपूर केली !! यापुढे मुलांमुलींसाठी क्रमिक पुस्तकें तयार करावींत असा एक ठराव १९१५ चे अधिवेशनांत संमत झाला होता त्याचा निर्देश करून तसा प्रयत्न करूं नये असें आगाशे यांनी सुचविलें. कारण पुस्तकें छापण्यास आपणाजवळ पैसा नाही, व कोणी तीं छापून काढलीं, व तीं सरकारने मंजूर केलीं नाहीत, तर निष्कारण खर्च मात्र होईल म्हणून ती कल्पना डोक्यांतून काढून टाकावी असें पर्यायाने सुचविलें आहे. सरकारी परीक्षणें जास्त चिकित्सक यावींत असा आशावाद व्यक्त करून ग्रंथप्रकाशनाच्या अुत्तेजनासाठी फ्रान्समधील अेका ॲकॅडमीचा अितिहास व कार्य यांचें लांबलचक वर्णन करून तशी योजना येथे अस्तित्वांत आणावी असें सुचविलें. नंतर

युद्ध सुरू आहे तोंपर्यंत 'पॉप्युलर अेज्युकेशन' सारख्या माला निर्माण करून राज्यकर्त्यांस मदत करूं या अशी सदिच्छा व्यक्त केली आहे. शेवटीं सयमक-निर्यमक वादाचा परामर्श सोल्लेख घेऊन निर्यमक काव्य प्रतिभासंपन्न कवीनेच हातीं घ्यावें, तोंपर्यंत अितरांनी सयमकच रचना करावी असा उपदेश केला आहे.

थोडेंसें समालोचन :—येवढ्या माहितीवरून प्रथमयुद्धपूर्वकालीन साहित्यविषयक चळवळींची योग्य कल्पना येअू शकेल. त्या वेळच्या हाल-चालींवरून पुस्तकप्रसिद्धीबाबतचे तरी प्रयत्न होत असावेत, म्हणजे त्या बाबतींत तरी 'स्वातंत्र्य' असावें अशी कोणाची कल्पना असेल तर ती साफ चूक आहे. १९०९ च्या बडोदा येथील संमेलनांतील अेका ठरावाचा "प्रकृत राजप्रकरणीं, व वादविषयक धार्मिक, सामाजिक प्रश्न वगळून अितर सर्व विषयांवर व कलांवर नवीन ग्रंथ तयार करणें किंवा अन्य भाषांतील ग्रंथांचीं भाषांचीं भाषांतरें करणें" हा भाग पाहिल्यास त्यावरून त्या 'स्वातंत्र्या' विषयी योग्य ती कल्पना येण्यासारखी आहे. साहित्यिकच जेथे आपण होऊन ग्रंथकर्तृत्वावर असा दंडक घालून घेण्यास प्रवृत्त होतात, तेथे साहित्य-विषयक चळवळींत सामर्थ्याचा जिवन्तपणा आला नाही तर त्यांत नवल नाही.

युद्धोत्तरकाल :—यापुढील संमेलन १९२१ मध्यें बडोदें येथे साहित्य-सम्राट् तात्याराव केळकर यांचे अध्यक्षतेखाली भरलें. हें संमेलन अनेक दृष्टींनी क्रांतिकारक म्हणून गणावें लागेल. गेल्या महायुद्धानंतर बदललेल्या परिस्थितीचें प्रतिबिंब त्या वेळच्या अध्यक्षांच्या भाषणांत आपणांस अवश्य दिसून येतें. लोकशाहीच्या हक्कांची वाढ झाल्याने राजनिष्ठेला ओहटी लागलेली दिसते. तसेंच शुद्ध स्वरूपाच्या वाङमयाचे पुष्कळसे गुण त्यांत आहेत. पण असें असलें तरीसुद्धा अुपरिनिर्दिष्ट ठरावाच्या मुळाशीं असणारा राजकीय परिस्थितिनिरपेक्षतेचा अलिखित संकेत नकळत–वा बुद्धयाहि–त्यांत पाळला गेला आहे, असें स्पष्टपणें प्रतीत होतें.

मराठी वाङमयाची वाढ होत आहे हें केळकरांनी युनिव्हर्सिटींत मराठीस मान मिळत आहे व 'राष्ट्रीय सभे'ने भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलें आहे, हीं दोन गमकें घेअून दर्शविलें आहे. स्वतंत्र विद्यापीठाचें सूतोवाच

केळकरांनी प्रथम त्या भाषणांत केलें. (प्रा. पोतदारांचे त्या संबंधांतले प्रयत्न ह्या वर्षापासूनच सुरू झाले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे). नंतर मुख्य मुख्य ग्रंथांचा शाखाशः समाचार घेऊन आधुनिक कवितेच्या गुणदोषांचें विवेचन त्यांनी केलें आहे. त्यांत 'भावगीता'च्या (त्यांनी वीणाकाव्य म्हटलें आहे) विवरणावरच विशेष भर दिलेला असून अेकूण समालोचनाने भाषणाचा बराच भाग व्यापिला आहे. पुढे आधुनिक ग्रंथ-कारांबद्दलच्या गैरसमजाचें निराकरण पाश्चात्य लेखकांचे अुतारे घेअून केलें आहे. प्रत्येक युगांत अशा वृत्तीचे लोक असतात असें सांगून मराठी लेखकांची अिंग्रजी व जुन्या मराठी लेखक कवींबरोबर तुलना केली आहे. त्यानंतर 'वाङमय म्हणजे काय' हा तात्त्विक प्रश्न विचारांत घेऊन काळाच्या चाळणींतून जें शिल्लक राहातें तें वाङमय असें विधान केलें आहे. शेवटीं वाङमयाची कसोटी कोणती, हेतु काय, मेकॉलेचें काव्याविषयीचें मत योग्य आहे काय ? व काव्यापासून आनंद कां, कसा होतो अित्यादि गोष्टींची बरीच मूलगामी स्वरूपाची चर्चा केली आहे.

अकरावें अधिवेशन मुंबअीस श्री. माधवराव किब्यांचे अध्यक्षतेखालीं १९२६ त भरलें. त्या वेळच्या भाषणांत अध्यक्षांनी महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांत मराठीस स्थान मिळत आहे याबद्दल संतोष व्यक्त करून ठराविक समालोचनानंतर सारस्वत, साहित्य, वाङमय यांच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. जातां जातां वृत्तपत्राच्या संपादकाच्या कार्याचें महत्त्व वर्णन करून समकालीन वृत्तपत्रांतील अभिरुचिहीन लेखनाबद्दल नापसंति व्यक्त केली आहे. शेवटीं अेका अॅकॅडेमीची कल्पना सांगून तें स्वरूप म. सा. परिषदेस द्यावें अशी शिफारस केली आहे, व ती करतांना अिंग्रजी भाषासुद्धा या अवस्थेंतून गेली असल्याचें कारण दिलें आहे.

१९२७ चें श्री. कोल्हटकरांचें पुणें येथे भरलेल्या अधिवेशनांतील अध्यक्षीय भाषण अत्यंत संस्मरणीय गणावें लागेल. त्यांच्या व आपट्यांच्या भाषणांत अेका गोष्टींत साम्य आढळतें. ह्या भाषणापूर्वी नुकताच राजवाडे यांनी शारदोपासक संमेलनांतील अध्यक्षीय व्याख्यानांत 'मराठी भाषा मुमूर्षु झाली आहे' असा आक्षेप घेतला होता. मराठीचें आजचें दौर्बल्य हें बाल्याचें निदर्शक नसून वार्धक्याचें आहे, आणि ती लवकरच मृत पावणार

आहे, तेव्हा सुज्ञ लोकांची तिला वांचविण्याची अुठाठेव फुकट जाणार आहे, असे विचार त्यांनी मांडले होते. राजवाड्यांसारख्या 'मराठीविना इतर भाषेंत अेक अक्षरहि लिहिणार नाही' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या लेखकाच्या ह्या बलवत्तर नि निराशाजनक आक्षेपांचा विचार करणें श्रीपाद कृष्णांना भाग पडलें. त्यांनी प्रथम राजवाड्यांच्या आक्षेपाचें अधिष्ठान म्हणजे जें दैनंदिन व्यवहारांतील अिंग्रजी शब्दांचें बाहुल्य, त्यावरच आपलें निराकरणाचें हत्यार चालविलें. अिंग्रजी राजवट सुरू झाल्यावर विद्यालयांत चवथीपासून पुढे तीच बोधभाषा झाली असल्याने नि अिंग्रजांचेंच राज्य चालू असल्याने, त्यांच्या भाषेचें वर्चस्व राहणें कसें अपरिहार्य होतें याचें त्यांचें सामाजिक विवेचन अत्यंत मार्मिक आहे. पण त्याचबरोबर, 'डाडा', 'धोंड्यू', 'टाओी', 'गँग्यू' अि. विचित्र रूपें आणण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करण्यासहि ते विसरले नाहीत. मराठीला विद्यापीठांत प्रवेश नसल्याने तिच्यांत ग्रंथ निर्माण होत नाहीत, व अुत्तम ग्रंथ निर्माण होत नाहीत म्हणून तिला विद्यापीठांत मान नाही हें परस्परावलंबी कोडें मांडून सरकार नि विद्यापीठ या दोघांचीहि मराठीवर वक्रदृष्टि कशी आहे, आमच्याकडील विद्वानांनी सुद्धा अिंग्रजींतून ग्रंथनिष्पत्ति कशी केली अित्यादि गोष्टी विशद केल्या आहेत. तसेंच, पुष्कळशा कल्पना व वस्तु नवीन असल्याने त्यांचे वाचक जे शब्द असतील ते परके असले तरी येणारच, आणि पत्रलेखनांतून सुद्धा अिंग्रजी शब्दांची आयात होअू लागली आहे हें दाखविलें आहे. शास्त्रीय दृष्ट्या भाषा केव्हा मुमूर्षु म्हणतां येअील यासंबंधीं विचार करतां दिसून येणारीं चार पांच गमकें सुद्धा मराठीस कशीं लागू पडत नाहीत हें त्यांनी सविस्तर प्रतिपादिलें आहे आणि शेवटीं राजवाड्यांचा आक्षेप निराधार ठरविला आहे. पण ही प्रगति हुरळून जाण्या-अितकी नाही अशी जागींच सूचना देअून मग ते शब्दशुद्धीच्या विचाराकडे वळले आहेत. त्या संबंधांत अिंग्रजी शब्दांबद्दल दुसरे पर्याय योजावेत, परंतु आरबी फारशी शब्द मात्र काढतां येणार नाहीत. कारण ते पूर्ण रुळले आहेत ते काढून टाकले तर कदाचित् व्यक्तीकरणास अडचण होअील, शिवाय ते पूर्णपणें रुळले आहेत, व ते मराठीचे नियम पाळतात असें त्यांनी आपलें मत प्रतिपादिलें आहे. अेकूण प्रतिपादनकौशल्य, तर्कशुद्धता, भाषासौष्ठव अि.

दृष्टींनी श्रीपाद कृष्णांचें भाषण अुल्लेखनीय वाटतें. वरकरणी त्यांचा विषय जरी तात्कालिक असला तरी त्यांतील विवेचन मात्र सार्वकालिक आहे.

त्यापुढील वर्षी ग्वाल्हेरला लोकनायक मा. श्री. अणे हे अध्यक्ष होते. त्यांनी वर्गवारीने सविस्तर वाङमयाचा समालोचनात्मक आढावा घेतला आहे. कादंबरीलेखकांची तरफदारी पण त्यांना करावीशी वाटली. शेवटीं सयमक-निर्यमक वादाबाबत स्वतःचें मत—प्रतिभासंपन्न कवींनीच निर्यमक प्रकार हाताळावा हें सांगून राजवाड्यांच्या आक्षेपास कोल्हटकरांनीं योग्य अुत्तर दिलें असें म्हटलें आहे. शुद्धलेखन व लिपिसुधारणा या गोष्टींचा विचार करण्यासाठी समित्या नेमून त्यांचा निर्णय बंधनकारक मानावा असें सुचविलें आहे.

यापुढे सामाजिक व भाषाविषयक जागृति बऱ्याच प्रमाणांत व्हावयास लागली असें दिसतें. परभाषांच्या आक्रमणाची जाणीव तीव्रतेने होअूं लागली आणि मराठीच्या स्वतःच्या क्षेत्रांत तरी तिला जिवंत ठेवावयास हवी अशी आवश्यकता निर्माण झाली. राष्ट्रीय जागृतीमुळे हा फरक पडणें अपरिहार्य होतें. आजपर्यंतचीं अधिवेशनें मराठीच्या माहेरीं झालीं, परंतु सीमाप्रांतावरची मराठी जेव्हा माहेरीं येअूं लागली, तेव्हा मात्र सीमाप्रांताचें अस्तित्व अुघडपणें दाखवावें लागलें; व म्हणून यापुढे बेळगांव, गोंवें, हैदराबाद (दक्षिण) या ठिकाणीं अधिवेशनें भरलीं. कारण तत्प्रांतीय भाषेचें वा अितरहि आक्रमण मराठीवर होत होतें, त्याचा प्रतिकार करणें राहिलें, तरी निदान त्याविषयीची जाणीव दाखविणें आवश्यक होतें.

चवदावें अधिवेशन शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली बेळगांव येथे भरलें. त्यांच्या भाषणांत त्यांची प्रसिद्धि ज्या कारणांसाठी आहे ते अुपरोध, राष्ट्रीय भावना, व्याजोक्ति अि. गुण प्रकर्षाने आढळून येत नाहीत. प्रथम त्यांनी साहित्यसंमेलनाचा अितिहास, कार्य अि. ची चर्चा करून भाषा व शिक्षण याचा प्रसार कोणत्या कारणांमुळे होतो यांचें विवेचन केलें, आणि हिंदुस्थानांत तरी नागरी लिपीचा प्रसार होणें कसें हितावह आहे हें रोमन लिपीच्या अुदाहरणावरून दाखविलें. शब्दशुद्धीचाहि थोडासा विचार त्यांनी केला आहे. त्यांच्या मतें अितर भाषांतील शब्द घेअून भाषा संपन्न होते, परंतु जर अेखाद्या भाषेविषयीं लोकांत अनादर असेल

तर प्रश्न वेगळा. सरकारजमा पुस्तकें, रससंख्या, सयमक-निर्यमक कविता अि. विषयाचा समाचार घेअून अनुस्वार, शुद्धलेखन, मोडी व नागरी लिपि यांचेंहि पुनरुज्जीवन वा संवर्धन व्हावयास हवें, असें त्यांनी प्रतिपादिलें आहे. शेवटीं नवीन पुस्तकांचा अुल्लेख चमत्कृतिपूर्ण रीतीने, त्यांचीं नांवें वाक्यांत योजून केलेला आहे.

मडगांवला झालेलें वा. म. जोशी यांचें अध्यक्षीय भाषण कितीतरी विषयांचा समाचार घेणारें झालें आहे. तें वाचतांना त्यांचें केळकरांच्या भाषणाशीं असलेलें साम्य पाहून कदाचित् जोशांपुढे तें भाषण आदर्श म्हणून व टीकाविषय म्हणूनहि असावें अशी शंका येते. भाषण अितकें प्रदीर्घ आहे की स्वत: लेखकाला त्याची जाणीव पुन: पुन: करून द्यावी लागलेली आहे. भाषणांत आलेले विषय दोन भागांत विभागतां येतील. पहिल्या विभागांत त्यांनी केलेलें वाङ्मयाचें वर्गीकरण पडेल. अुत्कृष्ट वाङ्मयांत सत्य, शिव, सौंदर्य हे गुण अत्यवश्य आहेत हें प्रतिपादून वाङ्मयीन सत्य, करुणरसापासून होत असलेला आनंद, काव्यानंदाची चिकित्सा अि. अि. विषय खूप विस्ताराने विवेचिले आहेत. त्यांचें विवेचन बरेंच पांडित्यपूर्ण, मार्मिक नि मूलग्राही आहे.

शुद्धलेखनाच्या चळवळीचा अुल्लेख करून भाषाशुद्धीच्या बाबतींत कोल्हटकरांचें मत आपणांस ग्राह्य असल्याचें त्यांनी सांगितलें आहे. कारण वाङ्मयाचा व्याप वाढल्यावर आपोआपच शब्द निर्माण होतील असा त्यांना विश्वास आहे. शेवटीं साहित्यिकांना साहस करण्याचा पण अुपदेश दिला आहे. दुसरा विभाग वाङ्मयाच्या समालोचनाचा असून तें समालोचन त्यांनी सोदाहरण व अतिशय विस्तारपूर्वक केलें आहे.

१९३१ मध्ये ही साहित्यिकांची स्वारी भागानगरावर गेली होती. तेथे अध्यक्ष मात्र अतिशय विद्वान् गृहस्थ लाभले. डॉ. केतकर हे तेथे अध्यक्ष होते. त्यांचें भाषण अत्यंत सडेतोड, स्पष्ट व कळकळीचें झालें आहे. त्यांतील विचारांची मूलभूतता वा आधुनिकता आजहि मनाला मोह पाडते. त्या भाषणाला एक प्रकारचें सार्वकालिकहि महत्त्व आहे. समालोचनाचें काम आपण करणार नाही हें स्पष्टपणें सांगून राजकीय परिस्थितीची चर्चा त्यांनी आपल्या सबंध भाषणभर केली आहे. भाषेचा प्रांतसुद्धा समाजकारण व राजकारण यांपासून भिन्न नाही हें प्रथम त्यांनीच धडाडीने बोलून दाखविलें.

त्यांना भाषेच्या अलंकरणापेक्षा अस्तित्वाचा प्रश्न महत्त्वाचा वाटला व त्यांनी तोच विचारांत घेतला. यानंतर हिंदी संस्थानें कशी दुर्बल आहेत, त्यांना कोणतेंच कार्य करतां येणें कसें शक्य नाही, लोक जागृत न होण्याचीच पोटभरू नोकर कशी काळजी घेतात अि. राजनैतिक दंभस्फोट त्यांनी अत्यंत सडेतोड रीतीने केला. त्याचप्रमाणे राजाची भाषा कोणती असते याचें सोदाहरण स्पष्टीकरण देअून प्रजेची भाषा तीच राजाची भाषा असा निजाम-साहेबांस कळकळीचा सल्ला दिला. विवेचनाच्या मूलभूततेमुळे कितीहि काळ लोटला तरी त्या भाषणाची नवीनता अढळच राहील यांत शंका नाही.

यानंतरचीं चार पांच भाषणें ठराविक सांच्याचीं झालीं. कारण त्यांत कसलेला साहित्यिक कोणीच नव्हता. एक खाडिलकर याला अपवाद आहेत. परंतु त्यांनी आपल्या भाषणांत ज्ञानेश्वरींतील व गीतारहस्यांतील तत्त्व-विवेचनास प्राधान्य दिलें. गीतारहस्य व ज्ञानेश्वरी यांचें लोकसंग्रहाचे बाबतींत साम्य आहे. त्यांच्या भाषणांतील मुख्य विचार म्हणजे 'ज्ञानेश्वरीचें कालांतर, स्थलांतर, भाषांतर म्हणजेच गीतारहस्य' हा आहे. त्या ग्रंथाची विशेष स्तुति त्यांनी केली आहे. तसेंच महाराष्ट्र विद्यापीठ कधी तरी येअील असा विश्वास प्रकट करून त्या चळवळीकरितां प्रा. पोतदारांचें त्यांनी अभिनंदन केलें आहे. शेवटीं स्वकालीन वाङ्मयाचा आढावाहि थोडक्यांत घेतला आहे.

श्रीमंत सयाजीराव व औंधकर यांत सयाजीरावांचें भाषण बरें आहे. त्यांनी मराठी सारस्वताचा युगशः नि सविस्तर आढावा घेअून आधुनिक वाङ्मयांत जनतेच्या गाऱ्हाण्यापेक्षां मुंबअी-पुण्याकडील मध्यमवर्गीय लोकांच्या गाऱ्हाण्यास तेवढा वाव मिळतो अशी तक्रार केली आहे. शेवटीं एका ॲकॅ-डेमीची कल्पना विशद करून महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्याचें दिग्दर्शन केलें आहे.

श्रीमंत औंधकरांचें भाषण खूपच लांबलें आहे. त्यांनी भरपूर अुपदेश केला आहे. तथापि त्यांत साहित्यविषयक महत्त्वाचा भाग अगदींच अल्प आहे. त्यांना सर्वांगीण अुन्नतीची तीव्र अुत्कंठा लागली आहे व तें सर्व कार्य साहित्याच्या संमेलनानें करावें असें त्यांनी सुचविलें आहे. ग्रामोद्धारापासून

तों ललितकलांच्या अुद्धारापर्यंत, निरनिराळ्या वैज्ञानिक शाखांत ग्रंथ निर्माण करण्यापासून तों नाट्यशास्त्राच्या अितिहासासाठीं पारितोषिकदानापर्यंतचें सारें कार्य संमेलनानें करावें असें त्यांना वाटतें. संमेलनाला त्यांनी प्रति-सरकार समजून हा अुपदेश पाजला आहे. 'शिक्षणाची हेळसांड होते, म्हणून चांगलीं पुस्तकें काढावींत म्हणजे थोड्या दिवसांत बेकारी नष्ट होअील' या त्यांच्या एका मतावरून त्यांच्या त्या साऱ्या उपदेशाची कल्पना येअील.

१९३४ मध्ये ना. गो. चाफेकर यांनी बडोदें संमेलनाच्या अध्यक्ष-स्थानावरून जें भाषण केलें त्यांत त्यांनी लिपिशुद्धीची थोडी चिकित्सा करून पुढील कामगिरी मंडळाकडे सोपवावी असें सुचविलें. नंतर ज्ञानाच्या स्वरूपाची थोडी चर्चा करून वाङ्मयाचें विज्ञानशास्त्रें व समाजशास्त्रें असें वर्गीकरण केलें आहे. त्यानंतर अलंकार, काव्यानंद, स्फूर्ति, भावना अित्यादींवर थोडें थोडें लिहून विस्तारानें वाङ्मयाचें समालोचन केलें आहे. तसेंच अुसन्या विचारांचा नवमतवाद्यांवर आक्षेप करून ग्रंथपरीक्षणाचे बाबतींत कशी अनास्था होते हें निदर्शनास आणिलें आहे. मराठी विद्यापीठासंबंधी अगदीच वेगळ्या प्रकारचे विचार त्यांनी प्रकट केलेले आहेत.

आधुनिक विद्वानांचा समावेश :—१९३६ पासून साहित्यक्षेत्रांत नवीन युगास प्रारंभ झाला असें दिसतें. कारण त्या वर्षापासून नवीन पिढींतील विद्वानांना अध्यक्षपदाचा मान मिळूं लागला त्याचा परिणाम साहित्यक्षेत्रांत नवीन वारे खेळावयास लागण्यांत झाला. यापुढील अध्यक्ष कोणत्यातरी चळवळीचे पुरस्कर्ते, प्रवर्तक वा विशिष्ट विचारप्रणालीचे अभिमानी असे आहेत.

१९३६ चें अधिवेशन जळगांव येथें झालें. त्यावेळीं डॉ. माधवराव पटवर्धन यांनी अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. डॉ. पटवर्धनांनी स्वतःला अत्यंत जिव्हाळ्याचा वाटणारा विषय अधिकारवाणीने मांडला. त्यांनी भाषाशुद्धीवर घेतल्या जाणाऱ्या निरनिराळ्या आक्षेपांचें निराकरण केलें आहे. राष्ट्रैक्यास ही चळवळ विरोधी नाही असें दाखवून या संबंधांत धर्मभेदाचासुद्धा प्रश्न अुद्‌भवत नाही असे सांगितलें आहे. चिपळूणकरांच्या तद्विषयक मतांचा सादर समाचार घेअून धुरंधर लेखकांची ढिलाअी या भाषाविषयक शैथिल्याला कशी कारणीभूत आहे

हें पटवून दिलें. स्वाभिमानशून्यतेबद्दल त्यांना पदोपदीं वाओीट वाटतें, जुन्या शब्दांमागे जे संकेत अुभे असतात ते नवीन शब्दांमागे नसतात, या विरोधकांच्या आक्षेपाचे ते शब्द अुपयोगांत आणा, संकेत आपोआप मागून निर्माण होतील असें निराकरण त्यांनी केलें आहे. त्याचप्रमाणे भाषाशुद्धिवाद्यांची भाषा दुर्बोध व सौंदर्यहीन असते (शब्दविषयक अट्टाहासामुळे हे दोष येतात) या आक्षेपाचें निरसन 'प्रसन्न गद्य लिहिणारांनी नवीन शब्द निर्माण करावेत, त्याला आमचा विरोध नाही', असें केलें आहे. स्वकीय शब्द निव्वळ हलगर्जीपणामुळे कसे मरतात, व तसे मेल्याने त्या शब्दांमागे अुभी असलेली संस्कृति, परंपरा कशी भंग पावते हें पटवून दिलें आहे. अिंग्रजी लेखक विदग्ध वाङमयांत परकीय शब्द आणीत नाहीत, शिष्ट भाषेंत त्यांना स्थान नाही अि. अुल्लेख करून ह्या विषयावर नवीनच प्रकाश पाडला आहे. विवेचनांत पुष्कळ शब्दांचा अूहापोह केला आहे.

बॅ. सावरकरांचा मुंबअी अधिवेशनांतील 'अध्यक्षीय निबन्ध' म्हणजे त्यांच्या भाषाविषयक कार्याचा मूर्तिमंत आढावाच होय. त्यांनी कितीतरी छोट्या पण आवश्यक नि सुकर सुधारणा सुचविल्या आहेत. स्वतः केलेल्या चळवळी रूढ झालेल्या होत्या, त्यामुळे त्याविरुद्ध आक्षेप जे थोडे होते त्यांस अत्यंत सूत्रबद्धतेने व आचरणात्मक अुत्तर दिलें आहे. त्यांनी विवेचिलेले मुख्य विषय म्हणजे भाषाशुद्धि, लिपिशुद्धि, राष्ट्रभाषेचा प्रश्न अि. होत. क्रियापददारिद्रय नष्ट करणें, वाक्यांच्या रचनेंत अर्थानुरोधाने विविधता आणणें अि. मार्मिक, स्वीकार्य व सोप्या सुधारणाहि त्यांनी सुचविल्या आहेत. अर्थ व शब्द यांचाहि विचार करून त्यांचा अुल्लेख करणारा या पंचवीस अधिवेशनांतील हा पहिला नि शेवटलाच अध्यक्ष. पण त्यांचें भाषण गाजलें तें या गोष्टीसाठी नव्हे, तर त्यांनी साहित्यिकांना 'लेखण्या टाका व बंदुका घ्या' असा संदेशरूप अुपदेश केला आहे त्यासाठीच. सुभाषचंद्रांनी रोमन लिपि ही भारताची राष्ट्रलिपि व्हावी असें जें मत व्यक्त केलें होतें त्याला सावरकरांनी कितीतरी सुंदर नि समर्पक अुत्तर दिलें आहे.

प्रा. पोतदारांच्या अहमदनगरच्या अध्यक्षीय भाषणांतील कांही गोष्टींचा अुल्लेख मधून मधून वर आलेलाच आहे. त्यांचें वाङमयसमालोचन जंत्रीवजा नाही. तें चिकित्सक बुद्धीवर व प्रांजलपणावर आधारलेलें

असल्यानें मौलिक स्वरूपाचें वाटतें. मुसलमानी अंमलापुढे आमची भाषा नमली नाही. पण अिंग्रजी अंमलापुढे मात्र तिचा टिकाव लागला नाही. कारण ही सर्वव्यापी क्रांति ही अितर दोन क्रांत्यांपासून सर्वस्वी भिन्न होती अि. त्यांचें विवेचन मूलग्राही आहे. भारतवर्ष, चीन, रूस व अमेरिका या संघराष्ट्रांना अितर लहान राष्ट्रांचे नियम लावणें अयोग्य आहे. त्यांचें अेकावयवी राष्ट्रांत रूपान्तर होणें शक्य नाही. तीं संघराष्ट्रेंच राहिलीं पाहिजेत व पुढे अर्थातच येथे असलेल्या संस्कृतीची जोपासना व वर्धन व्हावयास हवें असें प्रतिपादिलें. नंतर विद्यापीठाच्या प्रश्नाची चर्चा करून आपलीं भाषाविषयक अुद्दिष्टें प्राप्त करून घेण्यास प्रभावी संघटनेची आवश्यकता प्रतिपादून 'या ! मराठीची अिरे धरू या ! ' व 'मराठीचा धेंडा मिरवा' असा संदेश दिला आहे. प्रसारक साहित्य, सर्व रसांचें आविष्करण, विचारप्रधान वाङमय, प्रतिबन्धमुक्त प्रतिभा अि. ची आवश्यकता पण जातां जातां पुरस्कारिली आहे.

प्रा. फडक्यांचें रत्नागिरीचें अध्यक्षीय भाषण वृत्तपत्रांतून बरेंच गाजलें. त्याचें कारण त्यांनी वृत्तपत्रव्यवसायाबाबतची अनास्था विशेष बारकाअीने चर्चिली हेंच होय. त्यांनी हा प्रश्न अध्यक्षीय भाषणाकरितां ठेवण्याअितक्या महत्त्वाचा वाटला असें सांगितलें.ग्रांथिक व वृत्तपत्रीय साहित्य असे विभाग कल्पून दैनंदिन व्यवहाराशीं संबद्ध झालेलें वृत्तपत्रीय साहित्य हें जास्त सकस, विशुद्ध व प्रभावी असण्याची आवश्यकता प्रतिपादिली. वृत्तपत्रांवर ध्येयविहीनतेचा अेक आक्षेप घेअून विनोदाच्या नि अश्लीलतेच्या सीमा पुसट झालेल्या आहेत जाहिरातींत लैंगिकविषयक नि औषधांच्या जाहिरातींचें प्रमाण अधिक आहे, व वृत्तपत्रें गेल्या दहा पंधरा वर्षांत वाढलीं तरी त्यांचें तेज व सामर्थ्य मात्र नष्ट होत आहे असें सांगण्याचा प्रो. फडके यांच्या भाषणाचा रोख आहे. या गोष्टींवर नियंत्रण घालण्यासाठी व अितरहि आक्रमक नष्ट करण्यासाठी व पुरोगामी नि क्रांतिकारक वाङमय निर्माण करण्यासाठी लेखक, वाचक, टीकाकार, संपादक–प्रकाशक अि. ची प्रभावी संघटना हवी असें प्रतिपादून पुरोगामी वाङमयाची ओझरती चर्चा जातां जातां केली आहे.

१९४१ चें अधिवेशन सोलापूर येथे झालें व प्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर हे अध्यक्ष होते. खांडेकरांना ललितवाङमयासारखें अत्यंत प्रभावी शस्त्र

या तीव्र धामधुमीच्या काळांत आपलें कार्य बजावूं शकत नाही याची टोंचणी अत्यंत तीव्रतेने लागून राहिली आहे, व हें कार्य जर त्याने करावें अशी इच्छा असेल तर अलीकडच्या वाङ्मयाचें दोषदिग्दर्शन व्हावयास हवें या सद्धेतूने अलीकडील कांही ललितग्रंथांची चिकित्साहि त्यांनी केली आहे. साहित्याच्या व्यापकतेच्या दृष्टीने अितर महत्त्वाचे प्रश्न आहेत, परंतु त्यांच्याहिपेक्षा हा प्रश्न जास्त जिव्हाळ्याचा वाटतो व म्हणून मी त्याचा अुल्लेखहि करीत आहें, असें त्यांनी म्हटलें आहे. काव्य नि विनोद यांत जें अभिरुचिहीनत्व डोकावूं पाहत आहे त्यावर कडक टीका करून, प्रेम व हास्य यांना जीवनांत असलेलें महत्त्व मान्य करून त्यांचें दिग्दर्शन निरोगी मनोवृत्तीने होण्याची आवश्यकता प्रतिपादिली. त्याचप्रमाणे करुण, वत्सल नि वीर था रसांच्या प्रभावी आविष्कारावर भर देण्याची, लेखकांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक अधिष्ठान देण्याची, व नवीन समाजरचनेला योग्य असणारी सामाजिक मनोवृत्ति निर्माण करण्याची, निकड आहे असें कळकळीने सांगितलें आहे. आजच्या लेखनांत भव्यपणाहि नाही नि कलाकुसरहि नाही, हें सांगतांना मध्यमवर्गाच्या मनोभूमिकेच्या मालिन्याचें जें भडक, परंतु वास्तवतापूर्ण विवेचन त्यांनी केलें तें लेखकांना निश्चितपणें मार्गदर्शक होईल अितकें शास्त्रीय आहे. दोषदिग्दर्शनांतून स्वतःला अगर स्वतःच्या कृतींना सुद्धा न वगळण्याचा न्यायनिष्ठुरपणा त्यांनी दाखविला आहे. आजच्या ललितवाङ्मयांत असलेल्या अतिरंजकतेचा दंभस्फोट करून तशा प्रकारें बाह्यांगावर संतुष्ट राहण्याची संवय समाजास मुद्दाम लावण्यांत आली आहे असा आक्षेप त्यांनी घेतला आहे. शेवटीं युद्धाच्या पाशवीपणाचा अुल्लेख करून नव्या जगाचा धर्म, माणुसकी आहे व त्या माणुसकीचा दिव्य संदेश साहित्यिकांनीच समाजापर्यंत पोंचविण्याचें कार्य करावयास हवें असें आग्रहाने प्रतिपादिलें आहे.

थोडेंसें पुनरालोचन :—या ओझरत्या आशयावरून साहित्यिकांचाहि दृष्टिकोण प्रारंभीं म्हटल्याप्रमाणे कसा विशाल होत आहे याची साक्ष पटते. या कालखंडांतील भाषणें विद्वत्तेच्या जुन्या निकषाने पाहूं गेलों असतां कांहींना कमी योग्यतेचीं भासतील, पण त्यांतून समाजाभिमुखतेचा सूर वाहत आहे तो निश्चितपणें आशादायक आहे. त्यांचें विवेचनसुद्धा पूर्वकालीन अध्यक्षां-

प्रमाणे नुसतें मामुली वा औपचारिक स्वरूपाचें नाही, तर तें खऱ्या कळकळीच्या वा पोटतिडिकेच्या योगाने प्रस्फुरित झालेलें आहे आणि म्हणून सामाजिक प्रश्नांना, राष्ट्रीय वा सांस्कृतिक प्रश्नांना, साहित्यांत वाव देण्याचें कार्य जितकें या कालांतील अध्यक्षांनी केलें आहे, तितकें तें त्यापूर्वी क्वचितच झालें आहे. केवळ वाङमयगुण व व्यक्तिमत्त्व यांच्या दृष्टीने जरी पाहिलें, तरीसुद्धा त्यांचें जें दर्शन या भाषणांतून होतें तें अत्यंत विलोभनीय वाटावें असेंच आहे.

: २ :

संमेलनाध्यक्षांच्या या सर्व भाषणांकडे सिंहावलोकनात्मक दृष्टि फिरवली असता मराठी वाङमयाचें क्षितिज दिवसेंदिवस वाढत व प्रगत होत आहे असें दिसून येत असल्याचा अुल्लेख यापूर्वी आलाच आहे. सामान्यतः त्यांतून कोणकोणत्या गोष्टी आलेल्या आहेत त्याचें भाषणशः संकलनात्मक निदर्शन पूर्वार्धांत केलेंच आहे. आता त्यांतून विशिष्ट असे साहित्यविषयक प्रश्न केव्हा नि कोणते अुपस्थित झाले व पुढे त्यांची व्यवस्था (वा वासलात) केव्हा, कशी लागली किंवा अद्यापिहि ते तसेच अनिर्णित राहिले आहेत काय, अेतत्संबंधीचा प्राधान्येंकरून विचार करावयाचा आहे.

येथे अेक गोष्ट न सांगतांहि लक्षांत येअू शकेल ती ही की, ज्या भाषणांतून कांही विशिष्ट प्रश्न अुपस्थित झालेले असतील तेवढ्यांचाच काय तो विचार येथे होअील. अितर केवळ औपचारिक नि कंठाळी स्वरूपाचीं जीं (भाषणें) असतील तीं सर्व साहजिकपणें वगळावीं लागतील हें अुघड आहे.

वैद्यांची मराठीच्या अुत्पत्तीची अुपपत्ति :—कांही तरी विशिष्ट साहित्यविषयक प्रश्न अुपस्थित होण्याच्या दृष्टीने सर्वांत पहिलें चिरस्मरणीय भाषण भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचेंच झालेलें आहे. कांटेकोरपणेंच बोलावयाचें म्हणजे वैद्यांच्या भाषणांतून तसा प्रश्न अुपस्थित झालेला नाही हें खरें; तरी पण त्यांतून अेक विचारपरिप्लुत नि अधिकारपूर्ण असें मत निष्पन्न झालेलें आहे ही गोष्टहि तितकीच महत्त्वाची आहे. मराठीची

पीठिका, तिचा अुत्पत्तिकाल व तिची घटना या प्रत्येक गोष्टीविषयी स्वतंत्र वेगळीं वेगळीं मतें प्रतिपादिलीं जातात, त्यांपैकी वैद्यांचें जें मत होतें तें प्रथम येथे मांडलें गेलें. त्यांच्या कल्पनेप्रमाणे मराठी ही ख्रि. श. पूर्वी पहिल्या शतकांत अुगम पावली. त्याप्रमाणे, तिच्या पीठिकेविषयी सुद्धा त्यांचें असें स्वतंत्र मत आहे. हा विद्वद्गम्य विषय असल्याने अितरेजनांस त्यांत गोडी वाटणें शक्य नसतें. तरी पण त्या व्याख्यानांतून अुद्भवलेला हा अेक पक्ष आहे व त्या गोष्टीचा पूर्ण निःसंदिग्ध निर्णय पुढे कधीकाळी होअील तोंवर वैद्यांचें मत म्हणून तें स्वतंत्रपणें ओळखिलें जाणार हें अुघड आहे.

मराठी भाषा जिवन्त असून वाढत आहे ? :—वैद्यांच्या मागून प्रस्तुत दृष्टीने अुल्लेखनीय भाषण म्हणजे हरिभाअू आपटे यांचें होय. त्यांच्या भाषणांतहि वैद्यांच्या भाषणाप्रमाणे कोणताहि साहित्यविषयक प्रश्न अुपस्थित झालेला नाही. तथापि 'मराठी भाषा मृत्युपंथास लागली आहे' असा अेक विशेष कोलाहल जो त्या कालीं घरोघर माजविला जात होता, त्याचें प्रभावी खंडन त्यांनी त्यांत करून मराठी साहित्याचा पुढचा सबंध मार्ग मोकळा केला आहे. आपटे यांच्या त्या भाषणानंतरच्या आजवरच्या सुमारे पाव शतकाधिक कालांत मराठी भाषेला जें अभिमानास्पद सामर्थ्य प्राप्त झालेलें दिसत आहे, त्याच्या योगानेच त्यांचें म्हणणें पूर्ण सिद्ध झालेलें असल्याने त्यांनी त्या वेळीं आपल्या म्हणण्याच्या पुष्टचर्थ दिलेल्या नानाविध प्रमाणांचा नि केलेल्या विधानांचा आता येथे निर्देशहि करण्याचें प्रयोजन राहिलेलें नाही. त्यानंतर पुन्हा १९२७ मध्ये श्रीपाद कृष्णांनीहि आपल्या भाषणांत तसल्याच आक्षेपाचें खंडन थोडचा निराळचा पद्धतीने केलें आहे. पण तेंसुद्धा अितिहासाचार्य राजवाडे यांच्यासारख्यांनी यापूर्वी नुकताच तद्विषयक निराशावाद वैतागाने पुढे ठेविला होता म्हणूनच. परंतु मुळांतच राजवाडे व कोल्हटकर यांच्या भूमिका परस्परविरोधकांच्या मुळींच नसून तो वाद कोल्हटकरांकडून केवळ विद्वत्समाधानाच्या लालसेनेच आनुषंगिक रीत्या नि खेळीमेळीने हाताळला गेला आहे. यावरून कांही काल अशा प्रकारचा प्रश्न विद्वज्जनांना तरी महत्त्वाचा वाटत होता असें दिसतें.

हरिभाअू आपटे यांनी निरसन करण्याचा प्रयत्न केलेली आणखी अेक छोटी गोष्ट जातां जातां येथें अुल्लेखावीशी वाटते. ती म्हणजे सामान्यतः

समकालीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांविषयी लोकांमध्ये बहुधा सर्व कालीं अुपेक्षावृत्ति नि अनादर असतो हा आक्षेप होय. या आक्षेपाचें आपट्यांनंतर १९२१ मध्ये न. चिं. केळकर यांनीहि आपल्या अितर विवेचनांत आनुषंगिक रीत्या बरेंच निरसन केलें आहे. मुळांत आक्षेप अेकच असल्यामुळे दोघांच्या निराकरणांत साहजिकपणें बरेंच साम्य आहे.

'सयमक-निर्यमक' वाद :—मराठी काव्याच्या क्षेत्रांत सयमक-निर्यमक वाद अेके काळीं थोडाफार महत्त्व पावला होता. त्याचा पडसाद प्रामुख्याने १९१७ मधील आगाशे यांच्या भाषणांत अुमटला आहे. त्या वादाची चर्चा आगाशे यांनी बरीच विस्ताराने केली. समयक रचनेला आधार केवळ पूर्वीच्या मराठी कवितेंतील अेकजात परंपरेचाच. पण संस्कृत व अिंग्रजी या दोन्हीहि साहित्यांची साक्ष त्याच्या अुलट पडत असल्याने कविता 'सयमकच' हवी असें अेकांतिक प्रतिपादन करणें आगाशे यांना शक्य नव्हतें. तथापि रूढ परंपरेच्या आहारीं गेल्यामुळे त्यांनी विस्तृतपणें अूहापोह करूनसुद्धा शेवटीं "विशेष प्रतिभेच्या कवीनेच सयमकतेची रूढि मोडण्याचें धाडस केल्यास चालेल" अशा आशयाचा गुळमुळीतच निर्णय दिला आहे!! त्यानंतर १९२८ मध्ये वस्तुतः अुपर्युक्त वाद त्या वेळीं तितका तीव्र राहिलेला नसतांना सुद्धा माधवरावजी अणे यांनी त्यासंबंधी थोडेसें विवेचन करून वरीलसारखेंच मत प्रतिपादिलें. अलीकडे 'मुक्तच्छंदा'ची प्रथा नवीनच विचारांत येत असल्याने व स्वतःहि त्या धर्तीवर 'वैनायक' हें नवीन वृत्त प्रचलित केलेलें असल्यामुळे सावरकरांनीहि 'सयमक-निर्यमकवादा'चा अुल्लेख केला. पण तो केवळ आनुषंगिकच असून त्यांनी तो प्रश्न स्पष्टपणें तिय्यम महत्त्वाचाच म्हणून लेखिला आहे.

'सहेतुक-अहेतुक' वाङ्मय :—पण सयमक-निर्यमकाचा वाद हा किती झाला तरी कवितेच्या बाह्यांगीण स्वरूपाविषयीचाच होता; तिच्या अंतः-स्वरूपाशीं भिडणारे असेहि कित्येक प्रश्न विवेचनाची वाट पाहत होतेच. तशा कांही प्रश्नांचा स्वतंत्र मूलगामी असा विचार प्रथम न. चिं. केळकर यांच्याच भाषणांत प्राधान्याने केलेला आढळतो. अर्वाचीन मराठी काव्याच्या स्वरूपासंबंधाचें त्यांचें सर्व विवेचन अगदी नवीनच होतें; पण तें वास्तव असल्याने विवाद्यतेचा प्रश्नच तेथे फारसा अुद्भवू शकला नाही. परंतु

काव्यशास्त्रदृष्टचा दोन मोठचा तात्त्विक प्रमेयांचा जो त्यांनी अुपन्यास केला तोच खरा वैशिष्टचपूर्ण होता. 'ललितवाङ्मयामागे हेतुसंशोधना'चा गुप्त पोलिस नको हें मत प्रतिपादून 'कलेसाठी कला' या त्यानंतर पुष्कळच गाजलेल्या वादाचा त्यांनीच मूळ पाया घातला म्हटलें तरी चालेल. परंतु त्या संबंधांत स्वतः अशा प्रकारें प्रवर्तक असूनहि पुढे त्यांचेंच जें मतपरिवर्तन झालें तें लपविण्याचाहि प्रा. फडके यांच्यासारखा आग्रही प्रयत्न त्यांनी कधीच केलेला नाही. पण त्यामुळे तो वाद मात्र मुळांतच दुबळा असल्याचें आयतेंच सिद्ध झालें. वास्तविक हा वाद मराठींत पुष्कळ दिवसपर्यंत महत्त्व पावला होता, व ज्याप्रमाणे अलीकडे प्रत्येक सन्मान्य व विचारशील साहित्यिकाला 'पुरोगामी वाङ्मया'ची, त्याच्या व्याख्येची वा तत्संबंधी अितर चर्चा करावीशी वाटते, त्याप्रमाणे कांही कालपर्यंत प्रत्येक नामवंत साहित्यिकाला या वादांतील आपापला पक्ष वेळोवेळीं प्रकट करण्याची जरुरी वाटत असे. परंतु समाजपरिस्थितीचे रंग इतक्या लवकर बदलत आहेत की नवीन जिवन्त नि जिव्हाळ्याच्या प्रश्नांपुढे हा प्रश्न जवळ जवळ सध्यातरी विरोधीपक्षाचे बाजूने निकालांतच निघाल्यासारखा दिसतो. १९२० पुढील अध्यक्षीय भाषणांत याचा अुल्लेख मात्र कोणीं विशेष केलेला दिसत नाही. याचें कारण तो प्रश्न जिवंत असेपर्यंतच्या कालांतील बहुतेक अध्यक्ष जुन्या पिढींत मोडण्यासारखे आणि पुढे ज्या वेळीं नवीन विचारांच्या पिढीला या पदाचा मान मिळूं लागला त्या वेळीं तिच्यापुढे अितर महत्त्वाचे प्रश्न होते नि प्रस्तुत प्रश्नाची वर अुल्लेखिल्याप्रमाणे वासलात लागली होती. आजहि क्वचित् अेखादा साहित्यिक ह्या निकालांत निघालेल्या प्रश्नावर आपले विचार प्रकट करून शिळ्या कढीस अूत आणण्याचा प्रयत्न करतांना आढळतो!

'सविकल्प समाधी'ची अुपपत्ति :—केळकरांनी अुपस्थित केलेला दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे काव्यानंदाविषयींचा. तेथे त्यांनी आपली 'सविकल्प समाधी'ची स्वतंत्र नि अभिनव कल्पना मांडली. अेक विचारणीय अुपपत्ति म्हणून त्या शास्त्रांतील तज्ज्ञांनीहि विशेष मान देण्यासारखी ती कल्पना होती. पुढे १९३० मधील अध्यक्षीय भाषणांत प्रा. वा. म. जोशी यांनी त्या कल्पनेवर ज्या शंका घेतल्या आहेत त्यावरून केळकरांचें त्या

संबंधांतलें म्हणणें हें शेवटचें वा निर्णायक नव्हे हें स्पष्ट झालें. परंतु तरीहि सत्या'च्या विविध पैलूंपैकी अेक त्यांनी अुजळून पुढे ठेविला हें निरपवादच होय',

'करुणरसानन्द नि कॅथार्सिस ':——वाङ्मयासंबंधीची अशीच मूलगामी तात्त्विक चर्चा करणारें दुसरें व्याख्यान प्रा. वा. म. जोशी यांचें झालें. त्यांनी वाङ्मयाचें स्वरूप बोधपूर्व व अबोधपूर्व असें द्विविध कल्पिलें आहे. तसेंच वाङ्मयाचें ध्येय जरी आनंद हेंच असलें तरी तो सत्य, सौजन्य व सौंदर्य यांच्या अस्तित्वाने निर्माण झालेला असावा हें त्यांच्या नांवावर अधिकृत म्हणून मान्य असलेलें मत मांडलें. मराठींत या शास्त्राची चर्चा पुष्कळच झाली आहे. दुसरा प्रश्न त्यांनी जो चर्चिला तो म्हणजे 'करुणरसापासून आनंद कां होतो' हा होय. या संबंधांत पूर्वकालींहि पुष्कळ अुपपत्ति पुढे आलेल्या असून त्यांतलें ॲरिस्टॉटल्चें कॅथार्सिसचें तत्त्व त्यांना मान्य असल्याचें त्यांनी बऱ्याच विस्ताराने पटवून दिलें आहे. त्यांतहि कॅथार्सिस या शब्दापासून निष्पन्न होणाऱ्या अर्थाविषयीचें त्यांचें स्पष्टीकरण नावीन्यपर, मार्मिक नि कौतुकास्पद असें आहे. अर्थात् त्यासंबंधांतहि पुष्कळच शंका विचारतां येतील; फार काय, करुणरसापासून आनंद होतोच की काय हा मुळांत अेक प्रश्न आहे !——म्हणजे, जी अनुकूल सुखसंवेदना होते तिच्या स्वरूपाविषयीहि पुष्कळ विवाद्य खलबत करतां येअील. पण तें कांहीं असलें तरी जोशी यांच्या विवेचनाचें महत्त्व त्यायोगें रतिमात्रहि अल्प होत नाही.

काव्याच्या बाबतींत शिवरामपंत परांजपे व ना. गो. चापेकर यांनी पण चर्चा केली आहे. परंतु त्यांनी त्यांत कोणतेंहि मत अट्टाहासाने मांडलेलें नाही. परांजप्यांनी रससंख्येविषयी थोडें विवेचन करून संस्कृत शास्त्राच्या आधाराने आजवरच्या रूढ रसव्यवस्थेंत पालट करतां येणें शक्य आहे असें प्रतिपादिलें आहे. चापेकरांचें विवेचन सामान्य स्वरूपाचें आहे. या प्रकारच्या अवलोकनावरून मराठी भाषा काव्य, रस, लालित्य अि. चें शास्त्रीय विवेचन करण्यास बरीच लवचिक झाली आहे; व लेखकांच्या परिणत प्रज्ञेमुळे तिच्यांत साहित्यविषयक स्वतंत्र नवीन मतें व संप्रदाय निर्माण होतील अशी आशा करावयास पुष्कळ वाव आहे.

काव्यनाटकादि ललितकलांवर अशा प्रकारचें पांडित्यपूर्ण प्रवचन अलीकडील अध्यक्षांच्या भाषणांतून आढळत नाही. त्यामुळे अेका विशिष्ट

विचारसरणीचे लोक त्यांची मौलिकता कमी लेखण्याचा प्रयत्न करतात. परंतु हीं विवेचनें मराठीच्या अलंकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचीं असल्याने आजच्या समाजक्रांतीच्या दिवसांत त्या प्रश्नांना जिवंतपणा लाभेल असें वाटत नाही, व या प्रश्नांवर विचार करणें वा लेखन करणें हा समाजविन्मुख विद्वत्तेचा भाग समजला जातो. आणि म्हणून हे प्रश्न येथून पुढे कांही कालपर्यंत तरी थोड्याशा विद्वानांपुरतेच व तद्विषयीच्या अभ्यासकांपुरतेच मर्यादित राहणार हें उघड आहे.

'राजसंस्था नि साहित्य' :--डॉ. केतकरांच्या भाषणास वेगळें स्वतंत्र असें स्थान द्यावें लागेल. त्यांनी विशिष्ट प्रकारचे प्रश्न विचारांत घेतले वा निर्माण केले नाहीत. तरी पण त्यांच्या विचाराचें अधिष्ठान अर्वाचीन साहित्यविषयक चळवळींना आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. आणि त्यांच्या विवेचनामुळे कित्येक जीर्णमतवाद्यांना तें भाषण कदाचित् साहित्य-विषयक आहे असें वाटणारहि नाही. त्यांनी राजकीय सत्तेच्या अभावीं साहित्याची प्रगति होऊं शकेल काय, हा अेक नित्याचाच विचार करण्याजोगा प्रश्न निर्माण करून ठेविला आहे. राजकीय वा सांस्कृतिक विचारांचा आज जो विकास झाला आहे त्यामुळे राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांची अेकरूपता आज समाजास पटलेली आहे.

अेक गौण तात्त्विक प्रश्न :--खाडिलकरांचें भाषण बहुतांशीं तत्त्व-प्रधान नि विद्वत्ताप्रचुर असें झालें. त्यांनी ज्ञानेश्वरी नि गीतारहस्य यांचें जें साम्य त्यांत दर्शविलें आहे तें स्वतंत्र ग्रंथनिविष्टतेने पुढे आलेलें नाही. म्हणून तें त्या दोन ग्रंथांच्या लेखकांविषयीं त्यांना वाटणाऱ्या अभिमानाचेंच केवळ द्योतक आहे की तत्त्वदृष्टया खरोखर अेक प्रकारचें साम्य दोहोंत आहेच, हें समजणें बरेंच कठिण आहे. पण त्यांत पहिलीच शक्यता अधिक वाटते. तसेंच हें विवेचन साहित्याच्या प्रांतांत कितपत पडेल हाहि अेक प्रश्नच आहे.

नवमतवाद्यांवरील आक्षेप :--ना. गो. चापेकरांनी नवमतवाद्यांवर त्यांचे विचार उसने असतात असा अेक आक्षेप जातां जातां केला आहे. हा आक्षेप आपटयांचे वेळींहि घेतला जात होता. औंधकरांनी मात्र नवमत-वाद्यांचा कैवार घेतला आहे तो बहुधा 'किर्लोस्कर' मासिक ही त्या वादाची प्रमुख पुरस्कर्ती संस्था त्यांच्या राज्यांत नांदत नि भरभराटत असल्यामुळेंच

की काय न कळे ! बाहेरच्या वातावरणांत हा प्रश्न अेकेकाळीं बराच गाजत होता आणि आजहि नवनवीन विचारांचा ते केवळ परदेशीय म्हणून अुपहास केला जातो. ह्या परंपरेचीं बीजें अव्वल अिंग्रजींतील आगरकरादि पहिल्या सुधारकांपर्यंत जाअून पोंचतात. आणि स्वतंत्र हिंदुस्थानची स्वतःची वैचारिक वा सांस्कृतिक परंपरा वा तद्विषयक मूल्यें निर्माण होओीपर्यंत अशा प्रकारच्या आक्षेपकांचा वर्ग अखंड राहणारच व त्या विरोधाला कधी कधी महत्त्वहि प्राप्त होणार.

'भाषाशुद्धी'चा प्रश्न :—१९३६ च्या जळगांवच्या अधिवेशनांतील माधवराव पटवर्धन यांचें भाषण अथपासून अितीपर्यंत केवळ भाषाशुद्धीचा अेक-मेव पुरस्कार करणारें होतें. पूर्वी सावरकरांनी स्वतंत्र चळवळीने त्या वादाला जी चालना दिली होती तिचेच पटवर्धन हे निष्ठावंत पाअीक बनलेले होते. कोल्हटकर व परांजपे यांनी त्या प्रश्नाची आपापल्या भाषणांतून चर्चा केली, तथापि त्याचें खरें अंतरंगच त्यांना आकलन झालें नसल्यामुळे त्यांची चर्चा केवळ विरोधापलीकडे फारशी पोहोचली नाही. पण पटवर्धन-सावरकरांची गोष्ट त्याच्या अगदी अुलट होती. ते दोघे त्या मताचे प्रवर्तक नि पुरस्कर्ते असल्यानें त्यांस आवश्यक असणारा योग्य तो अभिनिवेश नि आत्मविश्वास त्यांच्या ठायीं होता. त्या सर्वांचें अिंग्रजी शब्द जसेच्या तसे सहसा घेअू नयेत या बाबतींत अेकमत आहे. आपटे मात्र धंद्यांसंबंधीचे शब्द घ्यावेत असा सल्ला देतात व फारशी जशी पचविली तशी अिंग्रजी पण पचविली पाहिजे असें प्रतिपादितात. कोल्हटकरांनीं जो या विषयाचा विचार केला तो राज-वाड्यांच्या आक्षेपाचें ह्या मुद्द्यावर अधिष्ठान होतें म्हणून. तरी पण ते अिंग्रजी शब्द अुगाच वापरण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करतात. परंतु तसें होणें (शब्द घेणें) अपरिहार्य आहे. कारण नवीन कल्पना, वस्तु यांबरोबर शब्द नवीन येणारच. फारशी शब्दांना योग्य (मराठी) पर्याय सांपडत नाहीत अशा शब्दांची यादी त्यांनी (कोल्हटकरांनी) दिली आहे, व ज्याअर्थी हे शब्द मराठीचे नियम पाळतात त्याअर्थी ह्यांस मज्जाव नसावा असा त्यांच्या विवेचनाचा रोख आहे. परांजप्यांनी सुद्धा असें मत दिलें, परंतु अेखाद्या राष्ट्राच्या लोकांस अेखाद्या राष्ट्राच्या भाषेविषयी तिरस्कार वाटत असल्यास त्यांनी त्या शब्दांवर बहिष्कार टाकला तर तें योग्य आहे असें आयर्लंडचें अुदाहरण देअून पटविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

पटवर्धन-सावरकरांना या बाबतींत हलगर्जीपणा, ढिलाई, दास्यवृत्ति दिसते, आणि ही अुपेक्षावृत्ति घालविण्याची तळमळ त्यांना लागून राहिली आहे. या चळवळीने मराठी भाषेची 'सर्गशक्ति' वाढविली व क्षुल्लक गोष्टींतहि जागरूकता असणें किती आवश्यक आहे हें पटवून दिलें. दुसरा चांगला परिणाम म्हणजे मराठींत बोलत वा लिहीत असतांना अिंग्रजी शब्दांना मराठी पर्याय न सुचणें ही कमीपणाची गोष्ट समजली जाते ही होय. या भाषाशुद्धीवाल्यांस कोणी विरोध करूं शकत नाही व करूं नयेहि. त्यांच्या प्रयत्नाने मराठी भाषेची सर्गशक्ति खात्रीने वाढण्यास व तिचें सामर्थ्य वर्धमान होण्यास साहाय्यच होणार आहे. कारण, शब्दांसाठी आता जुन्या वाङमयाकडे वळावें लागतें व त्यांतील शब्द वापरल्यास विद्वेषी वृत्तीचा आक्षेप कोठे येतो! जवाहरलालजींनी हिंदी-अुर्दू वादांत हीच भूमिका घेतली आहे. ते म्हणतात, संस्कृतनिष्ठ हिंदी नि फारशीनिष्ठ अुर्दू हे दोन्ही पंथ वाढूं द्या. त्याने भाषा समर्थ होअील. मग जेव्हा त्या विद्वानांना आपण कोणासाठी लिहीत आहोंत याची जाणीव होअील त्यावेळीं आपोआपच शब्दाचें जडजंबाल बाजूस ठेवून लोकांच्या भाषेंत लिहावें लागेल. तीच भूमिका येथेहि घ्यावयास हरकत नाही. नवीन पिढींतला मराठी लेखक दोन्ही शब्द वापरण्यास पूर्णपणें मोकळा आहे. तो 'कबूल'प्रमाणे 'मान्य' शब्दहि योजील, आणि 'खर्च' शब्दाबरोबर 'व्यय' शब्दहि त्याला आठवेल; नि 'अत्तर' लावतां लावतां 'फुलेल' शब्दाची गोडी याला आवडेल; आजहि या जाणिवेने जो बारकाअीने पाहील त्यास हें स्पष्टपणें कळावयास लागेल. परकीय राजवटींत भाषेवर परकीय शब्दांच्या वापराने आपली भाषा आपण शबलित करतों, त्याप्रमाणांत आपण स्वसंस्कृतीपासून दूर जातों. ही रुखरुख भाषाशुद्धीच्या चळवळीमागे आहे हें स्पष्ट आहे.

भाषाशुद्धीची चळवळ आज अैतिहासिक चळवळींत जमा करावी लागेल, व म्हणूनच तिची फलश्रुति वर दिलेली आहे. किंबहुना सावरकरांच्या १९३८ मधील भाषणांत त्यांनी दिलेल्या आचरणात्मक सूत्रांवरूनहि तेंच दिसून येतें. आर्थिक प्रश्नांपुढे सांस्कृतिक प्रश्नांना गौणत्व प्राप्त होत असलें तरी त्या बाबतींतली जागरूकता राष्ट्राच्या सर्वांगीण विकासास नुसती अुपकारकच नव्हे तर अत्यंत आवश्यक ठरते.

'**लिपिशुद्धि**' :—बॅ. सावरकरांनी ज्या साहित्यविषयक चळवळींना चालना दिली त्यांपैकी अेक लिपिशुद्धीची चळवळ होय. हा प्रश्न साहित्यापेक्षा मुद्रणांशीं जास्त निगडित झालेला आहे, आणि लिपिसुधारणेची आवश्यकता पटून सोलापूर अधिवेशनांत लिपिसुधारणा समिति नेमिली जाअून तिने कांही महत्त्वाचे निर्णय घेअून त्यांस संमेलनाची संमति पण मिळाली आहे. वास्तविक पाहतां लिपीला सांस्कृतिक व पारंपरिक महत्त्व असतें व म्हणून ती बदलण्याची वेळ सहसा येअू नये. जपानचें अेक अुदाहरण असें देतां येतें की, त्या राष्ट्राने आपली लिपि न बदलतां यांत्रिक सुधारणेने ती मुद्रणसुकर अशी बनविली.जपानची लिपि ही चित्रलिपि असल्याने ती देवनागरीपेक्षा किती तरी अवघड, परंतु तीसुद्धा जपानने बदलली नाही. असें असलें तरी मूळची सुकर नागरी लिपि थोड्या सुधारणांमुळें जास्त सुकर झाली तर त्या करण्यास प्रत्यवाय नसावा. अेकदां ही भूमिका अंगीकारिली तर नागरी लिपि अिंग्रजी-अितक्याच सुलभतेने (मोनोटाअीप'वरती बसलेलीच आहे, पण) टंकयंत्रावर (टाअिपरायटर)बसलेली आढळून येअील. आणि हें सर्व झाल्यावर व मराठी लेखक मराठी टंकयंत्रें वापरूं लागल्यावर तिचें जें विशाल नि व्यापक स्वरूप होअील तें विलोभनीय वाटेल ! युद्धानंतर अल्पावधींत कदाचित या प्रश्नांना दृश्य स्वरूप आलेलें आढळेल नि अेका दृष्टीनें हा प्रश्न तूर्त तरी निकालांत निघाल्यासारखा होअील.

'**राष्ट्रलिपि**' :—लिपीच्या प्रश्नांत राष्ट्रलिपीचा पण समावेश व्हावयास हरकत नाही. शि. म. परांजप्यांनी 'देवनागरी'ला भारतीय स्वरूप दिल्यास बरें होअील असें सुचविलें. आणखीहि अणे-चापेकरांसारख्यांनी या प्रश्नाचा ओझरता अूहापोह केला आहे. सावरकरांनीं अहट्टाहासाने देवनागरी हीच 'राष्ट्रलिपि' झाली पाहिजे असें सांगून तिच्या पुष्टयर्थ शास्त्रशुद्धतेचीं जीं गमकें दिलीं आहेत तीं बिनतोड आहेत. रोमन लिपीची हजेरी सावरकरांनी योग्य रीतीने घेतली. त्यांनी रोमन लिपीचें अपूर्णत्व पूर्णपणें नजरेस आणलें. खरोखर मराठी (संस्कृत, हिंदी अि.) भाषा रोमन लिपीवर बसवावयाची म्हटली तर त्या लिपींत कितीतरी सुधारणा कराव्या लागतील. अितकेंहि करून लिपीमागील संकेत दुसऱ्या लिपींत अुतरणें अशक्य आहे ! 'दलित' हा शब्द रोमन लिपींत Dalita असा लिहिला तर त्यामागील दृश्य संकेत

लोप पावल्याने तो वाचल्यास अर्थाबद्दल विचार करावा लागेल; आणि अुच्चाराच्या बावतींत तर रोमन लिपि अितकी दुबळी आहे की, हाच शब्द ६४ प्रकारें मराठींत अुच्चारितां येईल. आमचीच लिपि जर यंत्रसिद्ध झाली, तर ती सौंदर्य सुकरता नि शास्त्रशुद्धता या बाबतींत जगांतील कोणत्याहि लिपीस हार जाणार नाही—नव्हे खरोखर कधी काळीं जगाचें अेक संघराज्य 'Federation' अस्तित्वांत आलें तर आणि विश्वलिपीचा प्रश्न निघाला तर हीच लिपिं त्या मानास योग्य ठरावी अशी तिची योग्यता आहे.

किरकोळ नि गौण प्रश्नांचा परामर्श : ग्रंथ-निर्मिति-योजना : मराठी भाषेच्या वर्धनाच्या दृष्टीने ज्या निरनिराळ्या योजना पुढे आलेल्या आहेत त्यांमध्ये ग्रंथनिर्मिति वाढण्यासाठी 'अॅकॅडमी'वजा कल्पना पुष्कळांनी सुचविल्या आहेत, ग. ज. आगाशांनी अेका फ्रेंच संस्थेचें अुदाहरण वर्णन केलें. पण त्याला बरेंच काल्पनिक स्थान द्यावें लागेल. कारण व्यवसायदृष्टचा कांहीच सुचविलें वा योजिलें गेलें नाही. किब्यांनी योजनेला जास्त वास्तव स्वरूप दिलें परंतु तिचीहि पण वासलात तीच लावितां येअील. सयाजीरावांनी जातां जातां या कल्पनेचा पुनरुच्चार केला आहे.

यावरून असें दिसून येतें की, या कल्पना या नुसत्या कल्पना म्हणूनच त्यांनी सुचविल्या. त्या प्रत्यक्ष अस्तित्वांत अुतरविण्याची आवश्यकता कोणासच भासलेली दिसत नाही. प्रो. फडके, पोतदार यांनी आधुनिक कालानुसार वाचक, लेखक अित्यादि लोकांची अेक प्रभावी संघटना असावी असें प्रतिपादिलें आहे. अर्थात् त्यांचा प्रत्यक्ष अवतार झाला किंवा नाही याबाबत आज कांहीच लिहितां येत नाही.

ग्रंथावरील टीका :— ग्रंथावरील टीकेबाबतहि तेंच. ग्रंथसमीक्षण होणें व तें निःस्पृहतेने होणें वाङमयवृद्धीस हितावह आहे याबाबत कोणाचेंहि दुमत होणें शक्य नाही. परंतु तें मराठींत सचोटीने होत नाही असें बऱ्याच अध्यक्षांनी म्हटलें आहे. या विषयावर श्री. कृ. कोल्हटकर, शि. म. परांजपे, डॉ. केतकर यांनी लिहिलें आहे. केतकरांच्या 'वाङमयआढावा समीती'चा पण येथेच अुल्लेख हवा. पूर्वी सरकारकडूनच अशा प्रकारचें अधिकृत परीक्षण होत असे; तें परत व्हावें असा पण सल्ला कांहीनी दिला आहे. प्रा. फडक्यांनी या प्रश्नाचा विचार करणारी मध्यवर्ती अधिकृत संस्था

'लिपिशुद्धि' :—बॅ. सावरकरांनी ज्या साहित्यविषयक चळवळींना चालना दिली त्यांपैकी अेक लिपिशुद्धीची चळवळ होय. हा प्रश्न साहित्यापेक्षा मुद्रणांशीं जास्त निगडित झालेला आहे, आणि लिपिसुधारणेची आवश्यकता पटून सोलापूर अधिवेशनांत लिपिसुधारणा समिति नेमिली जाअून तिने कांही महत्त्वाचे निर्णय घेअून त्यांस संमेलनाची संमति पण मिळाली आहे. वास्तविक पाहतां लिपीला सांस्कृतिक व पारंपरिक महत्त्व असतें व म्हणून ती बदलण्याची वेळ सहसा येअू नये. जपानचें अेक अुदाहरण असें देतां येतें की, त्या राष्ट्राने आपली लिपि न बदलतां यांत्रिक सुधारणेने ती मुद्रणसुकर अशी बनविली.जपानची लिपि ही चित्रलिपि असल्याने ती देवनागरीपेक्षा किती तरी अवघड, परंतु तीसुद्धा जपानने बदलली नाही. असें असलें तरी मूळची सुकर नागरी लिपि थोडया सुधारणांमुळें जास्त सुकर झाली तर त्या करण्यास प्रत्यवाय नसावा. अेकदां ही भूमिका अंगीकारिली तर नागरी लिपि अिंग्रजी-अितक्याच सुलभतेने (मोनोटाअीप'वरती बसलेलीच आहे, पण) टंकयंत्रावर (टाअिपरायटर)बसलेली आढळून येअील. आणि हें सर्व झाल्यावर व मराठी लेखक मराठी टंकयंत्रें वापरूं लागल्यावर तिचें जें विशाल नि व्यापक स्वरूप होअील तें विलोभनीय वाटेल ! युद्धानंतर अल्पावधींत कदाचित या प्रश्नांना दृश्य स्वरूप आलेलें आढळेल नि अेका दृष्टीने हा प्रश्न तूर्त तरी निकालांत निघाल्यासारखा होअील.

'राष्ट्रलिपि' :—लिपीच्या प्रश्नांत राष्ट्रलिपीचा पण समावेश व्हावयास हरकत नाही. शि. म. परांजप्यांनी 'देवनागरी'ला भारतीय स्वरूप दिल्यास बरें होअील असें सुचविलें. आणखीहि अणे-चापेकरांसारख्यांनी या प्रश्नाचा ओझरता अूहापोह केला आहे. सावरकरांनीं अहट्टाहासाने देवनागरी हीच 'राष्ट्रलिपि' झाली पाहिजे असें सांगून तिच्या पुष्टयर्थ शास्त्रशुद्धतेचीं जीं गमकें दिलीं आहेत तीं बिनतोड आहेत. रोमन लिपीची हजेरी सावरकरांनी योग्य रीतीने घेतली. त्यांनी रोमन लिपीचें अपूर्णत्व पूर्णपणें नजरेस आणलें. खरोखर मराठी (संस्कृत, हिंदी अि.) भाषा रोमन लिपीवर बसवावयाची म्हटली तर त्या लिपींत कितीतरी सुधारणा कराव्या लागतील. अितकेंहि करून लिपीमागील संकेत दुसऱ्या लिपींत अुतरणें अशक्य आहे ! 'दलित' हा शब्द रोमन लिपींत Dalita असा लिहिला तर त्यामागील दृश्य संकेत

लोप पावल्याने तो वाचल्यास अर्थाबद्दल विचार करावा लागेल; आणि अुच्चाराच्या बाबतींत तर रोमन लिपि अितकी दुबळी आहे की, हाच शब्द ६४ प्रकारें मराठींत अुच्चारितां येईल. आमचीच लिपि जर यंत्रसिद्ध झाली, तर ती सौंदर्य सुकरता नि शास्त्रशुद्धता या बाबतींत जगांतील कोणत्याहि लिपीस हार जाणार नाही—नव्हे खरोखर कधी काळीं जगाचें अेक संघराज्य 'Federation' अस्तित्वांत आलें तर आणि विश्वलिपीचा प्रश्न निघाला तर हीच लिपिं त्या मानास योग्य ठरावी अशी तिची योग्यता आहे.

किरकोळ नि गौण प्रश्नांचा परामर्श : ग्रंथ-निर्मिति-योजना : मराठी भाषेच्या वर्धनाच्या दृष्टीने ज्या निरनिराळ्या योजना पुढे आलेल्या आहेत त्यांमध्ये ग्रंथनिर्मिति वाढण्यासाठी 'अॅकॅडमी'वजा कल्पना पुष्कळांनी सुचविल्या आहेत, ग. ज. आगाशांनी अेका फ्रेंच संस्थेचें अुदाहरण वर्णन केलें. पण त्याला बरेंच काल्पनिक स्थान द्यावें लागेल. कारण व्यवसायदृष्ट्या कांहीच सुचविलें वा योजिलें गेलें नाही. किब्यांनी योजनेला जास्त वास्तव स्वरूप दिलें परंतु तिचीहि पण वासलात तीच लावितां येअील. सयाजीरावांनी जातां जातां या कल्पनेचा पुनरुच्चार केला आहे.

यावरून असें दिसून येतें की, या कल्पना या नुसत्या कल्पना म्हणूनच त्यांनी सुचविल्या. त्या प्रत्यक्ष अस्तित्वांत अुतरविण्याची आवश्यकता कोणासच भासलेली दिसत नाही. प्रो. फडके, पोतदार यांनी आधुनिक कालानुसार वाचक, लेखक अित्यादि लोकांची अेक प्रभावी संघटना असावी असें प्रतिपादिलें आहे. अर्थात् त्यांचा प्रत्यक्ष अवतार झाला किंवा नाही याबाबत आज कांहीच लिहितां येत नाही.

ग्रंथावरील टीका :— ग्रंथावरील टीकेबाबतहि तेंच. ग्रंथसमीक्षण होणें व तें निःस्पृहतेने होणें वाङ्मयवृद्धीस हितावह आहे याबाबत कोणाचेंहि दुमत होणें शक्य नाही. परंतु तें मराठींत सचोटीने होत नाही असें बऱ्याच अध्यक्षांनी म्हटलें आहे. या विषयावर श्री. कृ. कोल्हटकर, शि. म. परांजपे, डॉ. केतकर यांनी लिहिलें आहे. केतकरांच्या 'वाङ्मयआढावा समीती'चा पण येथेच अुल्लेख हवा. पूर्वी सरकारकडूनच अशा प्रकारचें अधिकृत परीक्षण होत असे; तें परत व्हावें असा पण सल्ला कांहीनी दिला आहे. प्रा. फडक्यांनी या प्रश्नाचा विचार करणारी मध्यवर्ती अधिकृत संस्था

असावी असें मत मांडिलें आहे. अर्थात् ह्या कल्पना विवाद्य ठरल्या तरी हा प्रश्न विवाद्य होऊं शकत नाही, व म. सा. पत्रिकेंत या दृष्टीने परीक्षणें सडेतोड, निर्भीड येतहि असतात. आणखी प्रयत्न या दृष्टीने (दिशेने) होत आहेत, पण ते मामुली स्वरूपाचे.

मराठी नि विद्यापीठ :––संवर्धनाच्या दृष्टीने यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मराठीचा विद्यालयांत प्रवेश होण्यासंबंधीचा, व शेवटीं स्वतंत्र विद्यापीठाचा. हे दोनही भाग आज विवाद्य स्वरूपाचे नाहीत. मुंबअी विश्वविद्यालयांत आज महाविद्यालयांत (सर्व वर्षांत) अेक विषय म्हणून तरी स्थान मिळालें आहे अर्थात् विद्यापीठाची बोधभाषा होणें ही गोष्ट स्वतंत्र महाराष्ट्र विद्यापीठ अस्तित्वांत आलें तरच थोड्या पोटतिडिकेने होणार आहे. स्वतंत्र विद्यापीठाचे प्रयत्न पुष्कळ अंशीं फलद्रूप होतील अशी आशा निर्माण झाली आहे. कारण सरकारने डॉ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली आहे.अध्यक्षीय भाषणांत या विषयाचा पुरस्कार प्रा. पोतदारांनी अट्टाहासानें करणें अपरिहार्य आहे. तसेंच सयाजीरावांच्या भाषणांत तर त्यांनी कार्यप्रणालीच आखून दिली आहे. सावरकर, खाडिलकर यांनीहि या गोष्टीचा आपल्या भाषणांतून पुरस्कार केला आहे.

रा. सा. चापेकरांनी मात्र जरा वेगळ्या प्रकारचे विचार प्रदर्शित केले आहेत. आज अशा प्रकारचे त्यांचे विचार आहेत की बदललेले आहेत हा प्रश्नच येथे अुत्पन्न होअूं शकत नाही. महाराष्ट्र-विद्यापीठाचें ध्येय वा कार्यकक्षा ही मुंबअी विद्यापीठाप्रमाणे नसून ती 'प्रसर्जक' व 'प्रसारक' अशी दोन्ही प्रकारची असणार. रावसाहेबांना वाअीट वाटतें तें विद्वत्तेचा दर्जा कमी होअील याचें ! कारण आजच्या विद्यापीठांतून अुत्तम विद्वान्हि होत नाहीत व अुत्तम नौकरहि होत नाहीत. पण या बाबतींत (विद्वत्तेच्या) निराश होण्याचें कारण नाही. नोकरीचा प्रश्न सामाजिक आहे; तो या कक्षेबाहेर पडतो. असें जरी असलें तरी बडोद्यासारख्या संस्थानाने हा प्रयोग करून पाहण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे !

त्याहीपेक्षा विद्यापीठाच्या अंगणांत मराठी जो हुतुतूचा खेळ खेळली तो मजेचा आहे. मनुष्याचे विचार किती पुरोगामी व किती प्रतिगामी असूं शकतात याचें प्रत्यंतर येथे मिळतें. प्रथमच्या अध्यक्षांचा या प्रश्नावर बराच

जोर असे; कारण ते सारे सरकारी नोकर असल्याने व अर्ज-विनंत्यांच्या सामर्थ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्याने तशी वस्तुस्थिति असणें अपरिहार्य होतें. कोल्हटकरांच्या भाषणांतील 'परस्परावलंबी कोडचा'चा अुल्लेख वर आलाच आहे. आगाशांचे विचार मात्र या बाबतींत निराशाजनक आहेत. न्यायमूर्तीसारखे प्रयत्न आपल्याकडून होणें शक्य नाही असें त्यांनी पर्यायाने सुचविलें आहे. अेवढचावरच ते थांबले नाहीत, तर त्यांनी वर अेका ठिकाणीं निर्दिष्ट केलेला भाषांतराचा सल्ला दिला आहे. तीच गोष्ट बाल-पुस्तकांबाबत. स्वतःचें कृतिदौर्बल्य दडविणारें हें प्रतिगामित्व पाहिलें की आज अेक प्रकारची मौज वाटते. कुठे न्या. मू. रानडे आणि कुठे असे कृतकृत्यतेचा गंज चढलेले लोक!! त्यानंतर किब्यांनी या प्रश्नाचा अुल्लेख केला तो महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांनी मराठीला स्थान दिल्याबद्दल केला. खाडिलकरांच्या भाषणांत असाच ओझरता अुल्लेख आढळतो.

शुद्धलेखननिर्णय :— शुद्धलेखनवादाविषयी अेवढेंच म्हटलें पाहिजे की, या भाषणांतून जरी तसा उल्लेख आला असला तरी त्याची सोपपत्तिक नि शास्त्रीय चर्चा हा विषय सामान्य बुद्धीच्या माणसाच्या आकलनकक्षेच्या बाहेरचा असल्याने, ज्यांनी अुल्लेख आणला त्यांनी अेक समिति नेमावी असेंच सुचविलें आहे. आज समितीचा निर्णय प्रचारांत येअूनहि कांही वर्ष लोटलीं. तरी पण मुंबअीसारखी युनिव्हर्सिटी या गोष्टीस मान्यता देअू शकत नाही. रा. सा. चापेकर म्हणतात त्याप्रमाणे शुद्धलेखनास सांस्कृतिक महत्त्व आहे, व या बाबतींत ढिलाअी अुपयोगीची नाही. तूर्त कांही काल तरी तो प्रश्न निकालांत निघालेला आहे, असें म्हटलें तरी चालेल.

फडके नि खांडेकर :—अगदी अलीकडे झालेल्या प्रा. फडके व खांडेकर यांच्या भाषणांकडे मात्र जरा वेगळ्या दृष्टीने पाहावें लागेल. अुपर्युक्त वाग्भट आधुनिक विचारांशीं पूर्णपणें सहमत आहेत असें नव्हे. त्यांना मिळालेली लोकप्रियता आजपर्यंतच्या अध्यक्षांपैकी कितीकांना लाभली असा प्रश्न अुरतो; किंबहुना त्यांना हें पद मिळण्याचें कारण हें लोकप्रियतेचें दडपणसुद्धा असूं शकेल. दोघांचीहि दृष्टि पूर्णपणे समाजाभिमुख असल्याने मराठी साहित्य कार्यक्षम कसें होअील याची चिकित्सा करणारीं भाषणें दोघांनी

पण केलीं. केळकर–जोशांप्रमाणे भाषणांत साहित्यविषयक चर्चा नसल्याने त्यांना मौलिक गौणत्व देण्याच्या प्रवृत्तीचा अुल्लेख वर अेका ठिकाणीं आला आहे. वस्तुस्थिति अशी आहे की, वरीलप्रमाणे शुद्ध तात्त्विक चर्चा करण्यास लागणारी विद्वत्ता, व्यासंग अि. सगळच्या गोष्टी त्यांच्या ठायीं असतांहि रस, काव्य अि. च्या चर्चेच्या विवेचनाचे कुंचले हातीं न घेतां प्रचलित साहित्यांतील दोषांचें निराकरण करण्यासाठी टीकेची छिन्नी त्यांनी हातांत धरली आहे. त्यांनी अुल्लेखिलेल्या प्रश्नांचा येथे विचार करावयाचा आहे. मात्र हे प्रश्न जिवंत स्वरूपाचे असल्याने ते अद्याप निकालांत निघालेले नसणार, आणि अर्थात् त्यांच्याविषयी कांहीं विशेष निर्णायक स्वरूपाचें लिहितां येअील असें नाही.

वृत्तपत्रांवरील आक्षेप :—प्रो. फडक्यांच्या भाषणाचा आशय मागे आलेलाच आहे. मराठी साहित्य कृतिक्षम नि प्रभावी होण्यास त्यांतील वृत्तपत्रवाङमय अधिक सकस हवें असा त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ आहे, व तो अर्थातच विवाद्य स्वरूपाचा नाही. त्यांनी मराठी वृत्तपत्रांवर अभिरुचिहीनतेचा नि ध्येयशून्यतेचा आक्षेप घेतला आहे. वास्तविक या बाबतींत अितकी अुलटसुलट चर्चा झालेली आहे की व ती अितकी ताजी आहे की, तिचा अुल्लेख येथे करण्याची आवश्यकता नाही. वरीलपैकी ध्येयशून्यतेचा आक्षेप हा मुळांतच विशेष विचारशीलतेचा निदर्शक नव्हता. टिळकांचें अुदाहरण दिलें तें जरा अयोग्यच होतें; कारण टिळकांचें काय अगर गांधींचीं काय, त्यांच्या पत्रांना वृत्तपत्र म्हणून महत्त्व नसून मतपत्र म्हणून महत्त्व होतें. आणि मराठी वृत्तपत्रांनी लोकजागृतीचें कार्य केलेलें नसलें, तरी झालेल्या थोडयाबहुत जागृतींत नाटय, कादंबऱ्या वा कथा यांचा भागच पुष्कळसा होता हें आजतरी म्हणतां येत नाही. त्यांच्या सर्व आक्षेपांस त्या वेळी 'नवयुग'ने 'वृत्तपत्रां'ची कैफियत मांडली होती, त्यांत अत्यंत समर्पकतेने अुत्तर दिलें होतें व त्याची ग्राह्यता त्यांनाहि बऱ्याच अंशीं स्वीकार्य वाटली होती.

अितर आणखी योजना :—पण त्यांचा मुख्य रोख अभिरुचिहीनतेवर होता. वृत्तपत्रांवर नियंत्रण घालण्यासाठी, त्यांनी संघटनेची योजना पुढे मांडली होती. नवनवीन लेखकांस अुत्तेजन देण्यासाठी, कसोटीने व सचोटीने

ग्रंथपरीक्षण होण्याची आवश्यकता त्यांनी पण प्रतिपादिली. त्याचप्रमाणे वृत्तपत्रविषयक शिक्षण मिळण्यासाठी वर्गाचीहि पण कल्पना त्यांनी सुचविली. ह्यांनी स्वत: धडा घालून देण्यासाठी वृत्तपत्रव्यवसायांतसुद्धा प्रवेश केला व वरील दृष्टीने आणखीहि प्रयत्न चालविले; या सर्व अितिहासाच्या पानांची शाअीहि अद्याप वाळली नसल्याने अेकदम निर्णयात्मक विधान करतां येत नाही व त्यांना टीकायोग्य वाटलेली परिस्थिति आज सुधारली आहे की काय हा प्रश्नच आहे !

राजसंस्था नि वृत्तपत्रें :—वस्तुस्थिति अशी आहे की, वृत्तपत्रव्यवसायावर सरकारचा डोळा असल्याने व त्या संस्थेचें भवितव्य ठरविणें सरकारच्या हातांत असल्याने जोंपर्यंत सरकारकडून अिकडील वृत्तपत्रसंस्थेस प्रोत्साहन मिळत नाही, तोंपर्यंत खाजगी प्रकारच्या प्रयत्नांना विशेष यश येअील असें वाटत नाही. अभिरुचिहीनतेविरुद्ध सरकार जितके निर्बन्ध घालील तितके अितर कोणीहि घालू शकत नाही. आज वृत्तपत्रें काय भयंकर परचक्रांत सांपडलीं आहेत व त्यांच्यापुढे कोणता मोठा प्रश्न अुभा आहे हें तद्व्यवसायी लोकच जाणतात. अेका दृष्टीने मराठीवर आजपर्यंत आलें नव्हतें अितकें मोठें गंडांतर आज आलें आहे असें म्हणावें लागेल. फडक्यांच्या भाषणांतील वर अितर अुल्लेखिलेले प्रश्न वा योजना अशाच प्रकारच्या परिस्थितीच्या कुंडांत भिजत पडल्या आहेत. पन्नास वर्षे कार्य करून केलेल्या संघटनेची शक्ति अपुरी पडावयास लागली, तेथे कालआजच्या या 'निरुपद्रवी' साहित्यिकांच्या संघटनेची काय वासलात लागणार !

खांडेकर नि आजचें ललित वाङ्मय :—खांडेकरांचें भाषण अेका दृष्टीने या पंचवीस भाषणांतहि अपूर्व आहे. फडक्यांप्रमाणे त्यांनीहि सबंध भाषणभर दोषांची विचिकित्साच केली आहे. परंतु अितक्या अुच्च भूमिकेवरून नि:स्पृहतेने ती केलेली आहे की त्या वा अितरहि गुणांमुळे खांडेकरांचें भाषण कितीतरी वाचनीय झालेलें आहे. विशेष म्हणजे त्यांचें भाषण हें शास्त्रीयपणा, अद्ययावत् व्यासंग नि भेदक चिकित्सा यांचा अुत्कृष्ट संगम होय.

त्यांनी अुपस्थित केलेला अेकमेव प्रश्न म्हणजे आजचें ललितवाङ्मय हें त्याच्या अंतर्गत दोषांमुळे समाजाला आवश्यक असलेलें मार्गदर्शन करूं शकत नाही हा होय. त्यांनी आकुंचित व्यक्तिमत्त्व नि त्याच्या रोगट प्रकृती-

मुळे आलेलें अतिरंजकत्व, अयथार्थता अि० दोष दाखविले. मध्यमवर्गीय मनोवृत्तीचें त्यांनी जें विश्लेषण केलें आहे तें कोणासहि पटण्याअितकें भडक आहे. आधुनिक विद्वत्तेचा अुत्कृष्ट नमुना म्हणून त्यांच्या भाषणाकडे बोट दाखवितां येअील.

खांडेकरांनी जे आक्षेप घेतले आहेत त्याबाबत मराठींत अितरांनीहि पुष्कळ लिहिलें आहे. परंतु अधिकारी नि कर्तृत्वशील व्यक्तीनें अितक्या मोठ्या स्थानावरून त्या गोष्टीस तोंड फोडलें ही गोष्ट अेका दृष्टीने अत्यंत अुचित झाली असें म्हणतां येअील. त्यांचें आजच्या वाङ्मयांत वात्सल्य, कारुण्य अि० रसांच्या आवश्यकतेचें प्रतिपादन अत्यंत वास्तव असलें तरी, ते अपेक्षितात तशा प्रकारची अुच्च भूमिका, व्यासंग नि अनुभव हीं किती मराठी ललितलेखकांचे ठायीं आहेत हा प्रश्नच आहे. ललितलेखकांस त्यांचें भाषण निश्चितपणें मार्गदर्शक होअील यांत शंका नाही. युद्धाच्या भयानकतेच्या दिवसांत आमच्या साहित्यिकांच्या हातीं तुताऱ्या नसून अलगुजें आहेत असें त्यांनीं म्हटलें आहे. त्यांचे आक्षेप कोणासहि––स्वतःच्या कृतींच्या बाबतींत त्यांनाहि–अमान्य करतां येणार नाहीत. परंतु १९४१ च्या उत्तरार्धांत अितकी परिस्थिति चिघळत चालली आहे की, मराठी साहित्यावरील त्यांच्या टीकेचा अनुकूल परिणाम झाला की प्रतिकूल झाला हें सांगतां येत नाहीं.

मराठी साहित्य हें दोषपूर्ण असेल, त्याच्याकडून समाजाच्या निकडीचें कार्य जितक्या निकडीनें व्हावें तितक्या निकडीने झालें नसेल आणि ही वस्तुस्थितीच सावरकरांनी ' लेखण्या टाका नि बन्दुका घ्या ' असें सांगण्यास कारणीभूत झालेली असेल. त्या अुपदेशांत कळकळ असली तरी साहित्यिकांविषयी अितका अविश्वास प्रकट झालेला आहे की, कोणाहि निष्ठावन्त साहित्यिकास ते अुद्‌गार मान्य होणार नाहीत.

पुरोगामी वाङ्मय म्हणजे काय हा गेल्या पांच सात वर्षांत अत्यंत चर्चेचा विषय घालेला आहे. परंतु फडके–खांडेकरांच्या वा अितरांच्या भाषणांत त्याचा ओझरताच अुल्लेख आला असल्याने त्याविषयीं येथें लिहिण्याचें कारण अर्थातच नाही.

समालोचनात्मक वर्गीकरण :––आतापर्यंत विवेचिलेल्या, अुपस्थित

झालेल्या साहित्यविषयक प्रश्नांचा अेकूण साकल्याने विचार करतां त्याचे स्थूलतः पुढीलप्रमाणे वर्ग पडत असलेले दिसतात.

१ शुद्ध तात्त्विक स्वरूपाचे वाद
 (अ) विद्वत्तामूलक
 (आ) ललितवाङमयविषयक
२ भाषा-अभिवृद्धि-अुपायदिग्दर्शन
 (अ) विद्यापीठांत प्रवेश
 (आ) ग्रंथनिर्मितिप्रसिद्धि-योजना
 (अि) ग्रंथावरील टीका.
३ शब्दव्यापार
 (अ) भाषाशुद्धि
 (आ) लिपिशुद्धि
 (अि) शुद्धलेखनवाद.
४ साहित्य व समाज जागृति
 (अ) निरनिराळे घेतले जाणारे आक्षेप
 (आ) तात्कालिक महत्त्वाचे प्रश्न.

अुपसंहार :—अितिहासाचें हें अवलोकन अुद्‌बोधक होअील या समजुतीने हा ' अव्यापारेषु व्यापार ' केलेला आहे. आजची परिस्थिति खरोखर अुद्‌बोधकतेचा फायदा घेण्याच्या पलीकडची आहे. युद्धाच्या वावटळीने फडफडू लागलेलीं जगाच्या अितिहासाचीं पानें अजूनहि फडफडत आहेत नि त्याचें पुढचें पान सुरू होणार की मागचेंच पान परत वाचावयाची पाळी येणार हें आज सांगतां येंत नाही. साहित्यिकाचा प्रयत्न निश्चितपणे पहिल्या प्रकारास पोषक झालेला आहे नि होअील. मराठीवर नव्हे देशावर आलेल्या आजवरच्या गंडांतरांपेक्षा अत्यंत भयानक असें संकट आज (१९४२) आलेलें आहे. अशा प्रकारें वैचारिक नि अितर वातावरण झांकाळून गेले आहे. असें असलें तरी त्यांतून आजचे साहित्यिक ताऱ्यांप्रमाणें चमकून थोडा का होअीना मार्ग दाखवितील अशी आशा आहे.

देशाचें भवितव्य बनवावयाचें आहे तें खरोखर रणांगणावर बनवावयाचे आहे. आचार्य अत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे नव्या जगाची सनद लिहिण्यासाठी थोर मनोभूमिकेबद्दल प्रसिद्ध असलेल्या साहित्यिकांचीच योजना करावी लागेल. परंतु तोंपर्यंत जनसमूहाला जागरूक नि कार्यप्रवृत्त करण्याचें आजचें साहित्य कार्य करील नि आजपर्यंत आलेल्या गंडांतरांप्रमाणे याहि संकटांतून मराठीस निश्चितपणें तें सोडवील अशी आशा वाटण्याइतका उभार त्यानें देशास नि महाराष्ट्रास आजपर्यंत दिलेला आहे.

[लेखनकाल सप्टें. ऑक्टो. १९४२]

संक्रमणकालांतील अध्यक्षीय भाषणें

[इ. स. १९४२ ते १९४९]

पहिल्या पंचवीस (पहिल्या क्रममोजणीनुसार) म्हणजे सोलापूरच्या खांडेकरांच्या अध्यक्षीय भाषणापर्यंतच्या भाषणांचा आढावा मागील निबंधांत घेतला आहे. त्यानंतर नाशिक, सांगली, धुळें, बेळगांव, हैद्राबाद (द.) व पुणें येथे निरनिराळ्या वर्षी अधिवेशनें झालीं.–त्यावेळीं अनुक्रमें आचार्य प्र. के. अत्रें, प्रा. श्री. म. माटे, श्री. भा. वि. वरेरकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. न. र. फाटक, व आचार्य शं. द. जावडेकर हे मराठी भाषेचे श्रेष्ठ साहित्यक अध्यक्षपदीं विराजमान होते. त्या त्या वेळीं त्यांचीं भाषणें गाजलेलीं आहेत. आज (१९५०) जरा काल बदलला आहे. परिस्थिति पालटली आहे. राजकीय दृष्ट्या–व तीच सर्वांत महत्वाचीं—आपला संक्रमणकाल संपला आहे असें म्हणतां येईल. १९४२ पासून साधारणपणें तो सुरू झाला कारण त्यावेळी ब्रि. राजकर्त्यांना आतां या देशावर आपलें राज्य टिकणें अशक्य याची तीव्र जाणीव झाली. आणि आतां पाय काढता कसा घ्यावयाचा ह्या गोष्टीचा विचार ब्रि. राजकर्ते करूं लागले. तो टप्पा परवांच्या (१९५०) २६ जानेवारीला संपला, असें गृहित धरावयास हरकत नाही. त्या दृष्टीने ह्या सहा संक्रमणकालीन अध्यक्षांच्या भाषणांकडे विहंगम दृष्टि टाकणें उपयुक्त होईल.

संमेलनांचे उद्देश :—उपर्युक्त सहा अध्यक्ष हे मराठी भाषेचे श्रेष्ठ व विख्यात विचारवंत आहेत. साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद हें ज्यांनीं विशेष

प्रकारची साहित्यसेवा करून आपलें स्थान त्या क्षेत्रांत अढळ केलें अशांनाच प्रामुख्याने मिळत आलें आहे व तेंच सर्वस्वी योग्य होय. साहजिकपणें या ठिकाणीं विचारांत घेतलेले अध्यक्षहि त्याला अपवाद नाहीत. साहित्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत कांही कामगिरी करून तिच्या जोरावर साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद मिळविण्याचे दिवस केव्हाच मागे पडले आहेत.

प्रत्येक लेखकाच्या जीवन-विषयक वा साहित्य-विषयक ज्या ज्या निष्ठा असतात त्यांचें थोडें तात्त्विक असें आविष्करण अध्यक्षीय भाषणांत होणें अटळ असतें, त्याशिवाय स्थलकाल यांच्या योगाने कांहीं प्रश्नांना महत्त्व प्राप्त झालेलें असतें. आणि त्या प्रश्नांना अधिक चालना देणें, त्या दृष्टीने अधिक जागृति करणें हाहि पण एक महत्त्वाचा उद्देश संमेलनामागे असतो. त्याप्रमाणे वेळोवेळी साहित्य, भाषा, संस्कृति, लोक-जीवन ह्यांचा संबंध कसा असावा, साहित्याचें क्षेत्र अधिक व्यापक व मौलिक, निकोप, व अधिक स्वयंभू कसें व्हावें हें पण कित्येकदां स्पष्ट करणें आवश्यक असतें. कांहीं प्रश्नांना चालना देणें, त्यामागली सामाजिक भूमिका वा निकड, स्पष्ट करणें जरूर असतें,–या सर्व गोष्टींचें प्रतिबिंब अध्यक्षीय भाषणांत पडूं शकतें. तें पाहून त्यांचा मागोवा हा अध्यक्षीय भाषणांतून घेता येतो, ह्या कारणानें अध्यक्षीय भाषण हें सहसा एकसंध नसतें. ह्या ठिकाणीं विचारांत घ्यावयाच्या सहा अध्यक्षीय भाषणांतून निरनिराळ्या पंधरावीस विषयांचा–प्रश्नांचा–उहापोह झालेला आहे. बदलत्या परिस्थितीनुरूप कांही प्रश्न निकालांत निघालेले आहेत, कांही नवे निर्माण झाले आहेत, कांहीं अद्याप अनिर्णित आहेत. तसेंच कांही प्रश्न सामाजिक –सांस्कृतिक–स्वरूपाचे आहेत, कांही मराठी भाषेच्या अस्तित्वाचे, वर्धनाचे किंवा संवर्धनाचे दृष्टीने महत्त्वाचे आहेत, कांही पूर्णपणें साहित्यचर्चापर आहेत, कांही विशिष्ट ज्ञान-चिकित्सा करणारे आहेत तर कांहीं विशुद्ध जीवितमूल्यांची चर्चा करणारे असे आहेत. एकाच अध्यक्षीय भाषणांतून असे निरनिराळे प्रश्न आलेले आहेत. प्रथम जे प्रश्न निकालांत निघाले आहेत किंवा त्या वाटेवर आहेत त्यांचा ऊहापोह करणें उचित होईल.

निकालांत निघालेला प्रश्न : राष्ट्रीय स्वातंत्र्य :–निकालांत निघालेला अगदीं सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राजकीय परदास्याचा होय. १९४२ त

राजकीय परिस्थिति जास्तींत जास्त अंधाकारमय अशी होती व तिचें प्रतिबिंब आपणांस आचार्य अत्र्यांच्या भाषणांतून पाहावयास मिळतें. साहित्याशिवाय इतर व्यासपीठें त्यावेळीं बंद झालेलीं होतीं. राजकीय स्वातंत्र्याची इच्छा साक्षेपानें व्यक्त करणें हें पण धोक्याचें होतें, अशाही वेळी आ. अत्र्यांनीं ' चाळीस कोटी लोकांचा हा प्रचंड देश यापुढे एक क्षणभरहि पारतंत्र्यांत राहावयास तयार नाही ' असा उद्घोष आपल्या अध्यक्षीय भाषणांतून केला. नंतरच्या प्रत्येक भाषणांतून ती इच्छा तीव्रतेने झालेली आहे. १९४७ च्या संमेलनसमयीं ही परिस्थिति थोडी निवळलेली दिसते. "इतके दिवस आपण संधिकालांत होतों. उजेडणार कीं जास्त अंधकार होणार याचा आजवर अंदाज नव्हता. आता पारतंत्र्याची रात्र संपणार ह्याबद्दल संशय बाळगावयास नको " असा उल्लेख प्रा. न. र. फाटक करतात. आचार्य जावडेकरांच्या भाषणांत परिस्थितीच्या या उल्लेखांत एकदम क्रांतिकारक बदल व्हावा हें क्रमप्राप्त होतें. स्वातंत्र्याबरोबर मध्ययुगीन अवशेषांना आपण रजा दिली आहे ह्याबद्दल आचार्यांनी समाधान व्यक्त केलें आहे. जीवनाला ग्रासून टाकणाऱ्या राजकीय स्वातंत्र्यासारख्या प्रश्नांस साहित्य क्षेत्रांतहि महत्त्व प्राप्त व्हावें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण, स्वातंत्र्याचा प्रश्न हा सर्वसाधारण व्यक्तीच्या जीवनावर खोलवर परिणाम करणारा आहे हें त्यामुळे सिद्ध होतें. परदास्यांत असतांना मराठी लेखकांनी स्वातंत्र्याच्या मूल्याचें पूजन केलें व ती भावना लोकांत निरनिराळ्या तऱ्हांनी, प्रकारांनी वाढीला लावली. साहजिकपणेंच साहित्यक्षेत्रांत स्वातंत्र्याचा प्रश्न येऊं शकला, इतकेंच नव्हे तर तो महत्त्व पावूं शकला.

पारतंत्र्यांतलें वाङमय हें ' रात्र असूनहि राष्ट्रीय आपत्तीच्या विवंचेने झोंप न येणाऱ्या पण खडखडीत जागा नसलेल्या माणसाच्या बडबडीसारखें होतें ' असा उल्लेख प्रा. न. र. फाटकांनी केला आहे. आपले कांहीं 'वाद' हि तसेच आहेत. असे पारतंत्र्यामुळें जे वाद वा प्रश्न निर्माण झाले होते तेहि पण त्याबरोबर समाप्त व्हावयास हवेत अशा वादांत महत्त्व पावलेला वाद म्हणजे वाङमय व राजकारण यांच्या परस्पर संबंधाविषयीचा होय.

वाङ्मय व राजकारण वाद :––श्री. वरेरकरांच्या भाषणांत ह्या वादाचा साक्षेपाने उल्लेख झालेला आहे, कारण त्यांनी 'साहित्याने राजकारण वर्ज्य मानू नये असें मत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वेळोवेळीं केला आहे. आपल्या भाषणांत त्यांनी हा वाद कसा आला हें दर्शविलें आहे. समाजांतील विशिष्ट वर्गांतील व्यक्तींना स्वतःच्या हिताच्या दृष्टीने–वा राजकीय परतंत्रतेमुळें, म्हणू या––साहित्य हें राजकारणापासून अलिप्त राहावें असें वाटे व त्यांच्या एतद्विषयक आग्रहाने ती प्रवृत्ति वाढीला लागली. स्वतंत्र राष्ट्र झाल्यावर आज आपण राजकीय विचार वा चर्चाहि साहित्यांत वर्ज्य मानण्याचें कारण नाही. आचार्य जावडेकरांसारख्या प्रामुख्यानें राजकीय विचारप्रधान लेखकास स्वातंत्र्य कालांतलें पहिलें अध्यक्षपद देऊन हा वाङ्मय–राजकारणाच्या अलिप्ततेचा वाद निकालांत निघाला असें म्हणावयास हरकत नाही. विशेषतः समाजवादी विचारांस मिळत असलेली मान्यता पाहिली की आतां यापुढे साहित्य हें राजकारणापासून म्हणजच राजकीय विचार-चर्चेपासून अलिप्त राहावें हा विचार मूळ धरूं शकणें अशक्य आहे. राज्यसंस्था इतकीं सर्वंकष, सर्वसमर्थ व सर्वस्पर्शी होत आहे की, कोणत्याही जीवनक्षेत्रांतून तिला वगळणें अशक्य झालें आहे. यापुढे साहित्यांत राजकारणाची चर्चा कदाचित् येणारहि नाही. पण त्याचीं कारणें वेगळीं असू शकतील. राज्यकर्त्याबाबतची भीति त्याला कारणीभूत झालेली असणार नाही.

साहित्य हें राजकारणापासून भिन्न असावें अशी प्रवृत्ति निर्माण होण्यास एक असें कारण संभवतें की, येथें साहित्याचा व तद्विषयक विचारांचा अभ्यास जो विद्यापीठांतून झाला वा होत आहे तो प्रामुख्याने ह्या प्रवृत्तीस जबाबदार आहे. विद्यापीठीय इंग्रजी अभ्यासक्रम हे प्रामुख्यानें विशुद्ध साहित्यविषयक वा साहित्य चर्चापर असतात. साहजिकपणे येथें ब्रि० जीवनास वगळून त्यांचा अभ्यास होतो, व ह्या अशा एकांगी अभ्यासाच्या योगाने एकांगी मतें वाढीस लागतात. विशुद्ध साहित्याचे दृष्टीने ब्रि० साहित्य संपन्न असलें तरी, व त्याचा साक्षेपाने अभ्यास होणें आवश्यक असलें तरी आपण आपल्यापुढे तो अभ्यासक्रम आदर्श म्हणून ठेवतां उपयोगी नाही. ब्रिटिश विद्यापीठांतून जरी असे विशुद्ध साहित्य–

स्वरूपाचे अभ्यासक्रम दिसत असले तरी, ते त्यांच्या देशांतच शिकविले जात असल्याकारणाने त्यांच्या मागची वैचारिक–सामाजिक पार्श्वभूमि अभ्यासकांना चांगली परिचित असते. किंबहुना ब्रिटनमध्येहि साहित्याचा अभ्यास सामाजिक पार्श्वभूमीवरून होतो हें इंग्रजी वाङ्मयीन इतिहासावरून स्पष्ट होतें. आणि नेमकें हेंच येथें विसरलें जातें. साहित्याची वाढ ही राजकीय विचारांच्या अनुषंगानें झालेली आहे, आणि राजकीय विचार हे वरवर दिसतात तितके विशुद्ध राजकीय नसतात. त्यांना खोल सामाजिक अर्थ असतो. लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवाद, हे प्रश्न राजकीय कीं सामाजिक ? सामाजिक प्रश्नांतहि सामाजिक–राजकीय, असा भेद करणें हें परकीय सत्तेच्या टिकण्याच्या दृष्टीनें त्यांना जरूर असेल. आपण तो प्रश्न आतां कालसमाविष्ट केला पाहिजे.

विद्यापीठें व त्यांतील माध्यमाचा प्रश्न :—तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्रासाठीच्या विद्यापीठाचा. वस्तुतः पुणें विद्यापीठाची संस्थापना होण्यामागे ही महाराष्ट्र विद्यापीठाची मागणी होती. पुणें विद्यापीठाला 'महाराष्ट्र विद्यापीठ' ही संज्ञा मिळेल असें पुष्कळांना वाटत होतें. डॉ. जयकरांनी तें नांव सुचविल्याबद्दल त्यावेळीं टीकाहि झाली; पण आज (१९५०) महाराष्ट्राचा मुंबई, पुणें, नागपूर, महिला विद्यापीठ, या सर्व विद्यापीठांवर हक्क पोंचतो. तेव्हा एका दृष्टीनें हीं सारीं महाराष्ट्राचींच आहेत. शिवाय भाषेच्या प्रश्नास आज एक निराळेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. नव्याने मान्य केलेली हिंदी ही 'राष्ट्रभाषा' म्हणून विद्यापीठीय शिक्षणाची भाषा असावी असा कित्येकांचा आग्रह आहे. लोकभाषा म्हणून प्रादेशिक भाषांची वर्णी पण तितक्याच आग्रहाने लावण्याचा प्रयत्नहि होत आहे. महाराष्ट्रीय भाषा, संस्कृति, लोकजीवन, इतिहास, यांचा अभ्यास ह्या सर्वच विद्यापीठांतून होणें शक्य आहे. जोंपर्यंत परकीय अधिसत्ता होती तोंपावेतों प्रादेशिक संस्कृतीच्या संवर्धनासाठी वेगळें विद्यापीठ मागणें योग्य होतें. श्री. माडखोलकरांनी आपल्या भाषणांत–टिळक विद्यापीठाची पुनर्रचना त्या दृष्टीनें (मराठी संस्कृतीच्या अभ्यासाचें केंद्र व्हावें ह्या दृष्टीनें) करावी असें सुचविलें आहे. त्याप्रमाणें साहित्य-संस्थांमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना सरकारी मान्यता द्यावी असें

सुचविलें आहे. तोच मार्ग अधिक सोयीचा आहे. आज सगळींच विद्यापीठें आतां 'राष्ट्रीय' झालीं आहेत.

राष्ट्रभाषेशीं सांगड :—महाराष्ट्र विद्यापीठाचा प्रश्न अशा प्रकारें एका दृष्टीनें निकालांत निघाला आहे. परंतु दुसऱ्या दृष्टीने पाहतां त्यानें नवें स्वरूप धारण केलें आहे. विद्यापीठांतून माध्यम कोणतें राहावें, राज्य-कारभाराची, न्यायालयांची, व्यापार-व्यवहाराची भाषा कोणती असावी, असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. म्हणजे प्रादेशिक भाषांचा राष्ट्रभाषेशीं या प्रत्येक ठिकाणीं खटका उडणें अपरिहार्य दिसतें. कारण ह्या सर्व ठिकाणीं आपापल्या भाषेस स्थान मिळालें पाहिजे असा आग्रह प्रादेशिक भाषिकांनी आजपावेतों धरलेला आहे. परंतु आज प्रत्यक्ष परिस्थिति वेगळी दिसते. इंग्रजीची जागा पुष्कळशा प्रमाणांत राष्ट्रभाषा घेणार हें जवळ जवळ अटळ दिसतें, असें प्रादेशिक भाषिकांनीं अभिमान बाजूला ठेवून वास्तव दृष्टीनें पाहिलें तर दिसून येईल. साहजिकपणेच मराठी आदि भाषांचीं व राष्ट्रभाषेचीं क्षेत्रें निश्चित करतां करतां बऱ्याच ठिकाणीं मराठी आदि भाषांचें क्षेत्र संकुचित करून घ्यावें लागेल अशी भीति वाटते. म्हणजे इंग्रजी राजवटींत जेथे मराठी भाषा होती तेथेच ती राहाणार. फरक एवढाच कीं, त्यावेळीं ह्या परिस्थितीबद्दल रुखरुख वाटत असे, आतां तीहि वाटून घेण्याचें कारण उरणार नाही. महाराष्ट्राचा सलग असा एकभाषी 'प्रांत' वा 'राज्य' निर्माण झालें तर या परिस्थितींत थोडा फरक पडणार आहे. एरवी नाहीं. या दृष्टीने प्रादेशिक भाषिकांनी नसत्या भाषिक अभिमानाच्या आहारीं न जातां, अधिक वास्तवपूर्ण दृष्टीने आपल्या भाषेचें भवितव्य ठरविण्याची वेळ आली आहे. हिंद हें एकभाषी राष्ट्र होण्याची आज शक्यता फार दिसते. कारण राजकीय स्वातंत्र्याबरोबर जर कोणता महत्त्वाचा फरक झालेला असेल तर परकीय भांडवलशाही जाऊन येथली सुरू झाली आहे एवढाच. भांडवली व्यवस्थेंत छोटया छोटया गटांच्या सांस्कृतिक विकासाची तरतूद नसते. तसेंच भारत हें कशा प्रकारचें राष्ट्र व्हावें, ह्याबद्दल निश्चित कल्पना राज्यकर्त्यांजवळ नाही. त्यामुळे सांस्कृतिक जीवनाचा गाडा भांडवली अर्थव्यवस्था जिकडे नेईल तिकडे फरफटत जावा हें क्रमप्राप्त ठरतें. भांडवली अर्थव्यवस्थेला मोठें, थोडें व एकजिनसी

राष्ट्र परवडतें. राष्ट्रीय संरक्षणाच्या मुद्द्यावर भर देऊन एकावयवी राष्ट्रास लोकांची सहानुभूति आज मिळत आहे, मिळवली जात आहे. त्याच प्रमाणांत प्रादेशिक भाषांच्या पायाखालील भूमि घसरूं लागली आहे. अशी परिस्थिति थोडा काळ राहिली तर–उच्च व उन्नत विचारांचें, व श्रेष्ठ कलात्मक आविष्काराच्या क्षेत्रांत प्रादेशिक भाषा अल्पकाळ राहातील असें दिसतें. म्हणजेच त्यांचें क्षेत्र संकुचित होऊं लागेल. समाजवाद प्रस्थापित झाला–आणि तोहि नजीकच्या भविष्यांत–तरच ह्या गोष्टीला थोडा आळा बसेल. पण ती शक्यता अद्याप दूरवरच आहे... साधे एकभाषी प्रांतहि आज मिळणें अशक्य झालें आहे. अशा परिस्थितींत आपण कांहीं काळ निव्वळ आपल्या अभिमानाच्या भरांत राहिलों तर पुढील पिढ्या आपणांस दोषी धरणारच नाहीत असें म्हणतां येत नाही...*

महाराष्ट्राच्या एकीकरणाचा प्रश्न :—महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रश्नाला आज कोणतें स्वरूप आलें आहे तें पाहिलें. त्यानंतर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न–आणि तोहि अनिर्णित असलेला–म्हणजे महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्याच्या बाबतींतला होय. यंदां मुंबईंत होणाऱ्या अधिवेशनामागें हीच मागणी अधिक आग्रहानें, निकडीनें मांडावी हा उद्देश आहे. ह्या प्रश्नास जोराची चालना देण्याच्या दृष्टीनें श्री. माडखोलकर यांच्या अध्यक्षीय भाषणास फार मोठें महत्त्व द्यावें लागेल.

श्री. माडखोलकर यांनीं आपल्या सबंध भाषणांत केवळ ह्या एकाच विषयाचा ऊहापोह केला आणि त्यानंतर संयुक्त–महाराष्ट्राची चळवळ बद्धमूल झाली. अध्यक्षीय भाषण हें एकसंध नसतें, ह्या विधानाला श्री. माडखोलकर यांचें भाषण हा अपवाद आहे. महाराष्ट्राच्या एकभाषी प्रांताला गांधीजींची परवानगी मिळविण्याचा प्रयत्न श्री. माडखोलकर यांनीं केला व त्यासंबंधींचा पत्रव्यवहारहि त्या भाषणांतच त्यांनी समाविष्ट केला आहे. त्याशिवाय भाषिक प्रांतांबाबत कन्नडीग किंवा इतर भाषिक लोक हे आपणांपेक्षां अधिक जागृत आहेत हें साधार दर्शवून त्या बाबतची आपली निकड स्पष्ट केली

---

* हें अवलोकन १९५० मधील आहे. त्यानंतर परिस्थितींत अनुकूल दिशेनें फरक पडला आहे हें कोणच्याहि ध्यानांत येईल.

आहे. महाराष्ट्रीय नेत्यांकडून अशा प्रकारें दुर्लक्ष होत असतां मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाच्या सरहद्दी आंत आंत सरकाव्यात हें क्रमप्राप्त होतें. माडखोलकर यांच्या भाषणानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली. जनतेंतहि त्याबाबत जागृति निर्माण झालेली आहे... त्या बाबतच्या घडामोडींचा उल्लेख येथें आवश्यक नाहीं. महाराष्ट्राचा भाषिक प्रदेश एकसंध कसा होईल व किती लवकर होईल हें अजमावण्याची व त्या दृष्टीनें पावलें टाकण्याची आज अत्यंत आवश्यकता निर्माण झाली झाली आहे.

मराठी भाषा मुमूर्षु होणार काय ? :—या सहा भाषणांतून जे प्रश्न निकालांत निघाले व ज्या प्रश्नांनीं नवें स्वरूप धारण केलें त्याचें हें विवेचन केलें. मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीनें ह्या महाराष्ट्राच्या प्रश्नास आज अतीव महत्त्व प्राप्त झालें आहे. साहजिकपणेंच भाषाविषयक-साहित्यविषयक, विचारविषयक प्रश्नांस थोडें दुय्यम स्थान प्राप्त व्हावें हें क्रमप्राप्त आहे. बरोबरच आहे, मराठी भाषा ठिकाणावर असली तरच मग तिच्या साहित्य, विचार, कला इ. अंगांचा ऊहापोह संभवतो. दोन तपांपूर्वी इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मराठी भाषा मुमूर्षु झाली आहे काय ? असा प्रश्न एका भाषणांत केला. मराठी भाषिकांनीं त्याचें उत्तर नंतरच्या कालाच्या तोंडानें 'नाहीं' असें दिलें. आज नेमका मराठी भाषा मुमूर्षु होणार काय ? असा प्रश्न पुढे उभा राहतो व पुढे येणारा दोन तपांचा काल काय उत्तर देईल हें मात्र सांगतां येणें कठिण झालें आहे.

संक्रमणकालीन–साहित्यचर्चा : – संक्रमणकालांतली हीं भाषणें आहेत, व त्या दृष्टीनेच ह्या भाषणांचें परिशीलन करणें हें आवश्यक आहे. आतांच पाहिल्याप्रमाणें मराठी भाषेचें भवितव्य काय, हाच महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळें मराठी साहित्याचे गुणदोष, त्याप्रमाणे वाङमयीनवाद, त्यांच्या उलटसुलट चर्चा, ह्यांना दुय्यमच महत्त्व आलें आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचें अवलोकन करतांना असें आढळून आलें आहे कीं, साधारणपणें १९२१ ला बडोद्याच्या तात्यासाहेब केळकरांच्या भाषणापासून तों १९३४ च्या बडोद्याच्याच नानासाहेब चापेकरांच्या भाषणापर्यंतचीं अध्यक्षीय भाषणें हीं प्रामुख्यानें साहित्य-चर्चाप्रधान आहेत. १९३६ च्या डॉ. माधवराव पटवर्धनांच्या भाषणानें एक वेगळीच कलाटणी दिली. माधवरावांनी

आपल्या भाषणांत भाषाशुद्धीचाच पुरस्कार केला. भाषाशुद्धी हा साहित्य-विषयक प्रश्न असला तरी माधवरावांची भूमिका ही साहित्य-विवेचकाची नसून संस्कृतीच्या अभिमान्याची आहे. म्हणून त्याचें भाषण तत्पूर्व अध्यक्षीय भाषणांपासून वेगळें पडतें. तेथून पुढें शुद्ध साहित्यचर्चा बाजूला पडली व समकालीन जीवन आणि साहित्य ह्यांचा संबंध पाहणें सुरू झालें. व्यक्तीच्या वैशिष्ट्याप्रमाणें विवेचन वेगळें होऊं लागलें. उदाहरणार्थ, आ० अत्र्यांच्या भाषणांतून ललित वाङ्मयाचें मोठेपण, विनोदाचें महत्त्व व विनोदी दृष्टीची आवश्यकता यावर भर दिला गेला आहे. प्रा. माटयांच्या भाषणांतून ज्ञान-स्वरूपचर्चा आलेली आहे, आणि भारतीय अवनतीची कारणमीमांसा करण्याचा त्यांनीं बराच यत्न केला आहे.

वरेरकरांच्या भाषणांतून वाङ्मय व राजकारण यांच्या विषयीच्या वादावर भर दिला आहे ह्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांनी चर्चिलेला आणखी एक मुद्दा आहे. तो फार महत्त्वाचा आहे. तो म्हणजे लेखन हा स्वतंत्र व्यवसाय व्हावा हा होय. शिळोप्याच्या गप्पा किंवा हौस म्हणून वाङ्मय-निर्मिति करण्याचे दिवस गेले आहेत. हा विचार फार महत्त्वाचा आहे. वरेरकरांचा आग्रहहि योग्य आहे; पण येथलें जीवनमान वाढल्या-खेरीज तशी परिस्थिति निर्माण होईल असें वाटत नाही. आचार्य अत्र्यांनींहि आपल्या भाषणांत साहित्य हें मनोविनोदनासाठी नव्हे, तें लोकांसाठी आहे हा विचार पुरस्कारिला आहे. श्री. माडखोलकरांच्या भाषणांत संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जोर दिलेला आहे तर प्रा. फाटकांच्या भाषणांत इतिहासाकडे पुन्हा लक्ष वेधलें आहे व मराठी साहित्याचा अभ्यास हा मराठी इतिहासाच्या अभ्यासकाच्या भूमिकेवरून व्हावा हा विचार प्रसृत केला आहे. या उदाहरणांवरून व्यक्तिवैशिष्ट्याने भाषणें कशीं वेगळीं झालीं आहेत हें ध्यानांत येईल.

इतर विषय :—संक्रमण कालांतील हीं सहा भाषणें हीं अनेक मौलिक विचारांनीं परिप्लुत आहेत. आचार्य अत्र्यांनीं मांडलेली ललित वाङ्मयाची कैफियत व त्यांनी घेतलेला विनोदाचा कैवार यांचा उल्लेख पूर्वी आलेला आहेच, त्याचप्रमाणें पुरोगामित्वाची, वास्तववादाची त्यांनीं केलेली मीमांसा, व साहित्यिकांच्या प्राप्त कालांतील कर्तृत्वाची त्यांची कल्पना

इ. विचार हे मौलिक आहेत. ते मुळांतूनच अभ्यासणें योग्य होईल. तीच गोष्ट प्रा. माटे यांच्या भाषणाची. योजना-पुरस्सरतेने सामुदायिक अभ्यास आजच्या विविध 'वादां'च्या युगांत कसा करतां येईल, साहित्यांतून होणाऱ्या विकृत चित्रणामुळे स्त्रियांविषयीं निरनिराळे गैरसमज कसे निर्माण होतात, प्राचीन कालांत आपण घराबाहेर लक्ष दिलें नाहीं तर आधुनिक कालांत स्वकीयांचीच उपेक्षा आपण कसे करीत आहोंत, इ. विचार प्रा. माटयांनीं आपल्या भाषणांत इतक्या ठाशीवपणे व कळकळीने मांडले आहेत कीं, त्यांना एक स्वतंत्र वैचारिक वजन प्राप्त झालेलें आहे.

वरेरकरांच्या भाषणांत साहित्यिक समाजजीवन चित्रणाविषयी जागरूक नाहीत ही त्यांनीं केलेली तक्रार, त्याचप्रमाणे साहित्यांत विद्वद्वेत्यांचा काळ जाऊन जीवनवेत्त्यांचा काल सुरू झालेला आहे हा त्यांचा विचार, 'हौशी' लेखकांकडून परिणामकारक वाङमय निर्माण होत नाही, इ. विचारहि असेच मौलिक आहेत व त्यांना स्वतंत्र स्थान आहे. माडखोलकरांनीं संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबद्दल आग्रह धरलेला आहे हा अुल्लेख या पूर्वीच आलेला आहे.

प्रा. न. र. फाटक ह्यांचें भाषण असेंच आगळें आहे. संमेलनाच्या कार्यासंबंधीं त्यांनी मौलिक विचार मांडले आहेत. साहित्याचा अभ्यास इतिहासाच्या पार्श्वभूमीवरून व्हावयास हवा हा त्यांचा आग्रह, गेल्या पन्नास वर्षांतील आपली जागृति ही सामान्यांच्या उठावणीची आहे, हा त्यांचा विचार या इतिहासावर नवाच प्रकाश टाकतो. या प्रकारचे स्फुट विचार या सर्व भाषणांतून सर्वत्र इतके विखुरलेले आहेत की त्यांचा परामर्श घेणें अशक्य आहे.

नव्या जुन्या निष्ठा—ह्या सर्व भाषणांपासून आचार्य जावडेकरांचें भाषण जरा वेगळें करावें लागतें. एका दृष्टीने संक्रमणकालाचें खरें द्योतक असणारें असें तें एक भाषण आहे असें म्हणतां येईल. नवें व जुनें ह्यांच्या संधिकालीं एक प्रकारची अनिश्चितता, अस्थिरता असते, एकप्रकारची अराजकता असते. जुनें ढासळून पडत असतें, नव्यास सावयवता यावयाची असते. जुन्याविषयी एक प्रकारची आस्था वाटते; पण जुनें आता टिकू शकत नाही हें पण स्पष्ट झालेलें असते. नव्याविषयी आकर्षण असतें,

पण त्याचें दर्शन इतकें अस्फुट असतें की तें पकडून ठेवणें जमत नाही. थोडक्यांत जुन्या नव्याचें जें संक्रमण होत असतें, त्याच्या अनुषंगानें निष्ठाहि संक्रमणावस्थेंत असतात. जुन्या विषयींच्या ह्या निष्ठा आतां सोडावयास हव्यात व नव्याविषयी, ह्या निष्ठा आतां आपण धारण करावयास हव्यात व असें कांहीतरी विवेचन संक्रमणकालीन अध्यक्षीय भाषणांतून यावयास हरकत नव्हती. तथापि तें तसें झालेलें नाही. याचें कारण म्हणजे अमुक अमुक निष्ठा अंतिम मानावयास हव्यात असें आग्रहानें कोणाला सांगावयाचे नसेल, किंबहुना खरें म्हणजे तशा विवेचनासाठी परिस्थितीहि तितकी अनुकूल व योग्य नाही, असें त्या त्या वक्त्यांस वाटले असावें.

सत्याग्रहनिष्ठा :—त्या दृष्टीने पाहूं गेलें तर जावडेकरांची निवड फारच योग्य झाली असें म्हणतां येते. त्यांच्या भाषणासहि अनन्यसाधारण महत्त्व द्यावें लागतें. राजकीय प्रश्न सुटल्याने केवळ राजकीय सत्तांतर झालें असें मानणें चूक आहे; तर सांस्कृतिक दृष्ट्या ज्याला महत्त्व देतां येईल असें फार मोठें संक्रमण झालें आहे, हा विचार आचार्यांनीं मांडला तो फारच महत्त्वाचा आहे. वैश्य संस्कृति आज संपुष्टांत आली आहे. क्रांतियुग सुरू झालें आहे. तेव्हा आपलें साहित्य हें क्रांतिरसात्मक असावयास हवें हा विचार जावडेकरांनी साक्षेपाने मांडला. त्यानंतर विज्ञान-वर्धनाने जीवन-विषयक निष्ठांत कसाकसा बदल होत गेलेला आहे, आणि मार्क्सने या जीवननिष्ठांत कोणती भर घातली हें पण आचार्यांनी स्पष्ट केलें आहे व शेवटीं आपला सत्याग्रहनिष्ठेचा विचार अत्यंत आग्रहाने मांडलेला आहे. सत्याग्रहनिष्ठेंत साधनांना जें महत्त्व आहे त्याकडे पण आवश्यक तेवढें लक्ष वेधिलें आहे.

सत्याग्रहनिष्ठेबाबत कुणाचा मतभेद होणें शक्य आहे. तथापि तो मतभेदाचा भाग सोडला तर आधुनिक जगांत विचार-निष्ठा कशा संक्रमित होत आलेल्या आहेत, व आपण सत्याग्रहनिष्ठेप्रत कसे आलेलों आहोंत, या संबंधींचें आचार्यांचें विवेचन आहे तें अत्यंत उद्बोधक आहे. विचार-प्रणालींचा अभ्यास करणारांना तें अतीव मोलाचें वाटणें साहजिकच आहे.

विशेष म्हणजे हें विवेचन साहित्याच्या अितिहासाधारें त्यांनी केलें आहे. महाराष्ट्राचें अेकीकरण, लोकभाषांचें महत्त्व, अि. विषयांचा अूहापोह त्यांनी आपल्या भाषणांत केला आहे. पण संक्रमणकालीन अध्यक्षीय म्हणून आतां विवेचिलेला मुद्दा अधिक कटाक्षाने विचारांत घ्यावयास हवा.

आज संक्रमणकाल संपवून नव्या राजकीय युगाकडे आपण जात आहोंत. नवें साहित्य आतां लिहिलें जाणार आहे. त्यासाठी, अध्यक्षीय भाषणांतून जें विचारपाथेय सांपडलें तें येथे मांडलें आहे. साहित्यविषयक विचार हा प्रामुख्याने आज जीवननिष्ठा-विषयक, जीवनमूल्यविषयक विचार झाला आहे. कारण सांस्कृतिक संक्रमणाचें तें एक वैशिष्टय आहे. नवें साहित्य निर्माण होत असतांना त्याचें परिशीलन करतांना अशा प्रकारें वैचारिक श्रेष्ठतेकडे, वैचारिक निष्ठेकडे अधिक लक्ष द्यावयास हवें असें वाटतें. विशुद्ध साहित्य स्वरूपाचे वाद आतां यापुढे कांही काल जरा मागेच पडणार. तशा प्रकारच्या कोणत्याहि वादाचा पूर्व वा अुत्तर पक्ष या भाषणांतून आलेला नाही हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तशी विशुद्ध स्वरूपाची साहित्यचर्चा कांही काल मागे पडली तरी फारसें कांही बिघडत नाही. कारण, हा नवा काल अेक प्रकारच्या सृजनशीलतेचा द्योतक असतो. आणि ज्या ज्या वेळी नवें जन्मास येतें, त्या वेळीं तें जुन्याचे नियम पाहून येतें अशांतला भाग नाही. कांही कालाने त्याचेच नियम नि नंतर शास्त्र व्हावयाचें असतें.

कवि, साहित्यकलाकार हे द्रष्टे असतात, त्यांच्या डोळयांना पुढचें दिसतें, कानांना पुढचें अैकूं येतें, आज आपले कर्ण-नेत्र भविष्याकडे लागले आहेत, आणि भविष्यांतले हें आपणांस अगोचर असणारें हें रूप, सूर, रंग, त्यांना दिसूं-अैकूं येतात. संक्रमणकालीन पूर्वाध्यक्षांची ही शिदोरी घेअून नव्या कालाला सामोरे जाअूं या.

[लेखनकाल अेप्रिल १९५०]

● ● ●

साहित्य संमेलनें आणि साहित्यिक प्रश्न

स्वा तं त्र्य का ल

[१९५० ते १९५९]

स्वातंत्र्यकालांत झालेल्या अध्यक्षीय भाषणांतील साहित्यविषयक विचारांचा वा प्रश्नांचा परामर्श या निबंधांत घ्यावयाचा आहे. महाराष्ट्र राज्य स्थापन होत आहे. नव्या राज्याच्या अुंबरठ्यावर अुभें राहून मागील अितिहासाचें अवलोकन करणें अुद्बोधक होअील.

१९५० नंतरच्या ह्या दशकांत संमेलनाचीं अधिवेशनें मुंबअी (१९५०), कारवार (१९५१), अंमळनेर (१९५२), अहमदाबाद (१९५३), दिल्ली (१९५५), पंढरपूर (१९५६), औरंगाबाद (१९५७), मालवण (१९५८), व मिरज (१९५९) या शहरीं झालीं. व या वेळीं कवि यशवंत, श्री. अ. का. प्रियोळकर, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, श्री. वि. द. घाटे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. शं. दा. पेंडसे, प्रा. अनंत काणेकर, श्री. कवि अनिल व प्रा. श्री. के. क्षीरसागर ह्या मान्यवर साहित्यिकांनी अध्यक्षपद भूषविलें आहे.

१९५० नंतरचीं भाषणें हीं अगदी अलीकडील आहेत. तीं आजकालच्या वाचकांच्या स्मृतींतून पार गेलेलीं नाहींत, नष्ट झालेलीं नाहीत. त्यामुळे त्यांतील विचारांची पाहणी करतांना पहिल्या दोन निबंधांतील भूमिका अवलंबिण्याचें कारण नाही. त्या निबंधांत प्रथम विषयाचा परिचय करून देअून नंतर त्यांतील विचारांचा परामर्श घेतलेला आहे. ही पद्धति वरील कारणांनी काटेकोरपणें येथे अवलंबिलेली नाही.

शिवाय ज्या विचारांचा वा प्रश्नांचा ऊहापोह अध्यक्षीय भाषणांत झालेला आहे ते प्रश्न निकालांत निघालेले असे नाहींत. या ना त्या स्वरूपांत ते प्रश्न जिवंत आहेत. त्यांचा निर्णय लागावयाचा आहे. तो निर्णय लागण्यास कदाचित् आणखीहि विचारचर्चा होणें आवश्यक असेल. विशिष्ट तऱ्हेने निर्णय लागण्यास परिस्थितीची अनुकूलता अद्यापहि निर्माण व्हावयाची असेल.

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न

ह्या कालखंडांतला साहित्य क्षेत्रांतला सर्वांत मोठा नि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्याबाबतचा होय. हा विषय इतका ताजा आहे की, त्याविषयीं येथे अधिक विस्ताराने लिहिण्याचीं कांही आवश्यकता नाही. हा प्रश्न गेलीं पांच सहा वर्षे इतका ज्वलंत झालेला होता की, त्याच्यापुढे इतर प्रश्नांना जवळ जवळ दुय्यम स्थान प्राप्त झालें. १९३६ ते १९४७ पर्यंतच्या कालखंडांत ‘साहित्य आणि जीवन ह्यांच्या परस्पर संबंधांच्या चिकित्सेचा कालखंड’ असें नांव दिलें तर प्रस्तुत (१९५० ते १९६०) कालखंडाला ‘संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाचा कालखंड’ असें समर्पक नांव देतां येईल. या कालखंडांतील प्रत्येक संमेलनाध्यक्षाला लोकमताच्या या प्रभावी जाणिवेचा अध्यक्षपदावरून पुरस्कार नि पुनरुच्चार करावा लागलेला आहे. साहजिकपणें साहित्यक्षेत्रांतलें अेक दशक गाजवणाऱ्या या प्रश्नाचें अैतिहासिक भूमिकेवरून विवेचन करणें आवश्यक आहे. हा प्रश्न आज सर्वपरिचित असला तरी यापुढे तो मागे पडणार आहे व म्हणून या विवेचनाचें महत्त्व कमी मानतां येत नाही.

मराठीचें स्वतंत्र राज्य असावें ही कल्पना महाराष्ट्र साहित्य सम्मेलनाद्वारेंच प्रथम प्रस्तुत झाली व वेळोवेळीं त्या कल्पनेचा पुरस्कार करणारे ठरावहि संमेलनांत संमत होत आलेले आहेत. गेलीं कांही वर्षे तर या प्रश्नाला फार महत्त्व प्राप्त झालें; साहजिकच अध्यक्षीय भाषणांत प्रामुख्यानें ह्याच विचारावर अधिक भर दिला गेलेला आढळून येअील. याचाच अर्थ मराठी जीवनाच्या व साहित्याच्या अभिवृद्धीशीं या प्रश्नाचा संबंध अतिशय निकडीचा आहे, असें मराठी मनास वाटत आलेलें आहे.

त्याचें मन या प्रश्नाने व्यापून टाकलें आहे. स्वतंत्र घटकराज्य झाल्याने या अतिशय महत्त्वाच्या स्वप्नाची परिपूर्ति होत आहे. व एक कालखंड संपला असें सर्वसामान्य मराठी माणसास वाटणें स्वाभाविक आहे.

हा प्रश्न व त्यामागील महाराष्ट्र राज्याची मागणी आहे त्या स्वरूपांत अि. १९४६ सालापासून प्रामुख्याने पुढे यावयास लागली. बेळगांव संमेलनाच्या (१९४६) व्यासपीठावरून माडखोलकरांनी अध्यक्षीय भाषणांत या विषयाचा प्रमुख विषय म्हणून अुपन्यास केला व तेव्हापासून तो आतापर्यंत जवळ जवळ प्रत्येक संमेलनाध्यक्षाला आपल्या भाषणांतून या मागणीचें पुनरुच्चारण करणें हें आवश्यक व अपरिहार्य वाटूं लागलें. लोकभावनांची तीव्रताच त्याद्वारें व्यक्त होत होती.

संयुक्त महाराष्ट्राच्या वा भाषावार राज्यांच्या निर्मितीची कल्पना जरी १९२० अितकी जुनी असली तरी ती प्रत्यक्षांत पदरांत पडण्याची शक्यता अलीकडेच निर्माण झालेली आहे. यासंबंधीचा पहिला स्पष्ट ठराव अि. स. १९३८ त मुंबअीच्या संमेलनांत संमत झाला. त्यांत त्या वेळच्या मुंबअी व मद्रास विधिमंडळांत कर्नाटक प्रांताबाबतचा निर्णय घेण्यांत आला. त्याबद्दल समाधान व्यक्त करून तशाच तत्त्वावर मराठी भाषिकांचा प्रांत अस्तित्वांत यावा अशी अिच्छा व्यक्त करण्यांत आलेली असून सीमाप्रश्न सोडविण्याच्या बाबतींत भाषिक बहुसंख्या व सलगता या तत्त्वांचा अवलंब करावा अशी शिफारसहि सरकारास करण्यांत आलेली आहे. अशा प्रकारें भाषिक प्रांत मागणीची सुरुवात झालेली दिसते. यानंतर जवळजवळ प्रत्येक अधिवेशनांत ही मागणी स्वतंत्र ठरावाच्या रूपाने नमूद झालेली आहे. १९४६ च्या बेळगांवच्या संमेलनापासून या चळवळीस वेगळें स्वरूप आलें. हा अुल्लेख मागील निबंधांत आला आहेच.

असें असलें तरी या मागणीस खरें महत्त्व प्रांतांच्या पुनर्रचनेच्या संदर्भात प्राप्त झालें. १९५५ मध्यें नेमली गेलेली रा. पु. समिति, तिने केलेल्या शिफारशी त्यांच्या निमित्ताने झालेल्या विविध प्रतिक्रियांचा सर्व अितिहास अगदी ताजा आहे. १९५५ नंतर या मागणीला अधिक तीव्र स्वरूप आल्यामुळे त्यानंतर झालेल्या प्रत्येक अध्यक्षाला ही मागणी अध्यक्षीय भाषणाद्वारें व अध्यक्षीय ठरावाद्वारें मांडावी लागली आहे. तथापि या

संदर्भांत दोन भाषणांचा प्रामुख्याने उल्लेख करणें अवश्य आहे. ह्या भाषणांतून केवळ याच विषयाचा विस्तारपूर्वक परामर्श घेण्याचा प्रयत्न झालेला असून तो विषय प्रामुख्याने लोकांपुढे मांडला जावा म्हणून अितर कोणत्याहि प्रश्नांची चर्चा करण्याचें कटाक्षाने टाळण्यांत आलें आहे. हीं भाषणें म्हणजे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (बेळगांव साहित्य संमेलनाचें अध्यक्षीय भाषण) व प्रा. अनंत काणेकर (औरंगाबाद संमेलनाचें अध्यक्षीय भाषण) ह्यांचीं होत.

माडखोलकरांच्या भाषणाबाबतचें विवेचन मागील निबंधांत आलेलेंच आहे. याच विषयाचा प्रामुख्याने अूहापोह करणारें भाषण १९५७ मध्ये अनंत काणेकर यांनी औरंगाबादच्या संमेलनांत केलें. त्यांच्या भाषणांत हा विषय निरनिराळ्या तज्ज्ञांचीं मतें देअून शुद्ध भाषाशास्त्रीय भूमिकेवरून मांडण्यांत आला. लोकजीवनाचें व लोकशाहीचें भाषा हेंच साधन कसें महत्त्वाचें आहे, व राज्याची अुभारणीसुद्धा त्याच तत्त्वावर होणें कसें आवश्यक व नैसर्गिक आहे हें त्यांनी सप्रमाण दाखवून दिलें आहे. अेका परीने येवढ्या तात्त्विक विवेचनानंतर वास्तविक मतभेदास जागा राहण्याचें कारण नाहीं.

काणेकरांच्या विवेचनांतील युक्तिवाद हा समर्पक व बिनतोड आहे. त्यावर त्यावेळीं कांहीनी अशी टीका केली की, एका अविवाद्य प्रश्नाचें अितक्या खोलांत जाअून विवेचन करण्याचें कांही कारण नव्हतें. पण काणेकरांनी हा जो विषय अध्यक्षीय भाषणासाठी निवडला त्याला अैतिहासिक कारणें आहेत. १९५६ सालीं राज्यरचना नव्याने झाली. बहुतेक भाषांना आपापलीं राज्यें मिळालीं. फक्त मराठी गुजराथी या भाषिकांनाच तीं मिळालीं नाही. व द्विभाषिकाचा प्रयोग करण्यांत आला. त्या वेळीं भाषिक प्रांत मागणाऱ्यांची ‘ भाषावादी ’ (Linguist) म्हणून निर्भर्त्सना करण्याचा प्रयत्न एका गटातर्फें होत असे. व राज्यसत्तेवर या गटाचें वजन बरेंच असे. साहजिकपणें या गटाच्या भूमिकेचें तात्त्विक खंडन करणें हें भाषिक राज्य मिळण्याच्या प्रयत्नांतलें महत्त्वाचें कार्य आहे, हें ओळखून काणेकरांनी त्या प्रश्नाच्या त्या अंगावरच अधिक भर दिलेला आहे. अेका परीनें तें धोरण वाजवी होतें असें म्हणतां येईल.

या दोन प्रमुख भाषणांशिवाय इतर संमेलनांच्या अध्यक्षीय भाषणांत या विषयास स्थान मिळालें आहे. प्रत्येक अध्यक्षाने आपापल्यापरीने ह्या मागणीचें जोरदार समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे, पण या प्रश्नासच प्रामुख्य देणारीं भाषणें हीं दोनच व म्हणूनच त्यांचा अुल्लेख येथे आवर्जून केला आहे.

भगिनी भाषांविषयीची सहानुभूति

अेक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे कीं, निरनिराळ्या अध्यक्षांनी वेगळ्या महाराष्ट्र राज्याचा–वा संयुक्त महाराष्ट्राचा—पुरस्कार केलेला असला तरी शेजारी राज्याविषयीं अगर भगिनी भाषांविषयी अतिशय आदराची व सहिष्णुतेची भूमिका प्रत्येकाने आपापल्या परीने घेतलेली आहे. माडखोलकरांनी आपल्या भाषणांत महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यामधील घनिष्ट संबंधांचा परामर्श अितिहासकालीन विविध अुक्तींनी व अुल्लेखांनी घेतला आहे. माडखोलकरांचें भाषण केवळ या विषयास वाहिलेलें आहे व त्यानंतर ही 'चळवळ' झाली, हें लक्षांत घेतलें तर चळवळीमागील भूमिका प्रारंभापासून सहिष्णुतेवर कशी आधारलेली आहे हें स्पष्ट होतें.

श्री. विठ्ठलराव घाटे यांनी गुजराती मराठी ह्या शेजारणी आहेत. 'अेकीचें कालवण दुसरीच्या घरीं गेलें पाहिजे' असें आवाहन केलें आहे. श्री. माडखोलकर हे महाराष्ट्राच्या सीमा प्रांतांत (बेळगांवीं) बोलत होते व श्री. विठ्ठलराव घाटे हे तर बोलून चालून गुजरात (अहमदाबाद) मधून बोलत होते म्हणून हे अुल्लेख आलेले आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. अितरहि संमेलनाध्यक्षांच्या भाषणांतून असे सहिष्णुतेचे अुल्लेख व अुद्‌गार काढून दाखवितां येतील. मराठी मनाचा महाराष्ट्राचा अभिमान ही एक स्वयंभू भावना आहे; अितरांच्या द्वेषावर वा असूयेवर ती आधारलेली नाही. आंतर भारतीची कल्पना महाराष्ट्राच्या साने गुरुजींनी अुचलून धरलेली आहे व मराठी प्रदेशांतील कोणाहि सुबुद्ध माणसाचा त्या कल्पनेला विरोध आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. अलीकडील कांही साहित्य संमेलनांतून इतर भाषिकांना बोलावून आणून त्यांचा गौरव करणें, त्यांचीं भाषणें घडवून आणणें अि. अुपक्रम झालेले आहेत. त्यांना कोणाचाहि विरोध नव्हता व नाही हें लक्षांत घेणें या संदर्भांत अवश्य आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या–प्रश्नाची ज्या ज्या वेळीं चर्चा केली जाओी त्या त्या वेळीं त्या प्रश्नाच्या अनुषंगानें अितर प्रश्न निर्माण होत. किंबहुना भाषिक राज्याचा प्रश्न सुटल्यानंतरहि ते प्रश्न कांहीं काल तरी तसेच राहाणार आहेत असें दिसतें. भारतांतील निरनिराळ्या प्रदेशांना वेग-वेगळी प्रादेशिक वा अैतिहासिक परंपरा आहे. ती त्या त्या प्रदेशाच्या भाषेशीं अेकरूप झालेली आहे. भाषेच्या रूपानें या परंपरेचा प्रत्येक प्रादेशिक गटास अभिमान असणें हें स्वाभाविक आहे. तो अभिमानच भाषाभिमानाच्या रूपाने व्यक्त होतो. ह्या अभिमानांचा अखिल भारतीय राष्ट्रीय अभिमानाशीं छेद जाओील व राष्ट्रीयत्वाची जाणीव कमी कमी होत जाओील, तसें झालें तर स्वातंत्र्य मिळूनहि फारसें पदरांत पडणार नाही, असा कांही आक्षेपकांचा युक्तिवाद आहे, या भूमिकेवरून त्यांचा भाषिक अभिमानास विरोध आहे. या आक्षेपाचें सविस्तर व सप्रमाण खंडन काणेकरांनी आपल्या भाषणांत केलें आहे.

तथापि विशिष्ट युक्तिवाद करून अेखाद्या आक्षेपाचें खंडन करतां आलें तरी त्याने परिस्थितींत फारसा फरक पडतो असें नाही. प्रादेशिक भाषेला भाषिक राज्यांत अपार महत्त्व येणें अेका दृष्टीने अपरिहार्य आहे. परंतु राज्याच्या विविध क्षेत्रांत प्रादेशिक भाषेचा अवलंब क्रमाक्रमाने कसा करावयाचा ही विचार करून ठरविण्यासारखी गोष्ट आहे. भाषेच्या वापराच्या दृष्टीने राज्याच्या जीवनाचीं चार महत्त्वाचीं क्षेत्रें म्हणजे राज्य-कारभार, शिक्षण, न्यायालयीन कामकाज, लोक-व्यवहार व व्यापार हीं होत. भाषिक राज्याच्या पुरस्कर्त्यांनी या चारहि क्षेत्रांत प्रादेशिक भाषेचा प्रवेश अविलंबें झाला पाहिजे असें वारंवार पुरस्कारिलें आहे. त्या दिशेने लोकांच्या भावनांना शीग पोचली आहे. तथापि प्रत्यक्ष व्यवहाराचा प्रश्न जेव्हा निर्माण होतो तेव्हा या प्रत्येक क्षेत्रांतल्या कांही महत्त्वाच्या अडचणी दृग्गोचर होतात व मग प्रादेशिक भाषेचें अधिराज्य सर्वत्र असावें ह्या ध्येयाच्या बाबतींत जरी एकमत झालें तरी वर निर्देशिलेल्या विविध क्षेत्रांत तिचा अवलंब कसा करावयाचा याबाबत निरनिराळीं मतें असूं शकतात.

विद्यापीठांतील बोधभाषेचा प्रश्न

महाराष्ट्र राज्याच्या खालोखाल मराठी लोकांना महत्त्वाचा वाटलेला प्रश्न म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठाचा होय. पुणें विद्यापीठ स्थापन होओीपर्यंत प्रत्येक साहित्य संमेलनांत त्याबाबतचा ठराव संमत होत असे. आणि प्रत्येक अध्यक्षास आपल्या भाषणांत या लोकांच्या मागणीचें प्रातिनिधिक पुनरुच्चारण करावें लागे. आज त्याबाबत समाजाच्या भावना किती तीव्र होत्या हें समजून येत नाही. पण भाषणांतील अुल्लेख पाहिले असतां त्या तीव्रतेची कल्पना येते. पण आज सर्व विद्यापीठें 'राष्ट्रीय' झालीं आहेत तरी पूर्वीचे प्रश्न कायमच आहेत, असें कां? याचें कारण ध्येयाबाबत अेकवाक्यता झाली तरी प्रत्यक्षांत कांही अडचणी असतात. अुदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षणापासून तों अुच्च विद्यापीठीय शिक्षणापर्यंतचें विविध शाखांतलें सर्व शिक्षण हें प्रादेशिक भाषांतून दिलें जावें ही बाब ध्येयाच्या दृष्टीने ठीक आहे. पण प्रत्यक्षांत निरनिराळ्या शाखांत तें प्रादेशिक भाषेचें माध्यम कसें आणतां येअील याबद्दल कांही क्रम ठेवावयास हवा व त्या क्रमानुसार हलकें हलकें पुढे जावयास हवें. ह्या ठिकाणीं केवळ विशिष्ट भाषेच्या अभिमानाचा कांहीहि अुपयोग होणार नाही. जी गोष्ट शिक्षणाची तीच न्यायालयें, राज्यकारभार व व्यापार अि. क्षेत्रांतील व्यवहारांबद्दल.

तथापि याबद्दल अेक निश्चित धोरण ठरून त्याचा अवलंब कटाक्षाने व्हावयास हवा. विशिष्ट मार्गाबद्दल वा योजनेबद्दल अेकमत होत नाही, म्हणून आहे हीच परिस्थिति–म्हणजेच अनिश्चितपणा–पुढे चालू ठेवणें केव्हाहि अिष्ट होणार नाही. या योगें अडचणी मात्र निर्माण होतील. निरनिराळ्या अध्यक्षांनी याबाबत मतें व्यक्त केलीं आहेत. प्रो. पोतदारांनीं आपल्या नगरच्या भाषणांत 'मराठीचा धेंडा मिरवा' असा आदेश देअून वरील चारहि क्षेत्रांत मराठीचा अवलंब आग्रहाने करा असा सल्ला दिलेला आहे. आचार्य जावडेकरांनीहि पण आपल्या भाषणांत 'अुच्च शिक्षणाची बोधभाषा ही प्रत्येक प्रांतांतली मातृभाषाच असली पाहिजे, यासंबंधींचा आग्रह आपण सोडतां कामा नये' असें बजावलें आहे; घाट्यांना हिंदीचें महत्व वाटत असूनहि शिक्षणाचें माध्यम ती होतां कामा नये असें वाटतें.

भारत हें अेक बहुभाषिक राष्ट्र आहे. भाषांच्या संख्येच्या दृष्टीने पाहूं गेलें असतां कदाचित् सोव्हिएट रशियांत अधिक भाषा अस्तित्वांत असूं शकतील. त्याशिवाय रशियांतील भाषांत रशियन हीच प्रमुख भाषा व बाकीच्या प्रादेशिक भाषा ह्या त्या मानाने कमी विकसित आहेत. या गोष्टी विचारांत घेतल्या तर भारताचा हा भाषिक प्रश्न जगांत अेक अपूर्व प्रश्न आहे. या देशांत विशिष्ट प्रादेशिक परंपरेचा हक्क सांगणाऱ्या चवदा भाषा आहेत. या भाषांपैकी कांही कारणांनी हिंदीला जरी राष्ट्रभाषेचें महत्त्व व स्थान प्राप्त झालेलें असलें तरी ती सर्व भारतीय भाषांत पुढारलेली वा विकसित भाषा आहे असें म्हणतां येणार नाही. शिवाय आधुनिक काळांत इंग्रजीने भारतीय वैचारिक ज्ञानविषयक व सांस्कृतिक क्षेत्रांत असें कांहीं मोठें स्थान पटकाविलें आहे कीं, तिची कास आपण अद्याप सोडूं नये असेंहि कित्येकांचें म्हणणें आहे. भाषांचें अंतिम ध्येय ज्ञानसमृद्धि धरलें तर अिंग्रजीसारख्या ज्ञानवृद्ध भाषेची अुपेक्षा करून चालणार नाहीं हें खरें आहे. पण त्याचबरोबर सर्वसामान्य भारतीयाला अिंग्रजी कितीहि काळ सक्तीने शिकविली तरी जवळची वाटणार नाही हेंहि खरें आहे. शिवाय भारतीय परंपरेची सातत्यता व अभिवृद्धि संस्कृतसारख्या भाषेकडून व विद्यमान भारतीय भाषांकडून जेवढी होअील तेवढी अिंग्रजी-कडून होणें शक्य नाही. या सर्व परस्परभिन्न व क्वचित् परस्परविरोधी गोष्टींमुळे भारताचा भाषिक प्रश्न हा अतिशय जटिल व किचकट होअून बसला आहे. व तो हलके हलके व कालमानानुसारच सुटणार आहे.

मराठीचे हिंदी-अिंग्रजीशी कसे संबध असावे

ह्या वस्तुस्थितीमुळे मराठी भाषेचे हिंदी व अिंग्रजी या भाषांशीं कसे संबंध राहावे या विषयाचें विवेचन अनेक अध्यक्षांनी आपापल्या भाषणांत केलें आहे. गेल्या दहा वर्षांतील अध्यक्षांपैकी, श्री. विठ्ठलराव घाटे, श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. अनिल, प्रा. श्री. के. क्षीरसागर अित्यादींनी आपल्या भाषणांतून या विषयासंबंधीचे विचार व्यक्त केले आहेत.

शेजारी भाषांशी स्नेहाचे संबंध असावे ही गोष्ट मुळीच विवाद्य नाही. हिन्दीलासुद्धा राष्ट्रभाषा म्हणून मान्यता देण्यास कोणताहि प्रत्यवाय नाही. पण राज्यांतर्गत व्यवहारांत मात्र प्रादेशिक भाषेचाच अम्मल सर्वत्र चालावयास हवा, लोकशाहीच्या भूमिकेशी तें सुसंगत आहे.

वर अेका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे भारतांतला भाषाप्रश्न हा एकां परीनें अपूर्व आहे. व तो भारताचाच विशिष्ट प्रश्न आहे. अितर राष्ट्रांपुढे तसा प्रश्न नव्हता. सहाजिकपणेंच तो प्रश्न आपला आपल्यालाच सोडवावा लागेल. आपल्या पद्धतीनेंच तो सोडवावा लागेल. अितर देशांचा दाखला अगर अुदाहरण फारसें अुपयोगीं पडणार नाही. थोडीशी सहिष्णुता, थोडासा लवचीकपणा व थोडासा व्यवहारीपणा धारण केला तर वाटतो अितका हा प्रश्न जटिल आहे असें वाटत नाही.

याबाबत कांही मूलभूत गोष्टी मान्य करावयास हव्यात. पण कांहीचा प्रयत्न नवा मार्ग शोधण्यापेक्षा आहे तीच परिस्थिति पुढे चालू ठेवण्याकडे असतो. ही भूमिका वास्तविक चूक आहे. अुदाहरण द्यायचें झालें तर अिंग्रजीचें देतां येईल. मुंबअी सरकारने कांहीं वर्षांपूर्वी अेक निर्णय घेअून सात वर्षांचा इंग्रजी अभ्यासक्रम चार पांच वर्षांपर्यंत आणला. त्यावर अितकी टीका झाली कीं, सरकारला आपला निर्णय बदलून पुढील वर्षापासून सात वर्षांच्या अभ्यासक्रमास मान्यता द्यावी लागली आहे. ह्या सव प्रकरणांत शिक्षणक्षेत्रीय तज्ज्ञांची वृत्ति आहे ती परिस्थिति पुढे चालू ठेवण्यास अनुकूल आहे. त्यांना तसा मूलभूत बदल असा कोणताच नको आहे, असें म्हटलें तर तें फारसें वावगें होणार नाही.

सरकारचा वर अुल्लेखिलेला निर्देश पूर्णपणें चुकीचा होता असें म्हणतां येणार नाही. आणि परत दोन वर्षांचा अिंग्रजीचा अभ्यासक्रम वाढविल्याने अिंग्रजीच्या अभ्यासाची परिस्थिति फार सुधारणार आहे असें नाही. पण या बाबतींत सामान्यतः सुशिक्षितांची प्रवृत्ति बदलापेक्षा आहे तेंच बरें आहे, सध्या आतांच कशाला बदला ? अशा प्रकारची असते येवढेंच सिद्ध झालें.

विद्यापीठांत मराठी माध्यम असावें असा आग्रह हें साहित्य संमेलन पहिल्यापासून धरीत आलेलें आहे. त्याचा परिणाम विद्यापीठांच्या धोरणावर अल्प प्रमाणांतहि झाला असेल असें वाटत नाही, पण आज पुणें विद्यापीठांत मराठी माध्यमाचा प्रयोग कांही शाखांत त्र मर्यादित प्रमाणांत कां होईना चालू आहे त्याचें श्रेय सर्वस्वी सरकारच्या वर निर्दिशिलेल्या निर्णयास द्यावें लागेल. सरकारने हा निर्णय घेण्याची ही तथाकथित ‘ चूक ’

केली नसती तर विद्यापीठामधून मराठीचा वैकल्पिक माध्यम म्हणून प्रवेश झाला असता असें मानण्यास कांहीहि आधार नाही. मराठी साहित्य संमेलनाच्या अेका आग्रहाच्या दृष्टीने पाहू गेलें असतां आज विद्यापीठांत मराठी आदि भाषांना जें माध्यमपद मर्यादित स्वरूपांत का होओीना प्राप्त झालेलें आहे, त्याचें श्रेय विद्यापीठांना देतां येअील असें मला स्वतःला तरी वाटत नाही. अुलट सात वर्षांचा अिंग्रजी अभ्यासक्रम सुरू झाल्यावर कॉलेजमध्ये मराठींतून शिकविण्याची व मराठींतून अुत्तरें देण्याची जी सवलत ठेवली आहे ती काढून घ्या असाहि प्रयत्न पुनः होणारच नाही असें नाही. मराठीस महत्त्व देणारें स्वतंत्र राज्यच अस्तित्वांत आल्यामुळे त्या प्रयत्नास फारसें यश मिळणार नाही हें खरें, पण, तो भाग वेगळा. आणखी इतकें होअूनहि मुंबअी विद्यापीठाचें माध्यम अद्यापहि १०० वर्षांपूर्वी ठरल्याप्रमाणें अिंग्रजीचें आहे व कदाचित् पुढेहि अमर्याद काळपर्यंत तें तसें राहीलहि !

मराठी साहित्य संमेलनाचा एक अुद्देश मराठी भाषेची प्रतिष्ठा मराठी जीवनांत वाढण्याचा प्रयत्न करावा हा आहे. त्या प्रयत्नांपैकी शिक्षणक्षेत्रांतील माध्यमाबाबतच्या आग्रहाची फलश्रुति काय झाली त्याचें विवेचन या ठिकाणी थोड्या विस्ताराने केलें.

मराठीच्या वापराचीं अितर क्षेत्रें

याशिवाय मराठीच्या वापराच्या दृष्टीने महत्त्वाचीं क्षेत्रें म्हणजे राज्यकारभार, विधान-सभा-परिषदा, व्यापार हीं होत. या क्षेत्रांतहि मराठीचा झालेला प्रवेश आतापर्यंत फारच मर्यादित स्वरूपाचा आहे. यापुढे तो वेग वाढेल अशी अपेक्षा करूं या. न्यायक्षेत्रांत मात्र मराठीला मानाचें स्थान प्राप्त होण्यास बराच काल लागणार असें दिसतें.

राष्ट्रीयत्वाशी विरोधी नसणारा परंतु प्रादेशिक अभिमानावर आधारेल्या भाषिक राज्यांचा प्रश्न हा गेल्या दोन शतकांतला अति महत्त्वाचा असा साहित्यविषयक प्रश्न म्हणून विचारांत घ्यावा लागेल. परतंत्र राष्ट्रांत स्वतःची भाषा निःसंकोचपणें सर्व व्यवहारांस वापरणें, तिचा अभिमान बाळगणें--अि. गोष्टी ह्या सोप्या नसतात. त्यांच्यासाठी झगडावें लागतें, लढावें लागतें हें लक्षांत घेतलें तरच हा प्रश्न साहित्यविषयक प्रश्न म्हणून कां

मान्यता पावूं शकतो ह्याचा अुलगडा होअील. परतंत्र आणि अविकसित राष्ट्रांत साहित्यविषयक प्रश्नाचें स्वरूप साहित्यापुरतेंच मर्यादित राहात नाही, तर त्यांत भाषेच्या प्रसाराशी, अभिवृद्धीशी, वापराशी निगडित असणाऱ्या सर्व प्रश्नांचा समावेश होतो. हे प्रश्न ती भाषा जिवंत राहण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात, आणि भाषा जिवंत राहिली तरच तिच्यांतील साहित्याच्या विवेचनाचा प्रश्न संभवतो. मराठी भाषेवर आतापर्यंत अनेक संकटें आलेलीं आहेत. त्यांतून तो पार पडलेली आहे. अिंग्रजी काळांत—' मराठी भाषा मुमूर्षु झाली आहे काय?' असा प्रश्न विचारला जावा अितकें तिचें स्वरूप शबलित झालें होतें, अितकी तिची व्याप्ति मर्यादित झाली होती, तिच्या विषयीची अुपेक्षा वृत्ति अितकी अुघड व स्पष्टपणें दिसणारी होती.

पुनर्मूल्यीकरणाचा प्रश्न

परकीय राजवटींत आपल्या भूतकालीन अितिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल, भाषेबद्दल अभिमानपूर्वक बोलणें परकीय राज्यकर्त्यांना आवडूं नये यांत कांही विशेष नाही. साहित्य संमेलन व परिषदेची निर्मितीच मुळी साहित्याच्या व संस्कृतीच्या अभिमानाच्या प्रसारासाठी होती. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर असा फरक पडला की, प्राचीन साहित्याविषयीच्या, अभिमानाची भावना ही केवळ वरवरची नसून तिचें शास्त्रीय व तर्कनिष्ठ भूमिकांवरून परीक्षण होणें आवश्यक आहे असें वाटूं लागलें.

नव्या परिस्थितींत सर्व जीवनांगांचें पुनर्मूल्यीकरण व्हावें अशी अेक प्रवृत्ति विद्वानांच्या ठिकाणीं निर्माण होते. त्या प्रवृत्तींतून प्राचीन व समकालीन वाङमयाचें समीक्षण करण्याचा अुपक्रम होअूं लागतो. अध्यक्षीय भाषणांच्या बाबतींत बोलायचें तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कृ. पां. कुळकर्णी, शं. दा. पेंडसे यांचीं भाषणें या दृष्टीने महत्त्वाचीं आहेत. साहजिकपणें प्राचीन मराठी वाङमयाचा आढावा घेण्याचा अुपक्रम ज्या अध्यक्षांनी केला त्यांनी शास्त्रीय भूमिका अंगीकारली आहे.

प्राचीन मराठी साहित्याच्या समालोचनापेक्षा बऱ्याच भाषणांतून अर्वाचीन वाङमयाचें समालोचन आलें आहे. कांहीं अध्यक्षांनी कांहीं प्रमुख विभागांचा (अु. नवकाव्य) वा विशिष्ट लकबींचा परामर्श घेतला आहे. प्रथम समालोचनात्मक अुल्लेख विचारांत घेणें आवश्यक आहे.

समकालीन वाङमयाचें समालोचन

समकालीन वाङमयाचें समालोचन हें अनेक परींनी अध्यक्षीय भाषणांत महत्त्वाचें स्थान मिळवूं शकतें. अेखाद्या अध्यक्षाला अेखादा विषयच आग्रहाने मांडावयाचा असेल तर साहजिकपणेच अशा समकालीन वाङमयाचें संमेलनातील त्या भाषणांत स्थान राहात नाही; पण बहुसंख्य अध्यक्षांच्या भाषणांत या ना त्या स्वरूपांत समकालीन वाङमयाचें समालोचन येतेंच. सबंध चाळीस भाषणांत समकालीन व प्राचीन वाङमयाचें समालोचन टाळणारीं अशीं भाषणें फार तर चार–पांच असतील. (डॉ. केतकर, डॉ. माधवराव पटवर्धन, प्रो. फडके, बॅ. सावरकर, माडखोलकर व प्रा. अनंत काणेकर, अेवढेच अपवाद निघतील). म्हणजे हे अपवाद सोडले तर जवळजवळ प्रत्येक अध्यक्षाच्या भाषणांत या ना त्या स्वरूपांत प्राचीन वा अर्वाचीन वाङमयाचा अूहापोह आलेला आहे.

अेका दृष्टीने हें होणें अपरिहार्य दिसतें. समकालीन वाङमयाविषयी नेहमी परस्परविरोधी स्वरूपाचीं मतें व्यक्त केलीं जातात. जें नवें वा समकालीन साहित्य निर्माण होत असतें, तें निरनिराळ्या अुद्देशांनी, निरनिराळ्या प्रकारांनी व निरनिराळ्या कारणांनी होत असतें. कित्येक वेळां त्यामध्ये नुसतें अनुकरण असू शकतें, कित्येक वेळां कोणती तरी टूम रूढ झालेली असते तिच्या आहारीं नवोदित लेखक जात असतात. प्रथितयश लेखक हे जरी अेक प्रकारच्या आत्मविश्वासाने प्रेरित होअून लेखन करीत असले तरी त्यांच्या पण साहित्याचें मूल्यमापन, स्वागत, खंडन, समर्थनहि अधिकारी व्यक्तींकडून होणें आवश्यक असतें. त्याशिवाय त्या त्या क्षेत्रांतील लोकांना आपले प्रयत्न कोणत्या तरी दिशेने साहित्याच्या अभिवृद्धीस पोषक होत आहेत की काय याची खात्री पटत नाही. कलात्मक वा विचार प्रधान साहित्यास खरा धोका कोणता असेल तो अुपेक्षेचा होय. ही अुपेक्षा घालविण्याच्या दृष्टीने अध्यक्षीय भाषणांत समकालिनावरचे अुल्लेख व विवेचन अतिशय अुपयुक्त ठरतें. मग तें अनुकूल असेल अगर प्रतिकूल असेल. शिवाय अध्यक्षपद विभूषित करणारी व्यक्ति ही अधिकारी व्यक्ति असल्याने तिच्या अभिप्रायांना विशेषच महत्त्व प्राप्त होणें साहजिक आहे.

अशा समालोचनाचें कार्य

साहित्यासंबंधीचें मतप्रदर्शन करण्याची प्रत्येकाची दृष्टि वेगळी वेगळी असली तरी या बाबतींत सामान्यत: अेकमत असतें असें म्हणावयास प्रत्यवाय नाही. मागे म्हटल्याप्रमाणें नवीन लेखकाला अेक प्रकारची मान्यता हवी असते. आपल्याकडे साहित्याचें क्षेत्र फारच मर्यादित आहे. साहित्यप्रेमी लोकांची संख्या अतिशय कमी, शिक्षितांवरहि वाङमयविषयक संस्कार अितके बेताचे असतात की स्वत:ला अेखादें पुस्तक आवडलें तर तें विकत घ्यावें असें वाटतच नाही. या अनिच्छेंत ओढाताणीच्या आर्थिक परिस्थितीची भर पडल्यावर तर पाहावयास नको. या सर्व कारणांमुळे साहित्यकांना साहित्यापासून धनप्राप्ति होअू शकत नाही. लेखनाचा स्वतंत्र धंदा व्हावयास हवा असा आग्रह धरणारे श्री. वरेरकरांसारखे मान्यवर साहित्यिक असले तरी या बाबतींत प्रत्यक्षांत दृग्गोचर होतील असे फरक दिसून यावयास सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची पातळी अुंचवावयास हवी आणि त्याबरोबरच त्याच्या मनांत साहित्याविषयीची आवड पण वर्धित व्हावयास हवी. पण या सगळ्या गोष्टी घडून येणें हा काळाचा प्रश्न आहे. त्या गोष्टी यथाक्रम व सावकाशच होणार आहेत. लेखकांना आर्थिक प्राप्ति जर चांगली होत असेल तर त्याला समाजांत बराच मान आहे असें अनायासेंच सिद्ध होतें व असा लेखक आपल्या कृतीची गुणवत्ता वाढविण्याचा अधिकच प्रयत्न करील.

पण आपल्याकडे लेखकांची प्राप्ति फार मर्यादित असते. बहुतेक लेखक हे निर्वाहाचा लेखनाव्यतिरिक्त कोणतातरी व्यवसाय स्वीकारतांना दिसतात. अशा परिस्थितींत लेखकांच्या समाजमान्यतेची जी पावती मिळावयास हवी ती मिळत नाही व अंतरंगांत घर करून राहिलेली ही रुखरुख कलेला व लेखनाला शेवटीं मारक ठरते. प्रचलित लेखकांच्या गुणांचा व कृतींचा आपल्या भाषणांत गौरवपूर्ण अुल्लेख करून अध्यक्ष प्रचलित साहित्याच्या प्रगतीस हात लावूं शकतो. आणि म्हणून ह्या समालोचनांत पुष्कळसा सारखेपणा असला तरी तें अेका मर्यादेपर्यंत साहित्याच्या विकासास पोषक होअूं शकतें.

नव वाङमय समालोचन

नववाङमयाच्या गुणांबरोबर कांहींना त्याची चिकित्सा व दोष-विवेचनहि करावेसें वाटलें आहे. अशा कांही भाषणांवर वृत्तपत्रांतून अनुकूल प्रतिकूल टीका येऊं शकते. कारण भाषणाबाबत प्रत्येकाच्या कांही अपेक्षा असतात. त्यांची परिपूर्ति करणें कोणाहि अध्यक्षाला शक्य नसतें. प्रचलित व नववाङमयावर विचार व्यक्त करणारांना नेहमीच टीकेचा मारा सहन करावा लागतो. खांडेकर, फडके, अत्रे यांच्या भाषणांवर अशीच त्यावेळीं कठोर टीका झाली. गतवर्षीच्या अध्यक्षांच्या भाषणावरील कांही ठिकाणीं टीकेची आठवणहि या संदर्भांत होण्यासारखी आहे. पण कालाबरोबर दोष पुसट होत जातात व गुण तेवढे ठळकपणें नजरेंत भरतात. गडकऱ्यांनीं ' दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभु-पूजन करि काळ असे ' या वचनांत म्हटल्याप्रमाणे कालाची ' प्रभु-पूजन ' करण्याची पद्धति असते. मतभेद हे तर सुबुद्ध व्यक्तीच्या मागे सदैव लागलेले असतात व अुणीवांचेंहि तसेंच आहे.

कांही कालानंतर मात्र अैतिहासिक दृष्टीला मतभेदांत व अुणीवांतहि कांही अर्थ आहे असें प्रत्ययास येतें. लोकहितवादींवर चिपळूणकरांनी कितीहि कडक टीका केली तरी ती प्रमाण न मानतां आज आपण लोक-हितवादी व चिपळूणकर या दोघांनाहि त्या कालांतील विशिष्ट प्रवृत्तीचे प्रतिनिधि मानतों. तीच गोष्ट टिळक आगरकरांची, अगर केळकर जावडेकरांची.

नववाङमय व नवकाव्य यांची विचिकित्सक समीक्षा गेल्या दहा वर्षां-तील अध्यक्षांपैकी कवि यशवंत, कवि अनिल व गतवर्षीचें अध्यक्ष प्रा. क्षीरसागर यांनी केलेली आहे.

नवकाव्यांतील कांही प्रवृत्तीचा यशवंतांनी आपल्या भाषणांत सोदा-हरण परामर्श घेतलेला आहे. नवकाव्यांत प्रत्ययास येणारी दुर्बोधता कां आली याची छाननी करून ती (दुर्बोधता) अपरिहार्य आहे अशा युक्ति-वादाचें त्यांनी खंडन केलें आहे. प्रतिमासृष्टींत जो वेगळेपणा नवकाव्यांत दिसतो त्याचे पण त्यांनी विदारक विश्लेषण केलेलें असून कवीच्या विशिष्ट मनोधर्मांतून ह्या लकबी आलेल्या आहेत हें दाखवून दिलें आहे. नवकवींना

जीवनांत कुठेंच चारुता दिसत नसावी असें वाटते· ह्याहि बाबतींत ते म्हणतात 'ही सारी वास्तवता ह्यांच्या अंतर्यामीं मुरली असण्यापेक्षा वाचनांतून ह्यांना जाणवली असली पाहिजे.' नवकाव्य जें विषयांच्या बाबतींत अेकारल्यासारखें वाटतें तेंहि बरोबर नाही, असा त्यांचा अभिप्राय आहे. यशवंतांचें हें विश्लेषण १९५० अितकें जुनें आहे. अेका दशकांत ह्या काव्यावर पुष्कळ अुलट सुलट लिहिलें गेलें, पण हे आक्षेप तसे खोडून काढणें कोणास जमलेलें नाही.

यशवंतांनंतर १९५८ मधल्या मालवणच्या भाषणांत कवि अनिल यांनी पुन: नवकाव्याचें विश्लेषण केलें आहे. त्यांनी अव्यवस्थितप्रज्ञ प्रतिभावंतांचा अेक वर्गच करून हें साहित्य अनृजु (अॅबनॉर्मल) मनोवृत्तीं-तून जन्मास आलें आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यांतली नवीनता ते अमान्य करीत नाहीत. दुर्बोधतेचेंहि त्यांनीं बारकाअीनें परीक्षण केलें आहे. दुर्बोधतेचे निरनिराळे प्रकार कल्पिले आहेत. अव्यवस्थित प्रज्ञतेमुळे येणारी दुर्बोधता ही अबोधपूर्व आलेली असते असें ते म्हणतात

गतवर्षीच्या क्षीरसागरांच्या भाषणांतहि नववाङमयाविषयी अुल्लेख केला आहे. 'मी आज या वाङमयाकडे गुप्त समाजरोगाचें दृश्य लक्षण म्हणून पाहात आहे.' असें मत त्यांनी दिलेलें आहे.

नवकाव्य किंवा नववाङमयाची चिकित्सा अशा प्रकारें या अध्यक्षांनी केलेली असली तरी या श्रेष्ठ साहित्यिकांना नवीनता वर्ज्य आहे असें मानण्याचें कारण नाही. त्यांचें विश्लेषण हें टीकाविषय झालेलें असलें तरी त्या विश्लेषणांत सत्याचें कण विखुरले गेले आहेत, हें कोणासहि अमान्य करतां येणार नाही. यापैकी प्रत्येकाच्या टीकेमागे साहित्याविषयीची कळकळ आहे. प्रत्येकाने केलेलें दोषांचें विवेचन वेगवेगळ्या भूमिकांवरून केलेलें आहे. नववाङमयाच्या विकासाकरितां जशी थोडी स्तुति किंवा उत्तेजन जरूर असतें तशी थोडीशी चिकित्सक टीकाहि आवश्यक असते. आणि अप्रियतेचा धोका पत्करूनहि ज्या अर्थी ह्या मान्यवर साहित्यिकांनी ही चिकित्सा केली आहे; ज्या अर्थी ती अध्यक्षस्थानावरून केली आहे, त्या अर्थी तिचें त्यांना अपरंपार महत्त्व वाटतें हें स्पष्ट होत नाही काय ? या वस्तुस्थितीकडे लक्ष दिलें तर ह्या टीकाविषय झालेल्या भाषणांचें सुद्धा महत्त्व मान्य करावें लागतें.

वर अेके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे नववाङ्मयाविषयीचीं हीं मतें साकल्यानें अभ्यासण्यासारखीं आहेत हें लक्षांत धरणें जरूर आहे. नवकाव्य व वाङ्मय यांचें समर्थन करणारा जर अेखादा अध्यक्ष लाभला असता तर ह्या नव-वाङ्मयाच्या समीक्षेस पूर्णता लाभली असती, असें वाटल्याविना राहत नाही.

गेल्या दशकांतील संमेलनांच्या अध्यक्षापैकी जवळ जवळ प्रत्येक (अेकादा दुसरा अपवाद सोडून) अध्यक्षाने प्रचलित वा प्राचीन वाङ्मयाचा सूत्र रूपांत आढावा घेण्याचा अगर त्यांतील प्रचलित अगर प्राचीन वाङ्मयांतील कांही प्रश्नांचा अगर वादांचा अूहापोह करण्याचा प्रयत्न केला.

प्राचीन वाङ्मयाचा आढावा

प्राचीन वाङ्मयासंबंधी कांही प्रश्नांचा ज्यांनी परामर्श घेतलेला आहे अशांपैकी श्री. अ. का. प्रियोळकर, शं. दा. पेंडसे, पं. लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. कृ. पां. कुलकर्णी यांचीं भाषणें महत्त्वाचीं आहेत. सर्वच वाग्भटांचा प्राचीन साहित्याचा गाढा व्यासंग असल्यामुळे त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांच्या या व्यासंगाचे पडसाद उमटणें हें केवळ अपरिहार्य होतें. तथापि प्रत्येकाची भूमिका, दृष्टि ह्या भिन्न असल्याने प्रत्येकाचें विवेचन हें वेगळें व आपापल्या परीने आशयघन झालें आहे. प्रत्येकाच्या व्यासंगाचें क्षेत्र थोडें थोडें भिन्न असल्यानें व्यक्तिमत्त्वाच्या वेगळेपणाची कल्पना ह्या समालोचनांतून स्पष्ट होते.

श्री. अ. का. प्रियोळकर यांच्या भाषणाचा ह्या संदर्भांत प्रथम अुल्लेख करावा लागेल. त्यांनी आपल्या भाषणांत मराठी साहित्यांत प्राचीनकालांत गोमंतक विभागाने जी बहुमोलाची भर घातली आहे तिचें विवेचन केलें. या वाङ्मय-परंपरेला दोन धारा आहेत. पहिली रमावल्लभदास निरंजन माधव आदि संतकवींची. ह्या कवींचा समावेश अितर प्राचीन संत वा पंडित कवींमध्यें सहज करतां येअील. दुसरी धारा म्हणजे ख्रिस्ती प्रसारकांनी लिहिलेल्या साहित्याची होय. ह्या संबंधांत प्राचीन मराठी कवि फादर स्टीफन्स याचा अुल्लेख करावा लागतो. ह्या परंपरेंतील कांही कवींचा अुल्लेख प्रियोळकरांनी केला आहे.

अितर तात्कालिक महत्त्व पावलेल्या प्रश्नांचा परामर्श घेतल्यानंतर प्रियोळकर आपल्या भाषणांत पुनः अेकदां वाङ्मय-संशोधनाकडे वळले आहेत.

प्राचीन हस्तलिखितांच्या अभ्यासाबाबतची अेक योजनाहि प्रियोळकरांनी आपल्या भाषणांत मांडली आहे, आणि या बाबतींत विद्यापीठांनी साहाय्य करण्याची नितान्त आवश्यकता प्रतिपादिली आहे. गोमंतकीय साहित्यांत मुसलमानांचाहि कांही महत्त्वाचा वाटा आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख करून अैतिहासिक कोशाची अेक कल्पना लोकांपुढे विचारासाठी मांडली आहे.

कोकणीबाबतचा वाद

पण या विवेचनापेक्षा प्रियोळकरांच्या अध्यक्षीय भाषणांत अेका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाचा अहापोह झालेला आहे. व समर्पक बिनतोड युक्तिवाद करून तो प्रश्न जवळ जवळ सोडविला आहे. हा प्रश्न म्हणजे गोमंतकीय कोकणी, सर्वसाधारण कोकणी म्हणून ओळखली जाणारी भाषा ही मराठीची बोली कीं कन्नडची ? स्वकीयांच्या ठिकाणीं उपेक्षा व औदासीन्य ह्या दोषांचा अतिरिक्त प्रादुर्भाव झाल्यानें प्रतिपक्षाच्या कारवायांना व युक्तिवादाला कसें अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होतें हें प्रियोळकरांनी ह्या प्रश्नाच्या विवेचनांत दाखवून दिलें आहे.

भाषिक राज्यांच्या प्रश्नाला जसजसें महत्त्व प्राप्त होअू लागलें तसतसा सीमाप्रदेशांतील बोलींचा प्रश्न अधिक महत्त्वाचा व विवाद्य ठरूं लागला. कर्नाटक व गुजरात यांच्या भूप्रदेशाला लागून असणाऱ्या कोकणी व डांगी ह्या बोली त्या दृष्टीने विवाद्य ठराव्या हें अपरिहार्य होतें. प्रियोळकरांनी भाषाशास्त्रीय पुराव्यानिशीं दाखवून दिलें की, कोकणी ही मराठीचीच बोलीभाषा असून कन्नड वा गुजराती लोकांचा तिच्यावरचा हक्क मान्य करतां येअील असें वाटत नाही

अितिहासांतील पुराव्यानिशी त्यांनी कोकणी ही मराठीचीच अेक बोली आहे हें सिद्ध केलें आहे. कोकणी ही वेगळी भाषा मानून तिची ग्रांथिक भाषा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला तर " मंगळरकडील शुद्ध कोकणी मागे पडून गोवानिज लोकांची पोतुगीजमिश्रित संकर बोली प्रमाणभाषा म्हणून मान्य करावी लागेल. कारण त्यांनीच त्या बोलींत लिहिण्याची प्रथम सुरुवात केली आहे " असा अेक अिशाराहि त्यांनी जातांजातां दिला आहे.

प्रियोळकरांचें हें सर्व विवेचन अतिशय शास्त्रशुद्ध व निराग्रही असल्याने आणि त्याला आधाराची जोड असल्याने त्यांतील युक्तिवाद बिनतोड आहे.

त्या भाषणानंतर तरी कोकणी भाषेसंबंधी वाद निर्माण होण्याचें कारण नाही. परंतु वाद निर्माण करणारे लोक हे सामान्यतः राजकीय चळवळचे असतात. त्यांचाच प्रयत्न असले वाद जिवंत ठेवण्याच्या बाजूनें असतो.

कोकणीबरोबर डांगी भाषेंबाबतचाहि अूहापोह प्रियोळकरांनी केलेला आहे. डांग हा शब्द मराठींत किती जुना आहे हें दाखवून डांगी भाषा ही गुजरातीपासून भिन्न आहे, तिचें मराठीशी नातें जवळचें आहे हें दाखवून दिलें आहे. प्रा. रा. श्री. जोग यांनी डांगी भाषेचें असेंच परीक्षण करून ती मराठीचीच बोली आहे हें सिद्ध केलें आहे; हेंहि या संदर्भांत ध्यानांत ठेवतां येण्यासारखें आहे.

अुपभाषेच्या आवश्यकता व मर्यादा

ह्या अुपभाषांच्या प्रश्नाला भाषिक वादामुळे महत्त्व मिळणें हें अेका परीने अपरिहार्य होतें. कदाचित् अेकभाषी राज्यांतहि अेखाद्या विशिष्ट प्रादेशिक बोलीला कांही कारणांपुरतें स्वतंत्र महत्त्व वा स्थान द्यावेंहि लागेल. पण तो देवघेवीचा अेक भाग होअील. मोठ्या प्रदेशावर जी भाषा बोलली जाते ती अेकस्वरूपी असणें असंभवनीय आहे. भाषाशास्त्रीय सिद्धान्तांशी तें पूर्णपणें विसंगत आहे. त्या दृष्टीने अेखाद्या मोठ्या प्रदेशांत विविध बोली-भाषा प्रचारांत असणें अशक्य नाही. मराठी भाषेविषयीच बोलावयाचें झालें तर मराठीच्या कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी अित्यादि ज्या प्रमुख बोली-भाषा आहेत त्यांचें महत्त्व कायम राहील. त्यांत थोडें फार ललित-वाङ्मयहि निर्माण होत राहील व तसें झालें तर त्यांत कांही वावगेंहि नाही. त्यायोगें मूळ मराठी ही अधिक समर्थ होअील. तिच्यांतली विविधता तिला भूषणावहहि होअू शकेल. तसेंच या भाषांतलें जें लोकसाहित्य उपलब्ध होण्यासारखें आहे तें मुद्रित करण्याचेहि प्रयत्न होतील व त्यांत कांही वावगें नाही. पण या भाषिकांना जर आपण वेगळें आहोंत असें वाटू लागलें व त्या दिशेने जर त्यांच्या राजकीय आकांक्षा जागृत होअू लागल्या तर मात्र थोडी काळजी करण्यासारखी परिस्थिति निर्माण होअील. अर्थात् हेंहि पण राजकीय, आर्थिक परिस्थितीवर आणि राज्यसंस्थेच्या भाषाविषयक व सांस्कृतिक धोरणावर बरेंचसें अवलंबून आहे.

विज्ञानाचा वेगाने जो प्रसार होत आहे त्याच्याकडे लक्ष दिलें तर यापुढे नवीन बोली-भाषा निर्माण होण्याची क्रिया संपुष्टांत येअील किंवा तिचा वेग कमी होअील, असें वाटतें. कारण रेडिओ, वृत्तपत्रें आदि ज्ञान-प्रसाराच्या साधनांनी फार मोठ्या प्रदेशावरहि अेकाच प्रकारची भाषा बोलली वा वापरली जाणें शक्य झालें आहे. किंबहुना तसें झालेंहि आहे. दळणवळणाच्या साधनांच्या प्रसाराने लोक अधिकाधिक जवळ येत आहेत. त्यांना सर्व-सामान्य अशी राष्ट्रभाषेची वा मोठ्या भाषेची आवश्यकता वाटूं लागली आहे. पुढे-मागे जग-भाषेचीहि आवश्यकता वाटूं लागेल. अशा परिस्थितींत बोली-भाषांना मुख्य भाषेचा व स्वायत्त दर्जा यापुढच्या काळांत निर्माण होअील असें वाटत नाही. याचा अर्थ त्यांचें वैशिष्ट्य वा वेगळेपण सक्तीने नष्ट करावें असा नाही. आणि तें सक्तीने नष्ट करणें कोणासहि शक्य नाही. कलात्मक वा (अनुभवात्मक) तत्सम आविष्कारांत वेगळ्या वेगळ्या भाषांना जरूर स्थान आहे; पण बाकीच्या विकासास त्यांना प्रमाण-भाषेचा वा मध्यवर्ति भाषेचा अवलंब करणें अपरिहार्य आहे.

या संदर्भांत विज्ञानाचा भाषिक क्षेत्रावर यापेक्षा अगदी वेगळा किंब-हुना अगदी विरुद्ध असा परिणाम कसा होत आहे हेंहि पाहणें या ठिकाणीं अुद्बोधक होअील. भाषाशास्त्राच्या क्षेत्रांत जी वाढ झालेली आहे तिचा रोख पाहिला तर भाषाशास्त्रज्ञ आज ग्रांथिक भाषा प्रमाण मानीत नसून बोली भाषा प्रमाण मानूं लागले आहेत. त्या दृष्टीने निरनिराळ्या बोलींचा भाषा-शास्त्रीय अभ्यास आज जोराने सुरू झालेला आहे. या गोष्टीचा भाषा- भाषां-मधील भिन्नता व विविधता टिकण्यास अुपयोग होअील असें वाटतें. भाषा व अुपभाषा यांच्या संबंधाचा प्रश्न यापुढे प्रामुख्याने भाषाशास्त्रीय राहील. त्याला राजकीय महत्त्व प्राप्त होणार नाही. निदान होअूं नये असें वाटतें.

प्रबंधवजा भाषणें

प्रा. कृ. पां. कुलकर्णी, श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. शं. दा. पेंडसे यांचीं भाषणें म्हणजे मराठी साहित्य आणि मराठी संस्कृति या विषयावरचे छोटेखानी स्वतंत्र प्रबंध होत. संस्कृतीविषयी प्रत्येकाचा दृष्टि-कोन वेगळा आहे. साहित्य आणि संस्कृति ह्यांचे परस्पर संबंध कसे असतात

ह्याबाबत प्रत्येकाची विशिष्ट भूमिका आहे आणि त्या भूमिकेवरून प्राचीन मराठी साहित्याचें व अर्वाचीन साहित्याचें यापैकी प्रत्येक अध्यक्षाने विवेचन केलें आहे.——स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक क्षेत्रांत पुनर्मापनाची वा पुनर्मूल्यमापनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विचारक्षेत्रांतली ही प्रमुख प्रवृत्ति आहे. तिचें प्रत्यंतर ह्या तीन मान्यवर वाग्भटांच्या भाषणांतून येतें. हे तीन स्वतंत्र प्रबंध (Thesis) आहेत. त्यांचें त्या दृष्टीने मूल्यमापन व्हावयास हवें. मराठी भाषा व मराठी साहित्य अेक नव्या अुच्च व शास्त्रीय अवस्थेंत पदार्पण करीत असल्याचें हें लक्षण आहे. अशा प्रकारच्या प्रबंध-वजा भाषणांकडे पाहिलें की असें वाटतें की हे असले प्रबंध अेकत्र करून वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासास विद्यापीठांत नेमावेत व त्यांचा अभ्यासकां-कडून साक्षेपाने अभ्यास करून घ्यावा. या तीन भाषणांच्या जोडीला प्रो. पोतदार, आचार्य जावडेकर, प्रा. न. र. फाटक, प्रा. श्री. म. माटे, यांचीं भाषणें घेतलीं तर मराठींत वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासास अतिशय अुपयुक्त असणारें अेक अुत्कृष्ट पुस्तक अुपलब्ध होईल.

आणखी कांही खंड

तीच गोष्ट आधुनिक वाङमयाच्या समीक्षणासंबंधी म्हणतां येईल. कित्येक अध्यक्षांनी आधुनिक वाङमयाचें समालोचन केलेले आहे. १९३५ पूर्वीहि असलीं समालोचनें अध्यक्षीय भाषणांत येत असत ; पण तीं बरींच जुजबी असत. हा अुल्लेख पहिल्या निबंधांत आलेलाच आहे. या पूर्वींच्या कालखंडांत आधुनिक वाङमयाच्या गुणदोषांचें जें विवेचन आलें आहे तें असें जुजबी वाटत नाही. वाङमयास प्रौढत्व प्राप्त झाल्याचें त्यांतून प्रत्ययास येतें. अशा प्रकारच्या भाषणांचा अेक उत्कृष्ट संग्रह विद्यापीठीय अभ्यासास अत्यंत अुपयुक्त व मार्गदर्शक असा ठरेल. या कालखंडांतील यशवंत, विठ्ठलराव घाटे, अनिल व क्षीरसागर यांचीं भाषणें ह्या संदर्भात दृष्टीपुढे येतात. पूर्वकालांतील अध्यक्षीय भाषणांपैकी, वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, भा. वि. वरेरकर, प्रा. ना. सी. फडके यांचीहि भाषणें ह्या संग्रहांत समाविष्ट करणें अुचित होईल.

याच संदर्भांत आणखीहि अेकदोन असल्याच ग्रंथांच्या कल्पना सुच-तात. त्यांचा अुल्लेख येथें करणे अिष्ट होईल. ह. ना. आपटे, न. चिं.

केळकर, वा. म. जोशी यांच्या भाषणांना सार्वकालिक महत्त्व आहे. तीं अशींच अेकत्र ग्रंथरूपाने समाविष्ट होणें आवश्यक आहे.

त्याशिवाय, ज्या ज्या अध्यक्षांनी अेकेका विषयाचा अुपन्यास घेतलेला आहे अशा अध्यक्षीय भाषणांचाहि अेक अुत्कृष्ट ग्रंथ निर्माण होअू शकेल. ह्या संदर्भात श्री. कृ. कोल्हटकर, डॉ. केतकर, डॉ. माधवराव पटवर्धन, बॅ. विनायकराव सावरकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व अनंत काणेकर यांच्या भाषणांची आठवण होते.

अर्थात् हीं भाषणें त्या दृष्टीने संपादित करावीं लागतील. प्रत्येक भाषणांत समकालीन अुल्लेख येणे अपरिहार्य आहेत. संकलन करण्याच्या वेळी त्यांची छाननी करणे योग्य होअील. याशिवाय चिं. वि. वैद्य, ना. गो. चापेकर, अ. का. प्रियोळकर अि. चीं भाषणें प्राचीन मराठी वाङमयासंबंधी व संशोधनासंबंधी नवा दृष्टिकोन मांडणारी अशीं आहेत. त्यांचाहि अेक स्वतंत्र गट होऊं शकेल.

मराठी वाङमयाचा साहित्य परिषद पुरस्कृत अितिहास केव्हा तयार व्हायचा असेल तो होवो. तत्पूर्वी साहित्य परिषदेने हें काम हातांत घण्यासारखें आहे. त्या अितिहासासाठी कालाने लिहून घेंतलेलें अेक ' प्रकरण ' म्हणून या संग्रहांना विशेष महत्त्व राहील. कारण हें सर्व मान्यवर साहित्यिक लोकांना आदरणीय ठरलेले आहेत. त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत त्या त्या व्यक्तींचा स्वतंत्र व्यासंग आणि लोकाकांक्षा यांचा समन्वय झालेला असतोच. पण त्याशिवाय त्याने निवडलेल्या विषयाला त्याच्या दृष्टीनेहि व अैतिहासिक दृष्टीनेहि कांही महत्त्व प्राप्त झालेलें असतें. या सर्व गोष्टींची नोंद साहित्याच्या व संस्कृतीच्या अितिहासांत कोठेतरी व्हावयास हवी आणि त्या दृष्टीने ही कल्पना ह्या ठिकाणीं मांडलेली आहे. संबंधितांचें तिकडे लक्ष वेधलें तरी ह्या समालोचनाचें सार्थक झालें असें मी म्हणेन.

: २ :

अध्यक्षीय भाषणांतील प्रमुख विषयांचें वा विचारांचें विवरण संपल्यानंतर कांही स्फुट विचारांचा वा प्रश्नांचा अुल्लेख करणें आवश्यक आहे.

जवळ जवळ अेका तपाच्या ह्या कालांत अनेक प्रश्न निर्माण झाले, कित्येक या ना त्या रीतीने निकालांत निघाले, कित्येक सरळ मागे पडले तर कित्येकांनी वेगळेंच स्वरूप धारण केलें आणि कांही अद्यापहि अनिर्णित अवस्थेंतच आहेत. अुलटपक्षी असे कांही प्रश्न आहेत कीं, त्यांचें स्वरूप नेहमीच विवाद्य राहणार; किंबहुना त्यांच्यामधील विवाद्यता हेंच साहित्याच्या मोठेपणाचें लक्षण होय असें म्हटलें जातें व तें सर्वथा योग्य आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याने कित्येक प्रश्नांची सोडवणूक सोपी झाली नसली तरी तिच्यांतील अवघडपणा कमी झालेला आहे.

समालोचनाचा प्रश्न

जे प्रश्न निर्माण झाले आणि कांही दिशेने ज्यांची सोडवणूक होत आहे असें दिसतें अशा प्रश्नांत साहित्य समालोचनांचा प्रश्न बऱ्याच वरच्या क्रमाकांचा प्रश्न म्हणून अुल्लेखावा लागेल. संमेलनाध्यक्षांच्या अनेक भाषणांतून समालोचनें आलेलीं आहेत. तर कांहींनी अशीं समालोचनें होण्याची व्यवस्था संमेलनाने करावी अशा सूचना केल्या आहेत. समकालीन वाङ्मयाच्या समालोचनाचें महत्त्व वाङ्मयाभिवृद्धीच्या दृष्टीने अतिशय आहे याबद्दल वाद नाही. त्या दृष्टीनेच समालोचनांच्या कांही योजना अलीकडे कार्यवाही झालेल्या दिसतात. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा वर्षातील अेक अंक त्या त्या वर्षांतील ग्रंथाच्या समालोचनास वाहिलेला दिसतो. पूर्वी वाङमय समालोचनाच्या वार्षिक माला झाल्या आहेत. अेका मालेचें पुस्तकहि प्रसिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें मुंबई मराठी साहित्य संघातर्फे 'साहित्य' हें परीक्षण–वार्षिक पण प्रतिवर्षी प्रकाशित व्हावयाचें निश्चित झालेले दिसतें. दिवाळी अंकांतील साहित्याचें समालोचनहि विस्तारानें 'मौज'सारखी साप्ताहिकें साक्षेपाने देत असतात. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे याच विषयावर वार्षिक व्याख्यानसत्रेंहि आयोजिलीं जातात आणि अेकंदरीने पाहिलें तर समालोचनांचे योजनाबद्ध प्रयत्न चालू आहेत असें दिसतें.

अशा समालोचनाची जरुरी

समकालीन वाङमयाच्या समालोचनाच्या जरुरीसंबंधी थोडें विवेचन

यापूर्वी अध्यक्षीय भाषणांचा आढावा घेतांना केलेलें आहे. हीं समालोचनें मार्गदर्शक तर निश्चितपणें व्हावींत. पण अद्यापहि हें काम जितक्या बारकाईनें व्हावयास हवें तेवढे तें चाललेलें दिसत नाही. विशिष्ट ग्रंथाच्या वा ग्रंथांतील विवेचनाच्या योग्यतेबद्दल निरनिराळ्या टीकाकारांत मतभेद निर्माण होणें हें अगदी सहज शक्य आहे व केवळ मतें वेगळीं आलीं किंवा प्रतिकूल मन व्यक्त झालें तर त्या टीकेचें महत्त्व कमी होतें असें मानण्याचें कारण नाही. हें समालोचन करणारे लेखक अधिकारी लेखकच असतात आणि त्यांच्या व्यासंगाबद्दल तशी शंका घेण्याचें कोणासच कारण नाही; परंतु ह्या लेखकांकडून हें काम जितक्या कटाक्षाने व्हावयास हवें तितकें तें होतें असें दिसत नाही. विशिष्ट प्रकारचें विधान करतांना त्या विधानाला आधारभूत असणारी माहिती तरी बिनचूक असावी ना; पण तसेंहि नसतें. त्यामुळे अशा प्रकारच्या परीक्षणापासून लेखकावर अतिशय अन्याय होतो. मराठींत मूळ ग्रंथ फारच थोड्या प्रमाणांत वाचले जातात. बरेचसे लोक अभिप्रायावरूनच आपलें मत बनवितात आणि त्यावरूनच ग्रंथाची कल्पना करून घेतात. यावरून अभिप्राय-लेखकांची जबाबदारी किती वाढते तें सांगावयाची आवश्यकता नाही. प्रमाणभूत (Standard) व अधिकारी संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या अभिप्रायांत वरील दोष आढळतात तर वृत्तपत्रांतलें अभिप्राय-वाङ्मय काय दर्जाचें असेल हें कल्पनेनेच जाणणें बरें.

समालोचनांच्या निरनिराळ्या योजना व निरनिराळे प्रयत्न ठिकठिकाणी जोरांत चालू असले तरी जोपर्यंत माहितीच्या बिनचूकपणाचें महत्त्व लेखकांस पटत नाही, जोंपर्यंत कोणत्या तरी निकषांचा अवलंब केला जात नाही तोंपर्यंत ह्या बाबतींत कांहीं फारशी सुधारणा होईल असें वाटत नाही.

शुद्धलेखनाचा प्रश्न

संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतून आलेल्या लहान लहान प्रश्नांचा उल्लेख कित्येकदां अतिशय ओझरता व त्रोटक असतो. त्याची दखल फक्त अध्यक्षाने घेतलेली असते. अशा अव्वल दृष्टीने पाहिलें असतां कमी महत्त्वाच्या पण विशिष्ट परिस्थितींत व संदर्भांत अधिक महत्त्व पावलेल्या प्रश्नांत मराठी शुद्धलेखनाच्या प्रश्नाचा समावेश करावा लागेल.

तसें म्हटलें तर १९०८ च्या अधिवेशनांत हा प्रश्न प्रथम चर्चिला गेला. शुद्धलेखनाबाबतची चर्चा ही फार जुनी आहे. १९०४ पर्यंत अितकी या वादाची पीठिका जाअू शकते. प्रत्येक वेळां या वादाशी संबद्ध असणाऱ्या वेगळ्या वेगळ्या प्रश्नांना महत्त्व प्राप्त झालें. अगदी प्रथम वाद झाला तो ऱ्हस्व-दीर्घाबद्दल होता व त्या वादांतील एक बाजू तत्कालीन सरकार होतें. त्याबाबत संस्कृतला धरून ऱ्हस्व-दीर्घ लेखन मराठींत व्हावें, असा निर्णय घेतला गेला व तो सर्वत्र रूढ झाला. त्यानंतर मात्र १९२४ पर्यंत एकंदरीने सामसूम होती.

या वादाला अलीकडे महत्त्व प्राप्त झालें तें न. चिं. केळकरांच्या टिळक चरित्राच्या दुसऱ्या खंडाच्या प्रकाशनानंतर. शुद्धलेखनाच्या इतिहासांतला हा फार मोठा मैलाचा दगड आहे. या वेळी मात्र अनुस्वारांच्या प्रश्नाला भलतेंच महत्त्व प्राप्त झालें. अनुस्वारांचें लेखन व अुच्चारण यांत तफावत आहे. कांही प्रादेशिक विभागांत अनुस्वारांचा अुच्चार स्पष्टपणें होतो. अुलट कांही जिल्ह्यांतून तर मराठी भाषा जवळजवळ निरनुनासिक बोलली जाते. साहजिकपणें या विविधतेकडे समाजाचें लक्ष वेधण्याचें काम तात्यासाहेब केळकरांच्या अुपरिनिर्दिष्ट ग्रंथाने केलें व तात्यासाहेबांसारख्या मोठ्या पंडिताने या वादांत लक्ष घातल्याने त्याकडे दुर्लक्ष करणें विद्वानांनाहि शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत मार्ग काढण्यासाठी निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या समित्यांची नियुक्ति झाली. त्यांचा निर्णय व अनुकूल-प्रतिकूल टीका चर्चाहि खूप झाली. मराठी व्याकरणाकडेहि त्या दृष्टीने लक्ष गेलें. व्याकरणांत अेकसूत्रीपणा आणण्यासाठीहि निरनिराळ्या समित्या नेमल्या गेल्या. अुदाहरणार्थ कोल्हापूरच्या सम्मेलनांत अेक समिति नेमली गेली.

अि. स. १९३० च्या मडगांवाच्या संमेलनाने अधिवेशनांत शुद्धलेखनाचे प्रसिद्ध नवे नियम संमत झाले. त्यानंतर कांही काळ पुनः स्तब्धता निर्माण झाली. पण १९४४ पासून पुनः वादाला सुरुवात झाली आहे. साहित्य-संमेलनाच्या आदेशानुसार १९५३ मध्ये नवी शुद्धलेखन समिति अस्तित्वांत आली. तिने मान्य केलेले निष्कर्ष शुद्धलेखन महामंडळापुढे संमतीसाठी मांडण्यांत आले (१९५७). या वादाच्या अनुषंगाने वृत्तपत्रांतून लेखांच्या द्वारें खूप अुलटसुलट चर्चा झालेली आहे. तथापि १९३०चे मडगांव संमेलनांतील

संमत झालेले नियमच आज सामान्यतः सर्व संमत झालेले आहेत. (नागपूर विद्यापीठाने आपले स्वतःचे वेगळे नियम तयार केलेले असले तरी त्याचा ह्या नियमांना विरोध नाही) ह्या नियमांना सरकारी मान्यताहि नुकतीच मिळाली आहे व त्या दृष्टीने पुनः कांही काळ तरी या वादाच्या बाबत स्तब्धता निर्माण व्हावी अशी आशा करूं या.

शुद्धलेखनाच्या क्षेत्रांतील अराजकतेबद्दल अनेक अध्यक्षांनी नापसंती व्यक्त केलेली आहे. पहिल्या निबंधांत त्यासंबंधी अुल्लेख आलेला आहेच. या दशकांत श्री. विठ्ठलराव घाटे व डॉ. पेंडसे यांनी आपल्या भाषणांत ह्या वादाचा अुल्लेख दोघांनीहि करून अनुच्चारित अनुस्वारांचें अुच्चाटण लवकर होणें आवश्यक आहे असें मत व्यक्त केलें आहे. अर्थात् त्यावेळी नवी समिति स्थापन झालेली होती व त्या समितीने या विषयाबाबत साक्षेपी भूमिका घ्यावी म्हणूनहि तो अुल्लेख आलेला असणें शक्य आहे.

नवी पार्श्वभूमि

शुद्धलेखनाचा वाद हा अेका दृष्टीनें पाहिलें असता कमी महत्त्वाचा वाटला तरी सांस्कृतिक जीवनाशी त्याचा संबंध जवळचा असल्याने त्या-दृष्टीने तो महत्त्वाचा ठरतो. आतापर्यंत हा वाद सुशिक्षित वर्गातील व्यक्तीं-मध्येच खेळला जात असे. पण स्वातंत्र्य काळांत शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होअूं लागला तसतसें ह्या बाबतचें धोरण लवचिक असावयास हवें, अशी आवश्यकता सर्वांनाच वाटूं लागली. त्याशिवाय भाषाशास्त्राच्या अभ्यासांत बोली भाषांच्या अभ्यासास महत्त्व प्राप्त झाल्याने शुद्ध अशुद्ध ठरविण्याचे जुने निकष व संकेत एकदम मागे पडले. नवेनवे विचार पुढे येत आहेत. मराठी भाषा लोकाभिमुख व सोपी होण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या सूचना पुढे येत आहेत. सर्वसामान्य मराठी व्यक्ति जी भाषा बोलते ती भाषा शुद्ध मानावी, निदान बहुजन-समाजाच्या भाषाव्यवहारांतलीं प्रमुख रूपें विकल्पाने शिष्टसंमत मानलीं जावयास प्रत्यवाय नसावा; असे विचार मधून मधून व्यक्त केलेले दिसतात. तथापि शुद्धलेखनाच्या बाबतींत आज १९३० च्या नियमांपर्यंतच आपण आलेले आहोंत हें नमूद करणें आवश्यक आहे.

अितर विषय

याशिवाय अखंड विवाद्य असणारे अनेक विषय आहेत की, ज्या

विषयांवर आपलें मत व्यक्त करणें अध्यक्षभूत व्यक्तीला आवश्यक वाटतें. हे विषय आताच म्हटल्याप्रमाणे अखंड विवाद्य असतात. तशा प्रकारचे विवाद्य असणें हेंच या विषयाचें वैशिष्टच होय. साहित्य ज्या वेळीं प्रगल्भावस्थेंत प्रवेश करतें त्या वेळीं या विषयांच्या विवेचनांतली सूक्ष्मता वाढीला लागते. पूर्वावस्थेंत असणारा अेकांगी वा अेकतर्फी आग्रह कमी पडतो व अेकंदरीने सत्यसंशोधनाला पोषक अशी मनोवृत्ति निर्माण होते.

अशा अखंड विवाद्य प्रश्नापैकी पहिल्या निबंधांत सहेतुक निरहेतुक वादाचा अुल्लेख आलेलाच आहे. आज ह्या वादास ' आशय वि. अभिव्यक्ति ' वादाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. ह्या वादांतील परस्परविरोधी भूमिका पूर्वकालीन वादाशी सदृश वाटतात. पण बारकाईने पाहिलें असतां त्या तशा नाहीत असें आढळून येअील. या स्वरूपाचे आणखी विषय म्हणजे श्लील-अश्लीलतेचा वाद, कलानीतिवाद अि. वादांबाबतचे अुल्लेख अनेक अध्यक्षांच्या भाषणांतून आलेले आहेत. पण त्यांचें म्हणणें मुळांतून पाहणें आवश्यक आहे. मराठी साहित्य प्रगल्भावस्थेस पोचलें आहे अेवढीच गोष्ट ह्या वादांच्या संबंधांत लक्षांत येते. नवें वाङमय व त्याच्या परिशीलनाच्या अनुषंगाने नवे निकषहि निर्माण होतात. ते निकष नवे की जुन्या निकषांवर वा मूल्यांवर काजळी चढल्यामुळे ते शबलित झाल्यासारखे वाटतात, हाहि विचाराचा भाग असू शकतो. अेकंदरीने वाङमयीन शास्त्रीय प्रश्नांची मीमांसा केवळ अध्यक्षीय भाषणांतील तद्‌विषयक अुल्लेखांनीच केवळ करणें हें योग्य होणार नाही. म्हणून ह्या प्रश्नांचा हा अुल्लेख अंगुलीनिर्देश करण्यापुरताच केला आहे.

वाङमयेतिहास योजना

ओझरता अुल्लेख आलेला तिसरा प्रश्न म्हणजे वाङमयीन अितिहासाच्या योजनेचा. साहित्यपरिषदेपुढे या ना त्या स्वरूपांत ही योजना आहे. या योजनेसंबंधी घडलेल्या घडामोडी अितक्या ताज्या आहेत की, त्यांचा परमार्ष येथे घेण्याचें कारण नाही. याशिवाय कोणत्याहि अध्यक्षीय भाषणांत या योजनेबाबत तसें तात्त्विक विवेचन आलेलें नाही. ओझरता अुल्लेख विठ्ठलराव घाटे यांच्या भाषणांत आलेला आहे. अद्यापपर्यंत ही योजना तरी कार्यवाहीत आलेली नाही. बदललेल्या परिस्थितींत परिषदेचें कार्य काय असावें याबाबत अधिक चर्चा होअू शकेल आणि नव्या अवस्थेंत परिषद् ही योजना

अधिक आत्मविश्वासाने पार पाडूं शकेल. शिवाय ही योजना परिषदेला आजपर्यंत कां पार पाडतां आली नाही, याची कारणमीमांसा करावयास लागलों तर सुशिक्षित मराठी माणसाच्या मनोरचनेविषयी व प्रवृत्तिविषयी बरेंच विवेचन करणें आवश्यक होईल. तें येथे आवश्यक नाही. ह्याशिवाय केवळ ओझरता अुल्लेख आलेला हा प्रश्न असल्यानें त्यासंबंधी येवढें विवेचन पुरे.

अध्यक्षीय भाषणांचे प्रकार

कवि अनिल यांनी आपल्या मालवणच्या अध्यक्षीय भाषणांत अध्यक्षीय भाषणासंबंधी सर्वसाधारण स्वरूपाचें विवेचन केलें आहे. त्यांनी अध्यक्षीय भाषणांचे चार पांच प्रकार मानलेले आहेत. पहिला प्रकार म्हणजे वर्षांतील वाङमयाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न अध्यक्षाने करणें. हा प्रकार केव्हाच मागे पडलेला आहे. याचा अुल्लेख पहिल्या निबंधांत आलेलाच आहे. तथापि अशा प्रकारें केवळ समालोचनाला प्राधान्य देणारीं भाषणें जरी आजकालचे अध्यक्ष करीत नसले तरी त्यांच्या भाषणांतून असें समालोचन नसतेंच असें नाही. गेल्या दशकांतील होअून गेलेल्या अध्यक्षांपैकी जवळजवळ प्रत्येकाने आपल्या भाषणांतून असा वार्षिक वा मध्यकालीन सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घेतलेला आहे. कृ. पां. कुलकर्णी, वि. द. घाटे, लक्ष्मणशास्त्री जोशी, शं. दा. पेंडसे अि. च्या भाषणांतून आलेला समकालीन वाङमयाचा परामर्श अुल्लेखनीय आहे.

अनिलांनी मानलेला दुसरा प्रकार म्हणजे अध्यक्षांनी अेखादा मौलिक शास्त्रीय सिद्धान्त मांडणें.—अशा प्रकाराचीं भाषणें ही अेखाद्या प्रबंधासारखीं असूं शकतात असें त्यांचेंच म्हणणें आहे. या दशकांतील या दृष्टीने महत्त्वाचीं भाषणें म्हणजे तर्कतीर्थ जोशी, कृ. पां. कुलकर्णी, शं. दा. पेंडसे यांची होत.

तिसरा प्रकार म्हणजे सर्वांना तीव्रतेने जाणवणारे राजकीय प्रश्न अध्यक्षीय भाषणांतून चर्चिले जाणें. मराठी साहित्य संमेलनाची जी परंपरा आहे तिच्या अनुरोधाने शुद्ध राजकीय विचारांची चर्चा सामान्यत: कोणी केलेली नाही. आपण साहित्याच्या व्यासपीठावरून बोलत आहोंत अशी जाणीव नेहमीच अध्यक्षांनी ठेविली आहे. राजकीय स्वरूपाचा व आता कालसमाविष्ट झालेला अेकच प्रश्न साहित्यसंमेलनांत महत्त्व पावूं शकला, तो संयुक्त महाराष्ट्राचा. या बाबतचें विवेचन यापूर्वी विस्ताराने आलेलें आहे.

अनिलांनी मानलेला चवथा प्रकार म्हणजे ' आपण स्वतः केलेलें साहित्यिक कार्य व त्यांतले अनुभव आणि रहस्य विशद करावें '–त्यांच्याच मतें ' हा प्रकार फार थोर साहित्यिकांनाच शोभून दिसतो. '–अशा प्रकारच्या भूमिकेवरून अध्यक्षीय भाषण कोणी लिहिलेलें आहे असें वाटत नाही. गेल्या दतकांत ज्या वादाला विशिष्ट महत्त्व प्राप्त झालेलें होतें त्यामुळे अशा प्रकारच्या अनुभवाचें व रहस्याचें स्वागत करण्याच्या स्थितींत मराठी जनताच नव्हती. शिवाय अशीं भाषणें हीं सम्मेलनाचें आजचें जें स्वरूप आहे त्याला झेपणार नाहीत. अद्यां सम्मेलनाचें हें असें सर्वंकष जागृतीला पोषक असें व जवळजवळ राजकीय संघटनेसारखें स्वरूप जाऊन लेखक वा विद्वत्परिषदेचें स्वरूप प्राप्त झालें तरच त्या ठिकाणी अनिलांना या अपेक्षित अशा प्रकारचीं भाषणें अैकावयास मिळतील. तेव्हा या प्रकारचीं भाषणें झालीं नाहीत याला कारण तसल्या योग्यतेचीं माणसें अध्यक्षपदीं विराजमान झालीं नाही असें नव्हेत, तर परिस्थितीच अनुकूल नव्हती हें होय.

अनिलांनीं मानलेला चवथा भाषणाचा प्रकार म्हणजे स्वतःच्या मनाला जाणवणाऱ्या प्रश्नांचें अेक प्रकट चिंतन करणें हा होय. या प्रकारचीं बरींच भाषणें सांपडूं शकतात. कविवर्य यशवंत, अ. का. प्रियोळकर, वि. द. घाटे, अनिल, श्री. के. क्षीरसागर यांचीं भाषणें या दृष्टीने अुल्लेखनीय आहेत. अेका अध्यक्षीय भाषणांतूनच अध्यक्षीय भाषणाबाबतचा अुहापोह केला आणि त्या दृष्टीने गेल्या दशकांतील अध्यक्षीय भाषणांची ही मीमांसा केलेली आहे.

संमेलनाध्यक्षांच्या भाषणांतील प्रमुख व दुय्यम प्रश्नांचें व विचारांचें विवेचन या निबंधांत पूर्ण केलें आहे. त्यावरून ही साहित्याची सरिता आधुनिक काळांत कशी विकसित होत आली आहे याची कल्पना येअू शकेल; विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांत निरनिराळ्या प्रश्नांना कसें महत्त्व प्राप्त झालें होतें याचीहि कल्पना येअू शकेल. या विवेचनाच्या आधारें अेकंदर साहित्यिक प्रश्नांची व्याप्ति कशी वाढत गेलेली आहे याचा पण मागोवा घेणें योग्य होईल. पण या निबंधाची व्याप्ति प्रायः गेल्या दशकांतील अध्यक्षीय भाषणांचा परामर्श घेण्यापुरतीच असल्याने तें काम वेगळ्या निबंधांत करणें अधिक योग्य होअील.

● ● ●

साहित्य संमेलनें आणि साहित्यिक प्रश्न

उद्याच्या उंबरठ्यावर

: १ :

महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या आतापर्यंतच्या (अेकेचाळीस) अध्यक्षीय भाषणांतील प्रमुख साहित्यविषयक प्रश्नांचा आढावा आतांपर्यंत घेतला. या ठिकाणीं साहित्याचें क्षेत्र आज किती विस्तृत झालें आहे; साहित्याकडे पाहण्याचा लेखकांचा व सर्वसामान्य वाचकांचा दृष्टिकोण कसा बदलला आहे; साहित्यविषयक प्रश्नांचें स्वरूपहि कसें आमूलाग्र भिन्न झालें आहे, अि. बाबींची पहाणी करावयाची आहे. ती केल्यानंतर आजपर्यंतचा कालखंड अेकापरीने पूर्वतयारीचा (Formative) कालखंड कसा होता, याची कल्पना स्पष्टपणे येऊं शकेल. त्याचप्रमाणे कांही साहित्यविषयक प्रश्न जरी तेच असले तरी नवे प्रश्नहि बरेच निर्माण झालेले आहेत हेंहि लक्षांत येईल.

साहित्य संमेलनें, अेक दृष्टिक्षेप :—

प्रथम साहित्य संमेलनाच्या कार्यासंबंधी विचार करणें योग्य होईल. महाराष्ट्र (मराठी) साहित्य संमेलनांचीं आजपर्यंत अवघीं ४१ अधिवेशनें झालेलीं आहेत. प्रो. पोतदार यांनी सादर केलेल्या पुराव्यानुसार पहिलें संमेलन १८७८ च्या दरम्यान केव्हा तरी झालें असावें. म्हणजे पहिल्या संमेलनापासून आताच्या ४२ व्या संमेलनापर्यंत जवळजवळ ८२ वर्षांचा काळ लोटला. याचा अर्थ दोन वर्षाला अेक संमेलन असें प्रमाण पडतें. साहित्यविषयक चळवळींना १८८५ पासून प्रारंभ झाला असें दिसतें. लेखकांची संख्या वाढल्याने लेखकहि जवळजवळ येत असावे. जवळ यावें असें त्यांना निदान वाटत असावें. पहिलीं संमेलनें हीं केवळ ग्रंथकारांचींच होतीं. हें लक्षणीय आहे. नंतरच्या कालांत सामाजिक व राजकीय जागृतीला अधिक धार चढत गेली. समाजसंपर्काचें अेक निरागस साधन ह्या दृष्टीने साहित्याकडे ह्या क्षेत्रांतील मातबर लोकांचें लक्ष गेलें. साहजिकपणें हें क्षेत्र आपल्या अंकित असावें अशी पण मनीषा कांहीच्या ठिकाणीं निर्माण झालेली असणें शक्य आहे. राष्ट्रीय सभेप्रमाणे महाराष्ट्र साहित्यसंमेलनसुद्धा इ. स. १९२० पर्यंत प्रवृत्तीने व दृष्टिकोनाने प्रागतिक असणाऱ्या लोकांच्याच हातीं राहिलें. हरिभाअू आपटे अगर चिं. वि. वैद्य सोडले तर तशा तोलाचा अध्यक्षहि संमेलनास लाभला नाही. पण सुशिक्षितांस व विचारवंतांस सामाजिक, राजकीय, मतभेदांपासून अलिप्त असणारें असें अेखादें व्यासपीठ अुपलब्ध असावें असें वाटूं लागलें असावें. म. साहित्य परिषदेची त्यांतूनच आवश्यकता निर्माण झालेली असावी.

१९२० नंतर सम्मेलन हें सामान्यत: राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांच्या हातीं गेलें असें दिसतें. तात्यासाहेब केळकर, लोकनायक मा. श्री. अणे, शिवरामपंत परांजपे, नाटककार खाडीलकर, यांच्यासारखे राष्ट्रीय वृत्तीचे लोक याच कारणाने संम्मेलनाचें अध्यक्षपद मिळवूं शकले. त्याचबरोबर श्रीपाद कृष्णांनासुद्धा हा मान याच सुमारास मिळाला आहे. अेकंदरीने पाहातां असें दिसतें की, हें क्षेत्र उच्च, साहित्यिक विचार-कल्पनांच्या देवाणघेवाणी-करतां मोकळें ठेवावयाचें, राजकीय वा सामाजिक मतभेद या क्षेत्रांत सहसा आणावयाचे नाहीत, असा अेक संकेत या बाबतींत संबंधी व्यक्तींनी पाळला

आहे. तसें नसतें तर श्री. ना. गो. चापेकरांसारख्यांना अध्यक्षपद मिळणें कठीण झालें असतें. साहित्यविषयक विचारांच्या विकासाला ही भूमिका सामान्यतः साह्यकारी झालेली आहे.

संमेलनाच्या स्वरूप व कार्यासंबंधी :—

संमेलनाध्यक्षांपैकी प्रा. न. र. फाटक यांनी आपल्या भाषणांत संमेलनाच्या कार्याविषयी विवेचन केलें आहे. ते म्हणतात— "संमेलनांनी लोकांना मराठी साहित्याच्या अडचणींचें ज्ञान करून दिलें. अशीं संमेलनें परदेशांत भरत असल्याचा दाखला सापडत नाही. फ्रान्समध्ये फ्रेंच अॅकेडमीचें अुदाहरण आहे; पण तें आमच्या संमेलनांना अुपयोगाचें नाही. रशियांत लेखकांचीं संमेलनें भरतात; पण त्यांचा अुद्देश आपल्या संमेलनांहून थोडासा वेगळा आहे. या संमेलनांची कल्पना महाराष्ट्राअितकी जुनी नाही; परंतु हिंदी, बंगाली, गुजराती या भाषांच्या संमेलनांनी आमच्याहून किंचित् जास्त काम केलें असल्याचें कबूल करावें लागतें. परदेशांतून संमेलनें होत नाहीत, याचें कारण अगदी स्पष्ट आहे. जेथे भाषेला सरकार-दरबार, व्यापार, लोकांचा व्यवहार, विद्यापीठें, अशा सर्व कार्यक्षेत्रांतून निर्विघ्न संचार करतां येतो, तेथे भाषेचें संगोपन, संवर्धन, सौष्ठव अित्यादिकांसाठी वेगळीं संमेलनें अुत्पन्न होण्यासाठी गरजच अुत्पन्न होत नाही."

आज आपण स्वतंत्र झाल्यामुळे मराठी भाषेच्या संचारामधलीं सर्व विघ्नें तत्त्वतः नष्ट झालीं आहेत. व्यवहारतः तीं नष्ट होण्यास कालाचाच काय तो अवधि आहे. म्हणजेच नव्या जमान्यांत साहित्यसंमेलनाचें कार्य कोणतें, ह्याबाबत आज नव्याने विचार करणें अवश्य आहे असें वाटतें. व म्हणून या ठिकाणीं हें विवेचन करणें समर्पक होईल.

प्रारंभींचीं संमेलनें :—

राजकीय जागृतीचा परिणाम वा संस्कार साहित्यिक क्षेत्रावरहि कसा होतो तें या संबंधांत पाहण्यासारखें आहे. १९२० पर्यंत संमेलनें म्हणजे निरनिराळ्या परिषदा भरतात तसें भरत असे. कित्येक जण "लिटररी कॉन्फरन्स" असाहि या सम्मेलनांचा अुल्लेख करीत. या काळांतील काँग्रेसच्या

अधिवेशनाचें स्वरूपसुद्धा असेंच होतें. म्हणजे त्या त्या विषयांतले तज्ज्ञ लोक अेकत्र येत असत. चार दिवस संबंधी विषयांची व प्रश्नांची चर्चा-चिकित्सा करीत व नंतर ती कॉन्फरन्स अूर्फ परिषद् समाप्त होअी. साहित्यसंमेलनांना ग्रंथकार संमेलनांचें जें स्वरूप प्रारंभीं होतें त्याचें कारण प्रायः या वस्तुस्थितींत आहे. संमेलन ज्या वेळीं अेखाद्या मोठ्या गांवीं जाअी त्या वेळीं अनेक शास्त्रांतून त्याची विभागणी झालेली असे. त्या त्या शाखांसाठी वेगवेगळ्या अध्यक्षांची नियुक्ति झालेली असे. या शाखांच्या बैठकी चर्चा अेकाच वेळीं निरनिराळ्या खोल्यांतून चालत. तेथे त्यांना ज्या विषयाची विशेष आवड आहे असे लोक जात. (अर्थात् प्रत्येक शाखेच्या विभागांत, या कारणांमुळे लोकांची संख्या अतिशय मर्यादित असे). त्या ठिकाणीं आलेले लोक बरोबर आणलेले निबंध वाचून दाखवीत असत. त्या निबंधांवर चर्चा होत असे. अशा रीतीने हा संमेलनाचा सोहळा अेक विद्वत्परिषद् म्हणून पार पडे. आमंत्रण जर बडोदा, इंदूर, हैदराबादसारख्या मोठ्या वा संस्थानाच्या गांवी असेल तर एकंदर व्यवस्था फारच चांगली ठेविली जाअी. त्यामुळे जाणारे लोकहि समाधानी वृत्तीने घरीं जात. आजहि साहित्य संमेलनाला परत असें (विद्वत्परिषदेसारखें) स्वरूप प्राप्त व्हावें असा कांहीचा मनोदय दिसतो व अेकापरीने तें ठीक आहे. पण या मूळ स्वरूपांत बदल कां झाला व आज संमेलनाला आलेलें स्वरूप कसें प्राप्त झालें हें पाहणेंहि अुद्‌बोधक आहे.

राजकीय जागृतीचा ठसा :—

वर अुल्लेखिल्याप्रमाणे हा बदल प्रायः राजकीय परिस्थितीमुळे पडलेला आहे असें आढळून येअील. राष्ट्रीय सभा ही प्रारंभी थोड्या संबधितांची वा तत्क्षेत्रीय तज्ज्ञांची संघटना होती, तिचें अधिवेशन हेंहि वर अुल्लेखि-लेल्या परिषदांप्रमाणे भरत असे; परंतु कालाबरोबर तिच्या स्वरूपांत बदल घडून आला व तिचें स्वरूप व कार्य आमूलाग्र बदललें. म्हणजे राष्ट्रीय सभा केवळ तज्ज्ञ वा राजकारणी अर्थकारणी व्यक्तींची संघटना न राहातां भारतीयांच्या राष्ट्रीय व राजकीय आकांक्षेचें प्रतीक म्हणून तिने आपला कायापालट घडवून आणला. तरुण लोकांना व सर्वसामान्य व्यक्तीला ह्या संस्थेविषयी अधिकाधिक आपलेपणा कसा वाटेल व या संस्थेच्या द्वारें

आपल्या राजकीय वा राष्ट्रीय मागण्या प्रभावीपणाने सरकारपुढे कशा मांडतां येतील ह्या दिशेने राष्ट्रीय सभेच्या स्वरूपांत आमूलाग्र क्रांति झाली. लोकसंपर्काचें अेक साधन व संधि या दृष्टीने तिच्या अधिवेशनांकडे पाहिलें जाअू लागलें. अर्थातच तिचीं अधिवेशनें हीं तज्ज्ञांचीं संमेलनें न राहतां लोकांच्या आकांक्षांचीं प्रतीकें म्हणून गणलीं जाअूं लागलीं. राजकीय, राष्ट्रीय व सामाजिक जीवनांत त्यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें. विद्वज्जनांच्या भाषणांपेक्षा तिच्यांतील ठरावांचा गाजावाजा होअूं लागला; राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें अेकाद्या महोत्सवाप्रमाणे थाटाने पार पडूं लागलीं. स्वातंत्र्यपूर्व लोकसंपर्काचें व लोकसंग्रहाचें कार्य त्यांच्याकडून चांगल्या रीतीने पार पडलें.

राजकीय जीवनांत हा जो बदल घडून येत होता, राष्ट्रीय सभेला जें नवें स्वरूप येत होतें त्याचा परिणाम साहित्यक्षेत्रीय संघटनांवरहि झाल्यावाचून राहणें अशक्य होतें. साहित्य संमेलन हेंहि केवळ थोड्याशा ग्रंथकारांचें कवीचें. . . न राहतां सर्वसाधारण मराठी माणसाच्या भाषाविषयक व सांस्कृतिक आकांक्षाचें प्रतीक म्हणून गणलें जाअूं लागलें. साहित्य संमेलनाला मराठी जीवनांत स्थान प्राप्त झालें. आणि या दृष्टीने संमेलनांतील अध्यक्षीय वा अितर भाषणांअितकेंच महत्त्व त्यांत संमत होणाऱ्या ठरावांना प्राप्त व्हावें; त्या ठरावांच्या अंमलबजावणीसाठी परिषदेने आपणांस बांधून घ्यावें; संमत झालेल्या ठरावांना अधिकाधिक प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून संमेलनाच्या योगाने जनतासंपर्क वाढावा, अशा प्रकारच्या अपेक्षांचा साहित्यसंमेलनांवर परिणाम होत होता. त्यांचें पूर्वीचें विद्वत्परिषदेचें स्वरूप जाअून लोकभावनांशी लोकाकांक्षांशी समरस होणाऱ्या संघटनेचें स्वरूप त्यास प्राप्त व्हावें या दिशेने प्रगति होत होत आज संमेलनाला हें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालेलें आहे. हें स्वरूप यापुढे स्वराज्यांतहि तसेंच चालू ठेवावें काय, असा अेक महत्त्वाचा प्रश्न आज आपणांपुढे निर्माण झालेला आहे.

या परिवर्तनांतील अपरिहार्यता :—

अर्थात् संमेलनांना हें जें स्वरूप प्राप्त झालेलें होतें तो अेक चुकीच्या दिशेने प्रयत्न होता असें म्हणण्याचें कारण नाही. राष्ट्रीय सभा वा

संमेलनें हीं परकीय राजवटीच्या कालांत ज्या परिस्थितींत वाढलीं ती परिस्थिति विचारांत घेण्यासारखी आहे. राज्यकर्ते हे परकीय असल्याने व त्यांचें राज्य हें प्रायः आर्थिक शोषणावर आधारलेलें असल्याने भारतीय साहित्य, परंपरा, संस्कृति यांच्या अभिवृद्धीबद्दल त्यांना पोटतिडीक असणें हें शक्य नव्हतें. तेव्हा प्रतिकूल परिस्थितींत आपली भाषा, परंपरा व संस्कृति टिकवून धरण्यासाठी साहित्यसंमेलनाला असें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य झालें असेल. अेका दृष्टीने झालें तें ठीक झालें. पण यापुढे मात्र तेंच स्वरूप पुढे चालू ठेवावें काय, ह्या प्रश्नाचा विचार करणें अवश्य झालें आहे.

आज संमेलनांना प्रामुख्याने महोत्सवाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. बहुसंख्य स्थानिक लोक हे संमेलनाकडे केवळ ह्या दृष्टीनेच पाहात असतात. त्यांच्या अपेक्षांची परिपूर्ति करण्यासाठी संमेलनाच्या दिवशीं लोकप्रिय नाटकाचे प्रयोग, अेखाद्या प्रथितयश गायकाचें गायन, वा तत्सम आकर्षक कार्यक्रम अि. गोष्टींची योजना केलेली असते. ह्या गोष्टींकडे लक्ष वेधून संमेलनाबाबतचा लोकांमधील अुत्साह परिवर्धित केलेला असतो. अर्थात् साहित्य-संमेलनच म्हटल्यानंतर अध्यक्षीय भाषण, चर्चा, परिसंवादासारखा अेखादा कार्यक्रम व काव्यगायन अि.ना स्थान देणें अेका दृष्टीने अपरिहार्य ठरतें. त्या दृष्टीनेच हे कार्यक्रम होतातहि; पण त्यापासून करमणुकीपलीकडे फारसें निष्पन्न होत नाही. याबद्दल विशेष खंतहि कोणास वाटते असें दिसत नाही.

आजच्या संमेलन स्वरूपाचें विशेष :—

आजच्या संमेलन पद्धतीचे कांही फायदेहि आहेत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. हे फायदे तितकेच महत्त्वाचे आहेत आणि त्या दृष्टीने दुसरी कांही तरतूद झाल्याविना संमेलनाचें हें स्वरूप बदलणार नाही असें वाटतें. पहिला फायदा म्हणजे जनतासंपर्काचा. साहित्याचें लोण या निमित्ताने सर्वसाधारण व्यक्ती-पर्यंत जाअू शकतें. स्थानिक गुणवंतांनाहि थोडें उत्तेजन मिळतें. आखलेल्या कार्यक्रमांत अेखादा कार्यक्रम तरी चांगला होतोच, व त्यामुळे प्रेक्षकांना अेक अुच्च सांस्कृतिक अनुभव मिळतो. हेंहि कमी महत्त्वाचें अंग आहे असें म्हणतां येणार नाही. तसेंच ह्या निमित्ताने होणारें रंजन हें अुच्च प्रकारचें

असतें व तें सामाजिक अभिरुचीस योग्य वळण लावूं शकतें. अुच्च कलाकृतींच्या रसास्वादानेच अुच्च अभिरुचि निर्माण होण्यास मदत होते.

साहित्याविषयीची आवड सर्वसाधारण समाजांत खोलवर रुजत आहे. साहित्यकृति, साहित्यिक यांच्याविषयी अुत्सुकतेची भावना आज सर्वत्र निर्माण झालेली आहे. अशा श्रेष्ठ साहित्यिकांच्या वक्तव्याचा लाभ व्हावा, त्यांच्याकडून कांही विचार अैकावयास मिळावे, श्रेष्ठ ठरलेल्या कलाकृतींचा आस्वाद घेण्याची संधि प्राप्त व्हावी अशी अेक सुप्त अिच्छा सुशिक्षितांच्या मनांत निर्माण झालेली आहे. या विविध प्रकारच्या अपेक्षांची परिपूर्ति साहित्य संमेलनाच्या आजच्या स्वरूपामुळे होअू शकते, हें अमान्य करण्यांत अर्थ नाही. आणि हेंहि कार्य कमी महत्त्वाचें आहे असेंहि मानण्याचें कारण नाही. साहित्य संमेलनाचें स्वरूप बदलावयाचें असेल तर या अपेक्षांची परिपूर्ति होण्याची कांही तरी तरतूद व्हावयास हवी. तशी तरतूद अन्य प्रकारांनी किंवा अन्य अुपक्रमांनी होअू लागली तर मात्र साहित्य संमेलनाने त्यांचा पाठपुरावा करण्याचें कांहीहि कारण नाही.

आज रूढ असलेल्या संमेलनपद्धतीचें आणखी अेक महत्त्वाचें अंग म्हणजे त्यांत संमत होत असलेले ठराव. साहित्यविषयक प्रगतीच्या दृष्टीने विशिष्ट ठराव संमत करून समाजाचें व राजसत्तेचें लक्ष त्या प्रश्नाकडे वेधणें यांत आक्षेपार्ह असें कांहीहि नाही. विशेषत: परकीय राजसत्तेच्या काळांत आपल्या सांस्कृतिक गरजा भागवून घेण्याचा हाच अेक मार्ग अुपलब्ध होता. त्या मार्गाचा अवलंब आजच त्याज्य ठरविणें आवश्यक आहे असें नाही. साहित्य संमेलनाने आग्रह धरलेल्या व आज निर्णय लागलेल्या दोन महत्त्वाच्या मागण्या म्हणजे प्रादेशिक विद्यापीठांची व स्वतंत्र मराठी-राज्याची. अशा प्रकारचे प्रश्न यापुढेहि निर्माण होत राहणार व त्या दृष्टीने साहित्य संमेलनास विशिष्ट कार्य निश्चितपणेंच राहणार आहे. ही परिस्थिति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत ठरावांचें महत्त्व कायम राहणार.

संमेलनांच्या वेळीं ज्या चर्चा व जे परिसंवाद होत असतात ते स्थानिक लोकांना आवडत असतात; त्यांच्यावर तसे कोणी लादलेले नसतात. अर्थात् या परिसंवादांची वा चर्चांची पातळी अुच्च राहणें हें निरनिराळ्या गोष्टींवर अवलंबून आहे. निवडलेला विषय, वक्त्याची

अभिरुचि व तयारी, लोकांची प्रवृत्ति, अि. सर्वच बाबी आपापल्या परीनें जबाबदार आहेत.

दुसरी बाजू :—

आज ज्या प्रकारें संमेलनें साजरीं होतात त्यांच्या बाजूनें जे मुद्दे विचारांत घेणें आवश्यक आहे त्यासंबंधी अेवढें विवेचन केलें. आतां तितकीच महत्त्वाची असणारी दुसरी बाजू पण पाहणें आवश्यक आहे.

आजच्या संमेलनांमुळे लोकांची करमणूक होत असेल. ज्वलंत प्रश्नांना चालना देण्याच्या दृष्टीनें मोठमोठे ठराव संमत होत असतीलहि, साहित्य प्रगतीस आवश्यक असणाऱ्या बाह्य गोष्टी ठरावरूपानें लोकांच्या वा राजसत्तेच्या पुढे मांडल्या जात असतीलहि, मर्यादित प्रमाणांत जनता-संपर्कहि साधला जात असेल; पण साहित्याचें अंतरंग समृद्ध होण्याच्या दृष्टीनें ज्या प्रकारचें विचार-विवरण व्हावयास हवें, विचार-मंथन व्हावयास हवें, तें होत नाही व जोपर्यंत संमेलनाचें स्वरूप आहे असें राहणार आहे तोपर्यंत फारसा बदल घडून येणार नाही. त्यासाठी संमेलनाचें हें उत्सवी स्वरूप जाअून विचार-विमर्शकांच्या मेळाव्याचें स्वरूपच त्याला प्राप्त झालें पाहिजे. परकीय सरकार होतें तोपर्यंत साहित्य संमेलनाचा लोकसंपर्क साधण्यासाठी अुपयोग करून घेणें ठीक होतें. पण आज परिस्थिति बदलली आहे व ह्या परिस्थितींत संमेलनाचें स्वरूप पालटणें हें अपरिहार्य आहे. दुसरें असें की, परकीय राजवटींत साहित्याला अुपेक्षेच्या संकटास तोंड द्यावयाचें असल्यानें लोकांच्या ठिकाणची साहित्यविषयक उपेक्षावृत्ति नष्ट होअून उच्च अभिरुचि प्रसृत होण्यास संमेलनाचा अुपयोग झालाहि. आज आपणच राज्यकर्ते आहोंत; आपली भाषा ही अुच्च स्थानापन्न झालेली आहे, त्या भाषेचा अुत्कर्ष साधणें हें केवळ आपलेंच काम नसून राज्य-कर्तेहि त्यासाठी बद्धपरिकर झालेले आहेत, ते साहित्याचा लोकसंपर्क कसा वाढेल, अुच्च अभिरुचीचा प्रसार कसा होअील ह्यासाठी निरनिराळे मार्ग अवलंबित आहेत. त्यांचा परिणामहि लोकमनावर हळूहळू व्हावयास लागेल. अशा परिस्थितीत साहित्य संमेलनांतहि त्याच गोष्टींचा पाठपुरावा करण्याचें कारण नाही. संमेलनांतील ठरावांच्या मागील भूमिका आज बदललेली आहे. अेखादा दुसरा ठराव संमत झाला तरी चालेल. साहित्य

संमेलनांत ठरावांनाच अनन्य साधारण स्थान देण्यासारखी परिस्थिति ह्या पुढल्या काळांत निर्माण होईल वा टिकून राहील असें वाटत नाही. म्हणजेच आजचें संमेलनाचें स्वरूप हें फार थोड्या वेळांत कालपक्व वा जीर्ण होणार आहे. याचाच अर्थ कोणत्या दिशेने बदल घडवून आणावे याचा विचार आज झाला पाहिजे.

पूर्वकालांतील पुढारीपण :—

स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सांस्कृतिक जीवनाच्या क्षेत्रांत जे बदल घडून येत आहेत ते लक्षांत घेतले तरीसुद्धा साहित्य संमेलनाच्या कार्याबाबत (साहित्य परिषदांच्या कार्याबाबतहि) नवी भूमिका घेणें कसें आवश्यक झालेलें आहे तें ध्यानांत येईल. स्वातंत्र्य पूर्वकालांत साहित्य संमेलनांकडे व पर्यायानें साहित्य परिषदांकडे प्रदेशांतील सांस्कृतिक चळवळीचें नेतृत्व आलेलें होतें. अशा परिस्थितींत संमेलनाच्या भूमिकेंत अधिक समावेशकता असणें अपरिहार्य झालें होतें. महाराष्ट्रासाठी वेगळें विद्यापीठ हवें, असा आग्रह साहित्य संमेलनानेच धरला. विद्यापीठांत मराठीला महत्त्वाचें स्थान असावें; मराठी माध्यम असावें, हा आग्रह साहित्य संमेलन-परिषदांनीच धरला आहे. वास्तविक काटेकोरपणें पाहतां हे शिक्षणविषयक प्रश्न आहेत. नाटयाच्या क्षेत्रांत, ग्रंथालयांच्या क्षेत्रांत कांही सुधारणा हव्या असल्या तर त्याची सुरुवात साहित्य संमेलनाच्या द्वारें होई. अितिहास-संशोधनाचा व साहित्याचा निकटवर्ति संबंध तर प्रसिद्ध आहे. त्याशिवाय सांस्कृतिक क्षेत्रांत कोणतीहि महत्त्वाची सुधारणा घडवून आणावयाची असेल तर त्या बाबतींतलें पुढारीपणहि साहित्य संमेलना (परिषदे)कडेच येत असे. (संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीकडे अंगुलि-निर्देश या संबंधांत करतां येईल.) थोडक्यांत सांगायचें म्हणजे मराठी भाषेच्या, संस्कृतीच्या संवर्धनाच्या अभिवृद्धीच्या, प्रसाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे सारेच प्रश्न साऱ्याच गोष्टी ह्यांची साहित्य संमेलनाला दखल घ्यावी लागत असे. त्याचा परिणाम कधी कधी साहित्याला दुय्यम स्थान प्राप्त होण्यांतहि झालेला आढळून येई. [गेल्या कांही

संमेलनांत साहित्यापेक्षा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नालाच अतिरिक्त महत्त्व प्राप्त झालें होतें; अेका दृष्टीनें तें अपरिहार्य होतें असें मानलें तरी वस्तुस्थितींत फरक पडत नाही.]

नव्या बदलाची प्रसादचिन्हें :—

स्वातंत्र्योत्तरकालांत अेकंदर परिस्थितींत फार मोठे बदल घडून येत आहेत. राज्यसत्ता आपल्या (भारतीयांच्या) हातीं आल्याने सर्वांगीण अुपेक्षेचें भय आज राहिलेलें नाही. राज्यसत्तेच्या विरोधास वा रोषास तोंड देअून सांस्कृतिक क्षेत्राचें रक्षण करण्याची जबाबदारी साहित्य संमेलनावर राहिलेली नाही. सरकारने निरनिराळे अुपक्रम सुरू केले आहेत. नाटच, संगीत, साहित्य, शिक्षण, कला, क्रीडा, लोकवाङ्मय, लोककला, मुद्रण, चित्रकला, चित्रपट अि. विविध क्षेत्रांत राष्ट्राची प्रगति व्हावी, म्हणून नव्या नव्या संस्था, संघटना, त्या क्षेत्रांसाठी निर्माण झालेल्या आहेत. विविध प्रकारच्या स्पर्धा प्रत्येक क्षेत्रांत घेतल्या जात आहेत. विद्यापीठें पण देशी भाषांत निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ कसे उपलब्ध होअू शकतील या बाबत निरनिराळ्या योजना आखीत आहेत. सरकारच्या सल्ल्याने व अुत्तेजनानेच हे सर्व अुपक्रम चालू आहेत. प्रादेशिक भाषांना महत्त्वाचें स्थान देण्यास विद्यापीठांचाहि विरोध नाहीं. स्वातंत्र्य-पूर्व कालांत यांपैकी पुष्कळशा गोष्टी साहित्य परिषदेच्या व संमेलनाच्या कक्षेंत पडत असत. म्हणजे लोकांचा व अुत्कृष्ट साहित्याचा कलेचा संपर्क साधण्याची जबाबदारी केवळ साहित्य संमेलनांवर वा साहित्यक्षेत्रीय संघटनावर बिलकुल राहिलेली नाही. हें काम करण्यास निरनिराळ्या संस्था, संघटना, पुढे येत आहेत. आजचीं ग्रंथालयें व माध्यमिक व इतर विद्यालयें हीं खरीं सांस्कृतिक केंद्रें म्हणून पुढें येत आहेत. सांस्कृतिक हालचाली व चळवळी अि. चें नियंत्रण व संचलन करण्यासाठी सरकारने स्वतंत्र खातेंच काढलें आहे. साहजिकपणें साहित्य संमेलनाचें असें वैशिष्टच या बाबतींत कांही राहिलेलें आहे असें मानण्याचें कारण नाही. ही सर्व परिस्थिति संमेलनाचें आजचें स्वरूप बदलावें, या गोष्टीला अनुकूल अशीच आहे.

साहित्यक्षेत्रीय घडामोडी :—

साहित्याच्या क्षेत्रांतहि ज्या नवनवीन घटना घडत आहेत वा घडूं घातल्या आहेत, त्यांच्याकडे लक्ष दिलें तरीसुद्धा असें आढळून येईल की, थोड्याच दिवसांत हें संमेलनाचें स्वरूप व कार्य बदलेल. महाराष्ट्र साहित्य परिषद या मध्यवर्ति संघटनेतर्फे साहित्य संमेलनें भरलीं जातात. व तीं सर्व मराठी भाषिकांचीं प्रातिनिधिक संमेलनें म्हणून गणलीं जातात. तथापि ह्याच प्रकारचें कार्य करणाऱ्या विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद्, मुंबअी मराठी साहित्य संघ या संस्थासुद्धा आपापल्या प्रदेशापुरतें हेंच कार्य करीत आहेत. या विविध संस्थांना समाविष्ट करणारी "मराठी साहित्य महामंडल" अशी अेक नवी संस्था अस्तित्वांत यावी असा अेक प्रयत्न चालू आहे. १९५९ च्या मिरजेच्या संमेलनांत तसा अेक ठरावहि संमत झालेला आहे. लवकरच ही नवी संघराज्याच्या स्वरूपाची संघटना अस्तित्वांत आलेलीहि दिसेल. ती संघटना अस्तित्वांत आल्यानंतर हीं साहित्य संमेलनें हीं त्या मध्यवर्ति संस्थेतर्फे भरणार आहेत. त्या संघटनेचें प्रतिनिधित्व व्यक्तींना मोकळें राहणार नसून उपरिनिर्दिष्ट साहित्यक्षेत्रीय संघटनांनाच राहाणार आहे. याचाच अर्थ असा की, संमेलनाचें हें आजचें सर्व समावेशक स्वरूप आपोआप बदलणार आहे व त्याला तत्क्षेत्रीय तज्ज्ञांच्या वा विद्वानांच्या मेळाव्याचें स्वरूप येणें अपरिहार्य दिसतें. हें प्रत्यक्ष केव्हा घडून येणार आहे, हें आज जरी निश्चित सांगतां आले नाही तरी तें नजीकच्या भविष्यांत अल्पकाळांत घडणार आहे ह्याबद्दल आशंका घेण्याचें कारण नाही.

ह्या संदर्भांत आणखी गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. या भावी मध्यवर्ति संघटनेला वा प्रादेशिक घटकांना जें अनुदान सरकारतर्फे मिळणार आहे तें प्राय: साहित्याच्या अभिवृद्धीला पोषक अशा अुपक्रमासाठीच. हे अुपक्रम म्हणजे साहित्याचें समालोचन, साहित्येतिहास वा तत्सम वा मौलिक ग्रंथांचें प्रकाशन वा लेखन आणि प्रामुख्याने नवें संशोधन हे होत. या गोष्टी लोकजीवनाशी वा समाजजीवनाशी प्रत्यक्षपणें संबंधित नाहीत. म्हणजे होअूं घातलेल्या फरकांमुळेच साहित्य संमेलनाचें आजचें स्वरूप बदलणें व साहित्य परिषदेला साहित्यिकांच्या वा विद्वानांच्या परिषदेचें स्वरूप येणें हें अटळ आहे असें दिसतें.

मग साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, मग आजच्यासारखीं संमेलनें अजिबात भरणारच नाहीत काय? अर्थात् या बाबतींत अेक गोष्ट स्पष्ट करणें आवश्यक आहे की, हें सर्व लोकांच्या अिच्छेवर व परिस्थितीवर अवलंबून राहणार आहे. आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा अितिहास पाहतां महाराष्ट्रांतल्या लोकांची अिच्छा किती प्रबळ आहे याचा प्रत्यय येतो. अेका दृष्टीने पाहतां नव्या परिस्थितींत महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांविषयी आत्मीयतेची जाणीव निर्माण होण्यासाठी वा आहे ती वाढीला लागण्यासाठी आणखी काळ हीं संमेलनें थोड्याफार प्रमाणांत आवश्यक असतोलहि.कारण महाराष्ट्राचें स्वतंत्र राज्य स्थापन झालें तरी भावनात्मक अेकात्मकता अद्यापि निर्माण व्हावयाची आहे. तें काम कांही प्रमाणांत साहित्य संमेलनांच्याद्वारें पार पडूं शकेल.

प्रादेशिक संमेलनें :—

आपापल्या प्रदेशांत विभागीय साहित्य संमेलनें भरण्याची प्रथा जवळ जवळ रूढ झालेली दिसते. विदर्भ, मराठवाडा, मुंबअी या विभागांत तशीं विभागीय संमेलनें होतात व तीं गाजतातहि. त्यांचें स्वरूप अद्यापपावेतों स्वातंत्र्यपूर्वकालीन परंपरेशीच जुळतें आहे. या विभाग-संमेलनांना सुद्धा अितर विभागांचे प्रतिनिधि बोलावण्याची प्रथा पाडतां येअील. त्यायोगेंहि भावनात्मक अैक्य साधण्यास थोडीफार मदत होअूं शकेल. या प्रादेशिक संमेलनांत अुत्सव, चर्चा, ठराव यांना प्राधान्य राहाणार असें दिसतें.

विदर्भ, मराठवाडा, मुंबअी या विभागांव्यतिरिक्त (अुरलेल्या) भागांत, सोलापूर शाखेचा अपवाद सोडला तर अशी संमेलनें घेण्याचा नांव घेण्यासारखा अुपक्रम कोणी केलेला नाहीं. या भागांत जिल्हावार–निदान दोनतीन जिल्ह्यांची अेक, अशा शाखा स्थापन व्हावयास हव्यात. त्या शाखांतर्फे त्या त्या विभागांतहि असे संमेलनाचे अुपक्रम होअून साहित्याचें, संस्कृतीचें, व सदभिरुचीचें लोण सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत जावयास हवें. म्हणजे सर्व बाबतींत अेक प्रकारची सूत्रबद्धता येअील व सांस्कृतिक क्षेत्रास–आणि त्या-योगें सांस्कृतिक जीवनास–अेक प्रकारचा घाट येअील.

पुण्याईचा वारसा :—

असें झालें तरी साहित्यपरिषदेचें वा संमेलनाचें स्वरूप हें केवळ विद्वत्परिषद असें होतां कामा नये. तें परिषदेच्या वा परंपरेच्या अितिहासाशी सुसंगत होणार नाही. साहित्य हें सांस्कृतिक जीवनाचें स्वतंत्र व स्वायत्त असें क्षेत्र मानलें तर या क्षेत्राची स्वायत्तता वा स्वतंत्रता टिकविण्याचा प्रयत्न थोड्याशा साक्षेपानेच व्हावयास हवा आणि हें काम सा. संमेलन वा परिषद करू शकेल. सरकार-दरबारीं या नव्या स्वरूपांतल्या साहित्य परिषदेचें वजन हें निश्चितपणेच वाढणार. पण साहित्य परिषद् म्हणजे सरकारी कृपेची याचना करणाऱ्या साहित्यिकांची संघटना असें स्वरूप साहित्य परिषदेला येतां कामा नये. लोकजीवनाशी तिचा असलेला संबंध हा अतूट राहिला पाहिजे. साहित्याचें व साहित्यिकांचें स्वातंत्र्य रक्षिण्यासाठी साहित्य परिषदेने दक्ष असलें पाहिजे. साहित्य परिषदेची प्रतिष्ठा या दक्षतेवर आधारलेली असली पाहिजे. विशेषत: या पुढच्या कालांत ह्या प्रकारच्या कार्याची आवश्यकता फार आहे. या दृष्टीने विद्वत्परिषद् व अुत्सवी संमेलन यांचा समन्वय कसा घालतां येअील, या दिशेने विचार झाला पाहिजे. साहित्य व साहित्यिक प्रश्नांचा अुहापोह चर्चा, ह्या गोष्टी मनमोकळेपणाने ह्या संमेलनांत झाल्या पाहिजेत. महाराष्ट्र-राज्य पूर्वकालांत साहित्य परिषदेने वा संमेलनाने निर्माण केलेली ही पुण्याअी आहे. तिची जपणूक होणें आवश्यक आहे.

मराठी साहित्य संमेलन व महाराष्ट्र साहित्य परिषद् या संस्थांचें कार्य यापुढे कसें बदलणार आहे व कांही प्रमाणांत कसें चालू राहणार आहे ह्या बाबतचें हें विवेचन केलें. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर सर्व क्षेत्रांची पाहणी करणें आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे विचार साहित्याच्या वाढीसाठी उपयुक्त ठरावेत अशी अपेक्षा आहे.

: २ :

राज्यसंस्था व साहित्य यांचा संबंध :—

बदललेल्या परिस्थितीमुळे साहित्याच्या दृष्टीने निर्माण झालेला प्रश्न म्हणजे साहित्य व राज्यसंस्था यांचे संबंध या पुढच्या काळांत कसे राहणार

आहेत, राज्यसंस्थेचें साहित्यावर–साहित्यविषयक विचारांवर व साहित्यिकांवर–किती दडपण येणार आहे हा होय. अर्थात् हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा पण तितकाच गुंतागुंतीचा आहे. येत्या कांही वर्षांत ह्या प्रश्नाला अतिरिक्त महत्त्व प्राप्त होणार आहे. साहित्यिकांना व सरकारलाहि कांही निश्चित तत्त्वें मनाशी बाळगावीं लागतील, स्वतःच्या कर्तव्याविषयी व जबाबदारीविषयी जागृत रहावें लागेल. हक्कांचें परिपालन डोळ्यांत तेल घालून करावें लागेल. साहित्यक्षेत्रांत स्वातंत्र्याचा हिरीरीने पुरस्कार व संरक्षण करावें लागेल. या सर्व कार्यांत साहित्य परिषद् व साहित्य संमेलनें यांना फार मोठें कार्य करतां येईल. त्या दृष्टीने जागरुकता ठेवणें आवश्यक आहे. हें काम करण्यासाठी व सांस्कृतिक जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी, वा आहे ती प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी साहित्य परिषद् व संमेलनें यांनी बद्धपरिकर व्हावयास हवें व म्हणूनच या ठिकाणीं या प्रश्नाची अैतिहासिक व व्यापक भूमिकेवरून चिकित्सा करण्याचें योजिलें आहे.

मध्यवर्ति परिषद्–साहित्य अकादमी :—

भारत सरकारने साहित्यक्षेत्रास प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी अि. स. १९५४ मध्ये साहित्य अकादमी ही महासंस्था स्थापन केली आहे. साहित्य विषयक प्रश्नांची सोडवणूक या संस्थेद्वारा यापुढे होणार आहे. ग्रंथकारांचा, त्यांच्या कलाकृतींचा गौरव करणें, साहित्यविषयक अभिरुचि व लालसा निर्माण होण्यासाठी भारतीय भाषांतील श्रेष्ठ साहित्य छापून प्रसिद्ध करणें, अेका भाषेंतील श्रेष्ठ ग्रंथाचा परिचय सर्व भारतीयांस व्हावा, व त्यायोगें भारतीय अेकत्वाची जाणीव वाढीस लागावी म्हणून चांगले चांगले ग्रंथ निवडून त्यांचा सर्व भारतीय भाषांत अनुवाद करणें, साहित्यिकांची अेक सूचि (Directory) तयार करणें, अि. कामें या साहित्यमहामंडळाकडे सोपविण्यांत आलीं आहेत. त्याच्या कार्यास सुरवातहि झालेली आहे. अशा प्रकारची अेक सर्वश्रेष्ठ मध्यवर्ती साहित्यसंस्था असावी असा विचार वेळोवेळी साहित्यिकांनी व्यक्त केलेला आहे. अध्यक्षीय भाषणांत त्याचे पडसाद अुमटले आहेत. ह्या मागणीकडे स्वातंत्र्यपूर्वकालांत सरकारचें विशेषसें लक्ष गेलें नाही. पण स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर सरकारला ह्या मागणीचा अव्हेर

करणें अशक्य आहे. सरकारलाहि साहित्यविषयक आस्था असल्यानेंहि साहित्यअकादमीसारखी संस्था अस्तित्वांत आलेली आहे. तिचें कार्य सुस्पष्ट होत आहे. त्याबरोबर कांही आशंकाहि मनांत अुभ्या रहात आहेत. त्यांचा परिस्फोट करणें आवश्यक झालें आहे.

संमेलनाला हें सुचलें होतें :—

वास्तविक पाहतां साहित्यअकादमीसारखी मध्यवर्ति संस्था आवश्यक आहे हा विचार जवळ जवळ साहित्य संमेलनाअितका जुना आहे. १९०९ मध्ये बडोदें येथे झालेल्या अधिवेशनाच्या वेळीं जे अनेक निबंध वाचले गेले त्यांत मंगेश कमळाजी नाडकर्णी यांनी 'भारतीय साहित्य-परिषद् स्थापण्याची आवश्यकता' असा निबंध वाचला होता. व भारतासारख्या बहुभाषी देशांतील भाषांची प्रतिनिधिक अशी अेक परिषद् असावी असा विचार त्यांत व्यक्त केला आहे. ते म्हणतात—'जशा प्रांतोप्रांतीं महाराष्ट्र साहित्य परिषद, गुजराथ साहित्य परिषद्, वंगीय साहित्य परिषद् वगैरे संस्था आहेत तशीच ह्या परिषदांच्या प्रतिनिधींची महापरिषद स्थापन करून तीस 'भारतीय साहित्य परिषद्' हें नांव द्यावें. म्हणजे ती दरसाल महासंमेलनें भरवील व वरील सर्वसाधारण प्रश्नांचा विचार करील."*

यावरून मध्यवर्ति साहित्यसंस्थेची आवश्यकता ही किती जुनी आहे ह्याची कल्पना येअू शकेल. त्यानंतर अितर अनेक अध्यक्षांनी मध्यवर्ति परिषद् अूर्फ 'अकॅडमी'सारखी अुच्च संस्था या देशांत असावी असे विचार प्रकट केले आहेत. १९३२ च्या कोल्हापूरच्या संमेलनांत श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीहि आपल्या अध्यक्षीय भाषणांत ह्या गोष्टीवर भर दिला आहे.

तत्पूर्वी (१९१७ मध्ये) इंदूरच्या ग. ज. आगाशे यांच्या अध्यक्षीय भाषणांतहि हा विचार मांडला गेला आहे. अशा प्रकारें मध्यवर्ति साहित्य परिषदेची आवश्यकता वेळोवेळीं विचारवंतांना भासत आलेली आहे. पण याबाबत प्रत्यक्षांत साहित्य अकादमी स्थापन होण्यास स्वातंत्र्यकाल अुगवावा

*' बडोदें येथील साहित्यसंमेलनाकरितां लिहिलेले दहा निबंध ' भारतीय-साहित्य परिषद स्थापण्याची आवश्यकता. '

लागला. आजची साहित्य अकादमी ही प्रायः सरकारी प्रेरणेने व पुढारी-पणाने स्थापन झालेली आहे. साहित्यिकांच्या परिषदा, परिसंवाद घेणें कविसंमेलनें भरविणें व अुत्कृष्ट साहित्य-कृतींना पारितोषिकें देअून त्यांचा गौरव करणें अि. कार्याबरोबरच प्रत्येक भाषेंतील कांही अुत्कृष्ट ग्रंथांची निवड करून त्यांचा अनुवाद सर्व भारतीय भाषांत अुपलब्ध करून देण्याचा अुपक्रम अि. वर अुल्लेखिलेलीं कामें साहित्य अकादमीतर्फे होत आहेत. भारतीय लेखकांची अेक सूचिपण बाहेर आलेली आहे व अितरहि अुपक्रम चालू आहेत.

कांही आशंका :—

ह्या सर्व गोष्टी साहित्याभिवृद्धीस पोषक आहेत हें निश्चित. तथापि हा प्रयत्न प्रामुख्याने वर अुल्लेखिल्याप्रमाणे सरकार-नियंत्रित व सरकार-पुरस्कृत आहे. सरकारी प्रेरणा ह्या सर्व अुपक्रमांमागे अुभी आहे. त्यायोगें ही व अशा अितर अकादमी ह्या प्रायः सरकारी संस्था झालेल्या आहेत. कित्येक लोकांकडून सहाजिकपणेंच असा प्रश्न विचारला जातो की, ह्या संस्थांद्वारें अुपयुक्त कार्य होत असलें तरी लेखकांच्या स्वातंत्र्याचें काय ? सरकारी प्रेरणेने नि नेतृत्वानें व्यक्तिस्वातंत्र्याचा फार संकोच होअील. व साम्यवादी देशाप्रमाणे लेखकांना राज्यकर्त्यांच्या तोंडाकडे पाहून लिहावें असें वाटू लागेल. असें झालें तर अेक प्रकारचें वैचारिक दास्य निर्माण होअील. साहित्य-क्षेत्रावर आलेलें तें महाभयंकर संकट ठरेल.

साहित्याचा अुद्भवच मुळी स्वातंत्र्याच्या पुरस्कारार्थ आहे. जेथे व्यक्तिस्वातंत्र्य अनिर्बंधित आहे तेथेच चांगलें साहित्य फोफावतें, वाढतें. तेव्हा ह्या संस्था साहित्याची अभिवृद्धि करतील; पण व्यापक अर्थाने विचारक्षेत्रावर हें अेक प्रकारचें गंडांतरच आलें असें म्हणतां येअील. तेव्हा त्याचें काय ? असे विचार कांही जणांच्या मनांत उद्भवणें स्वाभाविक आहे.

सरकारी उत्तेजनाची आवश्यकता नि अपरिहार्यता :—

या आक्षेपाचा परामर्श घेण्यापूर्वी कांही मूलभूत महत्त्वाच्या गोष्टी विचारांत घेणें आवश्यक आहे. अर्धविकसित व अविकसित राष्ट्राचा विकास करण्यास सरकारलाच पुढारीपण घ्यावें लागतें. व ही वस्तुस्थिति आर्थिक व राजकीय क्षेत्रापुरतीच असते, असें मानावयाचें कारण नाही. भारतासारख्या अर्धविकसित देशांतील लोकांचें जीवनमान हें बरेंच खालाव-

लेलें आहे. साहित्यिकांच्या गुणांची चीज करण्याची आर्थिक कुवत आज जनतेजवळ नाही. पुस्तकाच्या अेकंदरीने प्रती फार थोड्या खपतात. सहाजिकपणें साहित्यजीवी लेखक अत्यंत कमी असतात व त्यांची प्राप्ति पण अतिशय मर्यादित असते. या कारणाने साहित्यक्षेत्र हें खुरटल्यासारखें होतें. साहित्यिकांच्या कृतीचें कौतुक होत नसल्याने त्यांना अुत्तेजन मिळत नाही व अशा परिस्थितींत त्यांना नवीन साहित्य-निर्मितीविषयी मुळीच अुत्साह वाटणार नाही व अेकंदरीने साहित्यक्षेत्र हें दुर्लक्षितच राहणार. अशा परिस्थितींत साहित्यक्षेत्रांत सुधारणा घडवून आणणें लेखकांच्या कृतींना पारितोषिकें अि. देअून मान्यता देणे, अि. अुपक्रमांमुळे अेक प्रकारचें अुत्साहाचें व आशादायक वातावरण निर्माण होतें. अशा वातावरणांतच चांगलें वा अुत्कृष्ट साहित्य निर्माण होणें शक्य आहे. अर्धविकसित राष्ट्रांत सर्वच बाबतींत राज्यसंस्थेला पुढाकार घ्यावा लागतो. राज्यसंस्था अशा देशांत केवळ दंडसंस्था राहत नाहीं. सांस्कृतिक जीवनाचें पुढारीपण राज्यसंस्थेस घ्यावें लागतें. असें होणें अेका परीने अपरिहार्य आहे. त्यायोगें कांही अनिष्ट गोष्टी निर्माण होणें शक्य आहे. पण परिस्थिति अितकी बिनतोड आहे की, सरकारी पुढारीपणाशिवाय दुसरा कोणताहि मार्ग अविकसित राष्ट्रांसमोर नसतो.

पाश्चात्यांचा दाखला अपुरा :—

पाश्चात्य देशांत व्यक्तिस्वातंत्र्याचें जें संवर्धन झालें आहे त्यास अैतिहासिक कारणें आहेत. पाश्चात्य राष्ट्रांची प्रगति अेक प्रकारच्या स्वाभाविक वातावरणांत झालेली आहे. अुलट अविकसित राष्ट्रांवर अितिहासाने लवकर प्रगति करून घेण्याची सक्ति केली आहे. त्यायोगें परिस्थिति थोडी बिनतोड झालेली आहे. अिंग्लंड आदि युरोपीय राष्ट्रांना अव्याहत प्रगति करून घेण्यास तीन चारशे वर्षांचा अवधि मिळाला. अमेरिकेला पूर्णतया निर्वेध अशीं दीडशें वर्षें मिळालीं. अुलट भारत आदि नवजात राष्ट्रांना अत्यंत अल्प काळांत आपला विकास साधावयाचा आहे. व त्यायोगें या राष्ट्रांपुढे त्वरेने प्रगति व मानवी मूल्याचें वा व्यक्तिस्वातंत्र्याचें संवर्धन यांचा समन्वय कसा घालावयाचा हा अतिगंभीर प्रश्न निर्माण झालेला

आहे. ही वस्तुस्थिति हा ऐतिहासिक घडामोडींचा परिपाक आहे हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

भारतांत साहित्यावर राज्यसत्तेचें नियंत्रण येणें शक्य आहे अशी भीति वाटण्याचें आणखी अेक कारण म्हणजे प्रचलित राज्यसत्तेनें भारतीय जनतेपुढे समाजवादी समाजरचनेचें ध्येय ठेविलें हें आहे. जे विचारवंत या ध्येयाशी समरस होणार नसतील किंवा ज्या व्यक्तींचा या ध्येयास पूर्णपणें विरोध आहे अशा व्यक्तींची अेक प्रकारची कुचंबणाच होत राहाणार नाही काय ? आणि त्या प्रमाणांत वैचारिक आक्रमणाची भीति राहाणारच.

अनुभवाची साक्ष :—

केवळ तात्त्विक वा तार्किक भूमिकेवरूनच या आक्षेपाचा विचार केला तर तो योग्य आहे असें वाटतें; पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति व अनुभव विचारांत घेतला तर ह्या आक्षेपांत फारसे तथ्य नाही, असे प्रत्ययास येअील. समाजवादी समाजरचनेचें ध्येय हें समाजापुढे फक्त ठेविलें आहे. तें गाठण्याचा मार्ग हा स्वतः भारतीयांनीच शोधून काढावयाचा आहे. या बाबतींतहि आतां हें जवळ जवळ स्पष्ट झालें आहे की, समाजवादी समाजरचनेचें ध्येय गाठण्याचा आपला मार्ग हा जगांतील अितर समाजवादी (म्हणवून घेणाऱ्या) देशांपासून पूर्णपणें वेगळा राहणार असून व्यक्तिस्वातंत्र्य व सहिष्णुता ह्या मूलभूत मूल्यांचें प्रतिष्ठापन नि प्रतिपालन करूनच हें ध्येय गाठण्याचा प्रयत्न राज्यसंस्थेतर्फे होणार आहे. आतापर्यंत जें अुत्तेजन मिळालें आहे, ज्या ग्रंथकारांचा मध्यवर्ति सरकारतर्फे गौरव झालेला आहे ते ग्रंथकार सरकारी धोरणाची री ओढणारेच आहेत असें नाही. सरकार ह्या बाबतींतले निर्णय हे श्रेष्ठतर साहित्यिकांच्या सल्ल्यावरूनच घेतें असें दिसतें. कांही अुदाहरणें अशीं आहेत कीं, सरकारी धोरणावर टीका करणाऱ्या लेखकांनाहि साहित्य अकादमीचीं पारितोषिकें मिळालीं आहेत. या बाबतींत सरकारी धोरण आजतरी अतिशय समंजस आहे. जर कांही दोष वा अुणीवा असतील तर त्या साहित्यिकांच्या सल्ल्यांतच असतील. प्रचलित शासनाला तरी त्याबद्दल विशेष दोष देता येईल असें वाटत नाही. प्रचलित सरकारला साहित्यविषयक असें कांही विशिष्ट धोरण नाही. या कारणाने सरकारी आक्रमणाची भीति बाळगण्याचें कारण नाही.

थोडेसें वेगळें मत :—

प्रस्तुत लेखकाचें तर असें मत आहे की समाजवादी समाजरचनेचें ध्येय हें केवळ आर्थिक आणि राजकीय वा सामाजिक क्षेत्रापुरतेंच आहे. वैचारिक क्षेत्रांत प्रचलित सरकारचें धोरण जितकें साक्षेपी असावयास हवें तितकें तें नाही व हीच या देशांतील समाजवादी समाजरचनेच्या प्रयत्नामधील फार मोठी अुणीव आहे. वैचारिक व सांस्कृतिक क्षेत्रांत जी अेक प्रकारची बजबजपुरी दिसून येते ती या अुणीवेचें अपत्य आहे. वैचारिक क्षेत्रांतील असाधारण तटस्थता ही या बाबतींत समर्थनीय आहे असें वाटत नाही. त्यामुळे प्रत्यक्षांत असें चमत्कारिक दृश्य दिसतें की, समाजवादी समाजरचनेचें ध्येय असणाऱ्या या देशांत समाजवादी विचारांचे लोकच नेमके असंघटित व असहाय्य आहेत. आणि जीवनांत प्रगतिशील दृष्टिकोनाचा प्रसार होण्याअेवजी व्यक्तिवादी व सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारधारा जोराने फोफावत आहेत. व्यक्तिवादी दृष्टिकोन हा ब्रिटिश प्रणित लोकशाहीचा अेक अपरिहार्य भाग म्हणून आपण घेतलेला आहे व सांस्कृतिक राष्ट्रवाद हा आपल्या राष्ट्रीय चळवळीचा अेक अुपपरिणाम आहे. बहुसंख्य सुशिक्षित माणसाचें बहिरंग थोडें खरवडलें तर ते अेक व्यक्तिवादी आहेत असें तरी आढळून येअील किंवा सांस्कृतिक राष्ट्रवाद हा तरी दृग्गोचर होअील. समाजवादी समाजरचनेला आवश्यक असणारा प्रगतिशील विचारांबाबतचा साक्षेप हा सुशिक्षितांजवळ अत्यल्प प्रमाणांत आहे. हें सर्व सरकारच्या या बाबतच्या साक्षेपी धोरणाच्या अभावाचें लक्षण आहे. आपल्या नियोजनांतलें हें अेक फार मोठें वैगुण्य आहे, आणि हें वैगुण्य तसेंच ठेवून जर आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवनांत समाजवाद येणार असेल तर तो कमालीचा तकलुपी असेल की, केव्हाहि त्याला अर्धचंद्र मिळूं शकेल. प्रस्तुत धोरणाने धड समाजावादहि येणार नाही, व व्यक्तिजीवनाच्या प्रतिष्ठेची हमीहि मिळणार नाही.

राज्यसत्तेचें आक्रमण नाही:—

तेव्हा भारतांत आजतरी समाजवादी समाजरचनेच्या नांवाखाली विचारस्वातंत्र्यावर गंडांतर येअील अशी परिस्थिति निर्माण झालेली नाही.

अुलटपक्षी सरकारचें लक्ष प्रगतिशील विचारांकडे जितक्या तातडीने जावयास हवें तितकें तें जात नाही. लेखकांना स्वातंत्र्य निश्चितपणेंच आहे. निदान सरकारकडून तरी त्या स्वातंत्र्यावर गंडांतर आलें आहे असें म्हणतां येणार नाही. ह्या सरकारी उत्तेजनाचा प्रगतीशील विचारधारेचा प्रसार होण्याच्या दृष्टीने कसा अुपयोग करून घ्यावयाचा हा त्या लोकांपुढला प्रश्न असूं शकेल. साहित्याच्या दृष्टीने पाहतां तसें सरकारचें विचारक्षेत्रावर अतिक्रमण होत आहे असें वाटत नाही.

सरकारी उत्तेजनाने साहित्यिकांची प्रतिष्ठा वाढली व त्यांना समाजांत आणि सांस्कृतिक जीवनांत अधिक मानाचें स्थान प्राप्त झालें तर अितर लोकशाही देशाप्रमाणे ह्याहि देशांतील साहित्यिकहि स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार निर्भयपणें करतील. तसें होण्यापूर्वी ह्या समाजांतील सामाजिक जाणीव व व्यक्तिगत जाणीव ही अेका विशिष्ट पातळीपर्यंत उंचावावयास हवी. तरच समाजवादी वा अुन्नत लोकशाहीप्रधान जीवनाला योग्य अशी पूर्वतयारी झालेली आहे असें म्हणतां येअील. ब्रिटिश राजवटी पूर्वीपासून असलेली व ब्रिटिश राजवटींतहि वाढीला लागलेली लोकाभिमुखी वृत्ति (Public Spiritedness) ही या देशाच्या सामाजिक जीवनाची अधिष्ठात्री शक्ति आहे, पण आज ही प्रवृत्ति लुप्त होअून अैकांतिक व्यक्तिवाद वाढीला लागलेला आहे, व त्याविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून सांस्कृतिक अभिमानाधिष्ठित राष्ट्रवाद वाढीला लागत आहे आणि या झगड्यांत बिचारा समाजवाद कुठेतरी लुप्त झालेला आहे. हें आजचें वैचारिक चित्र आहे.

भावी कालाचा दिलासा :—

तथापि आज जरी बौद्धिक लष्करीकरणाची भीति नसली तरी ती यापुढेही असणारच नाही असें नाही. विशेषत: अेखादें राष्ट्र जेव्हा अेखाद्या विशिष्ट ध्येयाच्या प्राप्तीसाठी बद्धपरिकर होतें तेव्हा समाजाच्या सर्व क्षेत्रांवर त्या प्रमाणांत नियंत्रण येणें हें अपरिहार्य होअून बसतें. म्हणून साहित्यक्षेत्रावर आज जरी संकट आलें नसलें तरी यापुढे येणारच नाही असें नव्हे, ही शंका बरोबर आहे. पण आपल्याकडील परिस्थिति लक्षांत घेतली तर असें आढळून येअील की, विविध साहित्य प्रादेशिक संस्था ह्या स्वायत्त व अेका अर्थाने लोकनियुक्त आहेत. ह्या संस्थांचें कार्य ह्या लोक-

प्रतिनिधींच्या द्वाराच चालतें. हें अेवढें लोकप्रतिनिधित्व यापुढेहि कायमच राहणार आहे. परिषद, संमेलनांसारख्या संस्था ह्याच प्रतिनिधींच्या द्वारें चालविल्या जाणार आहेत. साहजिकपणें सरकारी साहाय्य व लोकप्रतिनिधित्व यांचा समन्वय साहित्याच्या क्षेत्रांत झालेला दिसूं शकेल.

दुसरें असें की, राज्यसंस्थेचे व लोकांचे संबंध हे नेहमी विरोधी असतात असें म्हणण्याचें कारण नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांसारखे परकीय राज्यकर्ते होते तोपर्यंत राज्यकर्त्यांच्या हेतूविषयी आशंका बाळगणें समजण्यासारखें आहे; पण आज मात्र तशीच वृत्ति धारण करणें योग्य होणार नाही. आणि क्षणभर अशी कल्पना केली की राज्यकर्त्यांकडून खरोखर वैचारिक आक्रमणाचा धोका निर्माण झालेला आहे तर त्याला सर्वच सामर्थ्यानिशी तोंड द्यावें लागेल, सर्वच क्षेत्रांतून तो लढा द्यावा लागेल. अेकट्या साहित्य क्षेत्रावरच ती जबाबदारी पडणार आहे असें मानण्याचें कारण नाही.

स्वातंत्र्य कालांत सरकारची साहित्यास पुष्कळच मदत झालेली आहे. तुकारामांची गाथा, त्यांचें लाडक्कृत चरित्र, नवनीताची नवी आवृत्ति व परवा प्रकाशित झालेली ज्ञानेश्वरी हे ग्रंथ सरकारी प्रकाशनातर्फें प्रसिद्ध झालेले असून मुक्तेश्वर, नामदेव यांचे काव्यग्रंथ प्रकाशनाच्या योजना कार्यवाहींत येत आहेत. याशिवाय संशोधनास सरकारची मुक्त हस्तें मदत होत आहे. रेडिओवरहि निरनिराळ्या व्याख्यानमाला आखल्या जातात. लोकवाङ्मयाच्या प्रकाशनासाठी स्वतंत्र अनुदानाची व्यवस्था झालेली आहे. पुस्तकें अुपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय पुस्तकनिधि स्थापन झालेला आहे. गॅझेटीअर्स, महाभारत यांच्या प्रकाशनाकडे सरकारचें लक्ष आहे. याशिवाय नाट्यस्पर्धा, लोकनाट्य जतन करण्याचे विविध अुपक्रम पाहिले तर सांस्कृतिक क्षेत्रांत सरकारी साहाय्य फार मोठें होत आहे असें दिसून येअील व मग पूर्वीची सरकारकडे पाहण्याची वृत्ति धारण करणें अिष्ट आहे काय याचा अुलगडा होअू शकेल.

: ३ :

साहित्य संमेलनांच्या कार्याचा व बदललेल्या परिस्थितींत राज्यसंस्था व साहित्य यांचे संबंध कसे असणें शक्य आहे या विषयाचा परामर्श आतापर्यंत घेतला. या ठिकाणीं अध्यक्षीय भाषणांतून आलेल्या साहित्यिक

प्रश्नांची उत्क्रांति कसकशी होत गेली हें पाहणें आवश्यक आहे. त्यायोगें आजच्या साहित्यिक जीवनाची व प्रश्नांची थोडी कल्पना येअ‍् शकेल.

संमेलनांच्या उपक्रमाचें कारण :—

साहित्य संमेलनाचा प्रारंभ हा राजकीय जागृतीच्या पोटीं आहे. ब्रिटिश राजवट अेकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या शतकांत बद्धमूल होअू लागली. पण साहित्यविषयक जाणीव निर्माण होअून साहित्य संघटना असावी अशी आवश्यकता अेकोणिसाव्या शतकाच्या नवव्या दशकांत वाटू लागली. ह्या आवश्यकतेला राजकीय कारण आहे. न. र. फाटकांनी आपल्या भाषणांत तें उल्लेखिलें आहे. १८७८ सालीच ह्या अुपक्रमाला मुहूर्त कां लागला ह्याचें कारण ते देतात. 'त्या वर्षी हिंदुस्थानचे व्हाअीसरॉय लॉड लिटन् यांनी देशी भाषेंतील वृत्तपत्रांची गळचेपी करणारा अेक कायदा अंमलांत आणला होता. विद्यापीठांनी मराठीला हद्दपार केलें, तरी मराठी वृत्तपत्रांच्या मार्फत मराठी भाषेचें संवर्धन घडत होतें. त्यावर हें गंडांतर आलेलें पाहून मराठी भाषेच्या रक्षणाचा अुपाय शोधण्याच्या काळजीने रानडे लोकहितवादींसारख्या स्वाभिमानी विचारवंतांना पछाडावें हें सरळच होतें." अशा प्रकारें साहित्यविषयक प्रमुख घटनांना राजकीय घटना जबाबदार असतात हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. *

साहित्यिक प्रश्नांची अुत्क्रान्ति तपाशीत असतानाहि हा राजकीय अनुबंध विचारबाह्य ठरवून चालत नाही. १८७८ मध्ये जरी अुपक्रम झाला तरी संमेलनें सलग रीतीने १९०५ पासूनच भरूं लागलीं. तेव्हापासून तों १९२० पर्यंतचा काल हा राजनिष्ठेचा काल होय, असें पहिल्या निबंधांत म्हटलें आहे. त्यानंतरचा १९२० पासून तों १९३५ पर्यंतचा काल वाङ्मयीन विवेचनाला प्राधान्य देण्याचा कालखंड असें म्हणतां येअील. या कालांत वाङ्मयीन अंतरंगाच्या दृष्टीने रसचर्चेसारखें विषय महत्त्व पावूं शकले व

*या अभ्यासाचे विभाग करतानाहि राजकीय घटनाच महत्त्वाच्या मानल्या आहेत. व या पुस्तकाचें प्रकाशन पण महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या आगेमागे—राजकीय घटनेच्या आगेमागे— होत आहे. साहित्येतिहासाला राजकीय घटनांचा हा मागोवा टाळतां येअील असें वाटत नाही.

बाह्यरंगाच्या शुद्धतेच्या दृष्टीने शब्दशुद्धीसारखे विषय कित्येकांना विचाराई वाटले. १९३६ चे पुढे वाङमय व समकालीन जीवन ह्यांचे परस्पर संबंध शोधणें ह्या गोष्टीला साहित्यक्षेत्रांत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें. पुष्कळसे विषय हे त्या दृष्टीने निवडलेले दिसतात. १९४९ चे पुढे स्वातंत्र्यकालांत दोन प्रवृत्ति विचारवंतांत दिसून येतात. पहिली बदललेल्या परिस्थितीचें महत्त्व लक्षांत घेऊन वाङमयीन वा सांस्कृतिक परंपरेचें पुनर्मूल्यीकरण करणें ही, व दुसरी म्हणजे समकालीन वाङमयाचें प्रकट चिंतनाच्या भूमिकेवरून परिशीलन करणें ही. ह्या दोनहि प्रवृत्ति अध्यक्षीय भाषणांत अुमटलेल्या आहेत. आज साहित्याचें क्षेत्र किती व्यापक झालेलें आहे याची कल्पना या विवेचनांतले शेवटले अध्यक्ष प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचें भाषण तपासलें तरी येअू शकते.

आजची साहित्य सृष्टि :—

त्यांचें व्याख्यान म्हणजे अेक प्रकट चिंतन आहे. त्यांत महाराष्ट्राच्या अंतरंगाला भेदून जाणारी महाराष्ट्र राज्यस्थापनेची चिंता तर व्यक्त झालेलीच आहे; पण त्याशिवाय सुशिक्षितांच्या ठायीं असणारें पाश्चात्यांच्या आचारविचारांबाबतचें आकर्षण, आजचा अुनाड निराशावाद, खऱ्या सौंदर्य दृष्टीचा अभाव, व्यवहारांतील वापरली जाणारी धेडगुजरी शब्दसंपत्ति व भाषा, नियोजनाचे साहित्यावरले दुष्परिणाम, आधुनिक वाङमयांतील मातबर अैहिकता, अि. अनेक विषय आलेले आहेत. (आजच्या सांस्कृतिक जीवनाच्या महत्त्वाच्या जाणिवांचें प्रतिबिंब ह्या शेवटल्या व्याख्यानांत अुत्तम प्रकारें पडलें आहे. अध्यक्षांचें बहुपैलुयुक्त व्यक्तित्वहि याला कारण असू शकेल; पण त्यांतून आजच्या साहित्यक्षेत्रीय व्यापकतेचें दर्शन होअू शकतें. व म्हणून तिकडे लक्ष वेधणें आवश्यक वाटतें.) अेक वा दोन स्रोतांनी सुरू झालेली साहित्य-सरिता ही कशी बहुप्रवाहयुक्त झालेली आहे, व सर्वच बाबतींत तिची समृद्धि व व्यापकता कशी वाढलेली आहे याची कल्पना येण्यासाठी हें विवेचन केलें. आजच्या साहित्यांतील विविध प्रवृत्तींचें त्यायोगें दर्शन घडू शकतें. या विशाल तटिनीच्या सभोवतालचें सांस्कृतिक जीवन विविध कल्पना, अनुभूति व विचारांच्या लतावेलींनी व फुलांफळांनी समृद्ध व गजबजून जाणार आहे.

समाजमनाचें अध्यक्षीय भाषणांत पडलेलें प्रतिबिंब :—

साहित्याच्या अितिहासांत ह्या अध्यक्षीय भाषणांना अेक विशिष्ट स्थान प्राप्त झालेलें आहे. साहित्याचा अितिहास हा कलेचा व विचारक्षेत्राचा अितिहास असल्याने त्यांत व्यक्तिनिष्ठेस प्राधान्य प्राप्त होणें हें क्रमप्राप्त ठरतें. साहित्यांतली अभिव्यक्ति ही व्यक्तिनिष्ठ असली तरी तिला व्यापक अर्थाने सामाजिक अधिष्ठान असतें. या अनुरोधाने व्यक्तिनिष्ठेचें व समाजनिष्ठेचें संमीलन आपणांस अध्यक्षीय भाषणांत पाहावयास सांपडतें. अध्यक्षीय भाषण हा तात्कालिक स्वरूपाचा आविष्कार असला तर कांही कालानंतर त्या भाषणाकडे जर पाहावयास लागलों तर कांही कालविषयक वैशिष्टचें दृग्गोचर होतात. या अर्थानेच त्यांना अैतिहासिक व सामाजिक महत्त्व प्राप्त होतें. अध्यक्षाच्या व्यासंगाचें प्रतिबिंब अध्यक्षीय भाषणांत पडतें. त्यापुरतें तें व्यक्तिगत असतें. पण अध्यक्षीय भाषण हें प्राय: श्रोत्यांसाठीच व विशिष्ट सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक संदर्भांत केलेला तो एक सुखसंवाद असल्याने समकालीन समाजमनाचीं ईप्सितें, आशा-आकांक्षा, हर्ष, विमर्श, यांचें पण प्रतिबिंब त्यांत पडू शकतें. ह्या अनुरोधाने त्याला (अध्यक्षीय भाषणाला) सामाजिक महत्त्व प्राप्त होतें, आणि अशीं अनेक व्याख्यानें अेकत्र अभ्यासिलीं तर त्या कालाचें सबंध चित्र आपल्या दृष्टीपुढे अुभें राहतें की ज्याला साहित्याच्या अितिहासांत अपरंपार महत्त्व आहे.

या भूमिकेवरून अध्यक्षीय भाषणांवर जर दृष्टिक्षेप टाकला तर आपल्या सामाजिक मनांचें अेक वेगळेंच दर्शन घडतें.

अगदी पहिलीं संमेलनें ही प्राय: ग्रंथकारांचीच झालीं. त्यांतून ग्रंथकारांना येणाऱ्या अडचणींचा अूहापोह झालेला असला तरी या संघटनेला 'साहित्य संमेलन' हें स्वरूप प्राप्त झाल्यावर अेकंदरीने ह्या संघटनेचा व साहित्यविचाराचा कसा कायापालट होत गेला हें प्रत्ययास येतें. हरिभाअू आपटचांनी विद्ग्ध वाङमयाची चर्चा करून आधुनिक वाङमयाची कैफियत मांडली. हरिभाअूंना आधुनिक वाङमयाची कैफियत अध्यक्षीय भाषणांतून मांडावी लागावी हें औचित्यपूर्ण नव्हे काय ? त्यानंतर पुन: थोडा निष्क्रियतेचा कालखंड जातो. तें पाहून अेखाद्या राजवाडचांना 'मराठी भाषा मुमूर्षु झाली-' अशी शंका येते व हाच विषय साहित्यक्षेत्रांत महत्त्वाचा ठरतो.

१९२० नंतर प्रादेशिक भाषांचें महत्त्व हलकें हलकें वाढूं लागलें. शिक्षणक्षेत्रांत प्रादेशिक भाषा महत्त्वाचा विषय म्हणून मान्यता पावली. पण सुशिक्षितांची बौद्धिक व वैचारिक गुजराण तर इंग्रजी भाषेवर होत असेच; पण शब्दांच्या वापराबाबतहि त्यांना मराठी भाषा अगर मराठी शब्द ह्यांचें महत्त्व पटत नसे. सुशिक्षितांच्या ह्या प्रवृत्तींतच राजवाड्यांच्या अपरिनिर्दिष्ट आशंकेचें मूळ आहे.

शब्दशुद्धि व भाषाशुद्धि हे प्रश्नहि याच दृष्टीने महत्त्वाचे झाले. 'भारतीयत्वा'च्या अभिमानाची सुरुवात भारतीय भाषेच्या अभिमानापासून होते. ह्या दृष्टीने ह्या प्रश्नाकडे आज पाहिलें पाहिजे. भाषा ही कल्पनांचें विचारांचें, अनुभवाचें, अभिव्यक्ति–साधन आहे. त्यास ही 'शुद्धी'ची भानगड कशाला? असेंहि कित्येकांना आज वाटेल. परंतु राष्ट्रीय अभिमानाची पूर्वतयारी भाषाभिमान आहे, आणि त्याला सांस्कृतिक बैठक आहे. हें मान्य केलें तर ह्या विषयाबाबत मोठमोठ्या अध्यक्षांनी शब्दशुद्धि, लेखनशुद्धि व भाषाशुद्धि ह्या विषयांना अेवढें महत्त्व कां द्यावें हें प्रत्ययास येअील. याच कालांत मराठी भाषा विद्यापीठाभिषिक्त कशी होईल, अशी आच मराठी मनाला फार तीव्रतेने लागलेली होती असें दिसतें.

आजची वाङ्मयीन दृष्टि :—

त्यानंतर साहित्य व समाजजीवन यांचा परस्पर संबंध कशा प्रकारचा असतो, ह्या गोष्टीला विचारक्षेत्रांत व साहित्यक्षेत्रांत महत्त्व प्राप्त झालें. स्वातंत्र्यकाळांत पुनर्मूल्यीकरणाच्या विचारवंतांचें चिंतन चालू आहे. आज साहित्याकडे अनुभूतींचा व कलात्मक सौंदर्यवादी प्रवृत्तीचा ललित आविष्कार या दृष्टीने पाहिलें जातें; आणि मग सामाजिक प्रश्न, सामाजिक जाणिवा, व्यक्तिगत जाणिवा, पुनर्मूल्यीकरण, सांस्कृतिक समस्या ह्यांच्या जंजाळांतून वा सासुरवासांतून साहित्य विमुक्त होत आहे असें कित्येकांना वाटतें. अशा लोकांच्या दृष्टीने खरें साहित्याचें युगमान आज सुरू झालें आहे. साहित्याच्या अितिहासाकडे पाहिलें तर वर उल्लेखिलेल्या गोष्टींना महत्त्व असलेल्या लाटा युगायुगांत निर्माण होत असतात. आजचें युगमान व्यक्तिगत अनुभूतींना प्राधान्य देणारें असेल पण ही अेक अवस्था आहे,

अेक लाट आहे, साहित्य-सुंदरीचें हें आजचें विलसित आहे. हें असेंच अखंड राहील असें मानण्यास कांहीहि पुरावा नाही.

साहित्याच्या संघटनात्मक अंगांतील विशालता :—

ह्या वैचारिक स्वरूपावरून आपण साहित्याच्या संघटनात्मक अंगाकडे लक्ष दिलें तरीहि ह्या क्षेत्राचा व्यापकपणा दृष्टींत भरल्याविना राहात नाही. आजसाहित्य क्षेत्रांत महाराष्ट्र साहित्यपरिषदेशिवाय मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, मुंबई मराठी साहित्य संघ या मान्यवर संस्था कार्य करीत असून त्याच्या विद्यमानें विभागीय संमेलनांचीं अधिवेशनें आज किती दिवस तरी नियमितपणें भरतात. त्या अधिवेशनांचा अेकंदर थाट मध्यवर्ति साहित्य संमेलनासारखाच असतो. त्याशिवाय सोलापूर शाखेसारख्या कांही शाखा जिल्हा संमेलनें पण भर भरवूं लागलेल्या आहेत. मराठवाड्यांत अुस्मानाबाद जिल्ह्यांतहि अधिवेशनें होत आहेत. यावरून महाराष्ट्राच्या सर्वच विभागांत साहित्य विषयक आस्था व जागृति निर्माण झालेली आहे असें स्पष्टपणें दिसून येतें. याशिवायहि गोमंतक साहित्य संमेलन तसेंच बडोदें, अिंदूर अि. ठिकाणींहि संमेलनें भरतात. प्रत्येक ठिकाणीं अध्यक्षीय भाषणाबरोबर चर्चा, परिसंवाद व अितर करमणुकीचे कार्यक्रमहि योजलेले असतात. यायोगें स्थानिक लेखक, कवि अि.च्या गुणदर्शनास अवसर प्राप्त होतो. ही प्रक्रिया अेकंदरीने अधिक वृद्धिंगत होणार आहे व पुढेमागे तालुका संमेलनेंसुद्धा होअूं लागतील. त्या प्रमाणांत मध्यवर्ति संमेलनाचें स्वरूप अर्थात् वेगळें व्हावें, हें क्रमप्राप्त होय. कांही कालानंतर तें अपरिहार्य आहे.

हीं संमेलनें राजकीय आकांक्षेपासून अलिप्त असतात. त्यांच्यामागली प्रेरणा ही प्रायः साहित्यिक व सांस्कृतिकच असते. हें लक्षांत घतलें तर त्यांच्याकडून यापुढच्या कालांत मोठें कार्य होणें शक्य आहे असें वाटूं लागतें.

उपसंमेलनें :—

संघटनात्मक विस्ताराबरोबरच साहित्याच्या विविध स्वरूपांची जाणीवहि तीव्र रीतीने होत आहे असें दिसतें. गेलीं कांही वर्षें मध्यवर्ति संमेलनांत अेखाददुसरें अुपसंमेलन घेतलें जातें. पुण्याच्या १९४९च्या अधिवेशनापासून ह्या अुपक्रमास सुरुवात झाली असें दिसतें. त्या वर्षीं बालवाङ्मय,

काव्य व महिला अशीं तीन शाखा संमेलनें झालीं. त्यानंतर, अमळनेर, दिल्ली, पंढरपूर, औरंगाबाद व मालवण या सर्व ठिकाणीं अशीं शाखा-संमेलनें झालेलीं आहेत. त्या शाखा-संमेलनांसाठी निरनिराळ्या अधिकारी लेखकांची अध्यक्ष म्हणून नियुक्ति झालेली आहे. अशा रीतीने वाङमयाच्या निरनिराळ्या शाखांकडेहि लक्ष वेधलें जात आहे. त्यांचा अभ्यासहि साक्षेपाने होत आहे. अगदी पूर्वीच्या काळीं संमेलनाला निरनिराळे विभाग असत. त्या त्या विभागांचे वेगवेगळे अध्यक्षहि असत; पण ते अध्यक्ष व त्यांचीं भाषणें या ना त्या मानाने सबंध संमेलनांत फारसें महत्त्वाचें स्थान नसे. आजचीं हीं शाखासंमेलनें म्हणजे मूळ संमेलनाच्या छोट्या प्रतिकृतीच होत.

त्याशिवाय नाटचपरिषद्, लोकनाटच परिषद्, ग्रंथालय-परिषद् व वृत्तपत्रपरिषद या परिषदा स्वतंत्रपणें अस्तित्वांत आल्या असून त्यांचेंहि कार्य साहित्यक्षेत्रास पूरक असेंच चालतें असें म्हणावें लागेल. ह्या क्षेत्रांच्या वाढीला पोषक असे ठराव साहित्य-संमेलनानेंच प्रथम संमत केलेले आहेत. ह्या सर्व बदल लक्षांत घेतला तर साहित्य-संमेलनाचें खरोखरच कार्य कोणतें, ह्या प्रश्नाचें उत्तर शोधणें आणखीच अवघड होतें. ह्या विविध चळवळीचें बीज साहित्य-संमेलनामध्ये आहे. परंतु संमेलनाच्या ह्या वटवृक्षाला अितक्या विविध शाखा व पारंब्या फुटलेल्या आहेत, त्या सर्वच अशा कांही स्थायी होत आहेत, की मूळ खोड कोणतें हें लक्षांत येणें कठिण झालेलें आहे.

साहित्यिक कोणास म्हणावें?

सांस्कृतिक जीवनांत ही जी विविधता समाविष्ट झालेली आहे त्या योगें कांही गमतीचे 'वाद' निर्माण होतात. साहित्य-संमेलनाचा अध्यक्ष हा कोणीतरी मान्यवर साहित्यिक असतो; पण कोणास 'साहित्यिक' म्हणावयाचें, हा प्रश्न अलीकडे निर्माण होअू लागलेला आहे. त्याचें मूळ ह्या विविधतेंत आहे.

कांहींचें म्हणणें साहित्य-संमेलनाचें वा परिषदेचें कार्य हें साहित्य-विषयक म्हणजे प्रायः ललित साहित्य विषयकच असावें. राजकीय व तात्त्विक विचारांचा समावेश साहित्यांत होअू नये. त्यासाठी राजकीय, सामाजिक, अितिहास परिषदा व तत्त्वज्ञान परिषदा आहेतच की. प्राचीन वाङमयाच्या अभ्यासास अुत्तेजन देणारी मध्यवर्ती भारतीय प्राच्यविद्या

परिषद् आहेच. तेव्हा प्राचीन वाङमयाचें अध्ययन, परिशीलन वा संशोधन त्या त्या परिषदांच्या कक्षांत समाविष्ट करणें योग्य होईल. म्हणजेच ललित व तत्सम साहित्य हेंच साहित्य ह्या संज्ञेस पात्र आहे आणि साहित्य संमेलन वा परिषदेचें कार्य हें बव्हंशाने त्याच्याशी संबद्ध असावें.

हा सर्व युक्तिवाद वरवर पाहिलें असतां बिनतोड वाटतो. आपलें सांस्कृतिक जीवन जर खरोखर विकसित नि वृद्धिगत होत गेलें तर साहित्य-परिषदेचें वा संमेलनाचें ललित साहित्य संमेलन वा परिषदेंत रूपांतर व्हावयास फारसा विरोध होणार नाही. आणि आणखी कांही काल गेला व सांस्कृतिक जीवनाची अेकंदर पातळी अुचावत गेली, व्यक्तिगत अभिरुचि प्रगल्भ होत गेली तर अितर सुसंस्कृत वा प्रगत देशांप्रमाणे प्रचलित साहित्य-परिषदेची व संमेलनांचीहि आवश्यकता राहाणार नाही. कारण स्वतंत्र व प्रगत देशांत अशीं साहित्य संमेलनें भरत नाहीत, हा अुल्लेख मागे आलेलाच आहे.*

संक्रमणावस्थेंतील जीवन :—

संक्रमणावस्थेंतलें जीवन हें संमिश्र असतें. वाङमयाच्या वा जीवनाच्या निरनिराळ्या शाखांचें अस्तित्व जरी भासमान होत असलें तरी त्यांच्या मर्यादा अतिशय पुसट असतात. माणसाच्या ठायीं अेक प्रकारची रसिकता वृद्धिगत झालेली आहे. तिला ह्या शाखाभिन्नतेच्यापलीकडे जाअून गुणांचें कौतुक करावेंसें वाटतें. म्हणूनच वाङमयासाठी ठेविलेलें नोबेल पारितोषिक रसेलसारख्या तत्त्वचिंतकाला व चर्चिलसारख्याच्या इतिहास लेखनाला दिलें जातें तेव्हा आपणांस तो गुणगौरव योग्य वाटतो. उलट आपणांस अितिहासाचार्य राजवाडे अगर अितिहासकार सरदेसाई यांना ह्या संमेलनाचें अध्यक्षपद मिळालें नाही या गोष्टीची रुखरुख लागते. तथापि इतर कित्ये-

*या निबंधांत प्रारंभीं संमेलनाच्या कार्यासंबंधीं विचार करतांना परिषदेने साहित्यसंशोधनासारखें काम करावें असें म्हटलें आहे; पण तेंहि खरोखर तिच्याकडे राहाणार की नाही अशी भीति आजच निर्माण झालेली आहे. कारण निरनिराळीं प्रादेशिक विद्यापीठें त्या कार्यासाठी सिद्ध होत आहेत. आणि सरकारी सहानुभूतीचा वांटा अधिक प्रमाणांत विद्यापीठाकडेच जाणार हें उघड आहे. तथापि हें फार पुढचें आहे. सध्या आपण त्या मानाने संक्रमणकालांत वावरत आहोंत.

कांना आचार्य जावडेकर अगर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना
संमेलनाध्यक्षपद लाभलें याची (अर्थात् तात्त्विक भूमिकेवरून विचार करतां)
रुखरुख लागलेली असते!

तसें पाहूं गेलें तर साहित्यिक कोण, याची व्याख्या करणें कठीण आहे.
मराठींत आपण ज्याला ललित वाङ्मय म्हणतों ती कल्पनाच अिंग्रजी
वाङ्मयाला संमत नाही. म्हणजे अिंग्रजींत ललित वाङ्मयाला पर्यायवाचक
शब्दच नाही. कित्येकांच्या मतें जो सृजनशील (Creative) वाङ्मय
निर्माण करतो त्याला साहित्यिक म्हणावें. पण मग टीकाकारांचें काय?
कारण ललित-लेखन करणाऱ्यांना साहित्यिक म्हणावें, अशा विचारांचे लोक
वाङ्मयीन टीकाकारांचा समावेश साहित्यिकांत करण्यास अुत्सुक असतात.
जेथे सर्जनशील प्रवृत्तीचा प्रत्यय येतो तें ललित साहित्य असेंहि कित्येकजण
म्हणतात. पण हेंहि म्हणणें शास्त्रसंमत नाही. जिला आपण टीका म्हणतों
ती टीका बाह्यत: टीकात्मक प्रवृत्तींतून निर्माण झाली असें आपण मानीत
असलों तरी टीकेंतहि सर्जनशीलतेचा प्रत्यय कित्येक वेळां येत असतो.
तीच गोष्ट विचार-प्रधान लेखनाबाबतहि म्हणतां येअील. आणि जें बाह्यत:
सर्जनशील वा ललित वाङ्मय म्हणतां येअील त्यांतहि कित्येक वेळां टीका-
प्रवृत्तीचा प्रत्यय फारच प्रभावी रीतीने येत असतो. याचाच अर्थ सर्जनशीलता,
व टीकाप्रवृत्ति (Creative & Critical Sense) हे निर्णायक निकष होअूं शकत
नाहीत. खरें श्रेष्ठ साहित्य हें त्यांच्या पलीकडे असतें व त्याच अुच्च पातळी-
वर अुभें राहूनच हेरावें लागतें. याचाच अर्थ असा कीं, साहित्यिकाची व्याख्या
करणें व साहित्यिक म्हणजे कोण, हें ठरविणें जवळजवळ अशक्य आहे.

समाज असें मानतो :—

देशाच्या व समाजाच्या सांस्कृतिक जीवनास ज्याच्या लिखाणामुळे
कांही घाट आलेला आहे, त्याच्यावर कांही संस्कार झालेले आहेत, अशाला
सर्वसामान्य माणूस साहित्यिक समजतो. त्या दृष्टीने त्याच्या मनांत आदरहि
वसत असतो. मग त्याने विचारप्रधान लेखन केलेलें असो, भक्तिप्रधान
काव्य लिहिलेलें असो वा तात्त्विक स्वरूपाची वा अितिहासाची मीमांसा
केलेली असो. या कारणानेच साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद निरनिराळ्या
व्यक्तींना दिलें गेलेलें आहे. कांही अध्यक्षांचा व साहित्याचा संबंध काय?

असाहि प्रश्न आज कित्येक जण विचारूं शकतात; पण समाज-मनाची ही वृत्ति लक्षांत घेतली तर अशा व्यक्ति साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदीं कां निवडल्या गेल्या ह्याचें कारण समजेल. साहित्यविषयक जाणीव अधिक आकारबद्ध होत आहे. साहजिकपणें यापुढे तथाकथित अनधिकारी व्यक्ति अध्यक्षपदीं विराजमान झालेली दिसणार नाही.

आजहि दिवंगत व्यक्तींना आदरांजली वाहणारे साहित्य संमेलनांतील ठराव पाहिले तर ही भूमिका आपण पूर्णपणें सोडन दिलेली आहे असें म्हणतां येणार नाही.

भारतास कोणतें साहित्य यापुढें अुपकारक होअील ? :––

भारतीय समाजाचें भावनात्मक वा विचारात्मक मनोमीलन अद्याप व्हावयाचें आहे. त्यासाठी प्रामुख्याने साहित्याचा हातभार लागणार आहे. भारतांत निरनिराळ्या व प्रगत अशा चौदा भाषा बोलल्या जात असल्या-मुळे निरनिराळ्या भाषिकांत वैचारिक वा भावनात्मक देवाण-घेवाण करण्याचें काम साहित्याला करावें लागेल. त्यासाठी भारतीय साहित्य परिषद् वा साहित्य अकादमीसारखी संस्था दीर्घकाळ अुपयुक्त राहणार आहे. ही संस्था प्रादेशिक साहित्य परिषदांना संलग्न करून घेअील. ह्या कामासाठी तरी विचारवंत व साहित्यिक कलावंत क्वचित् प्रसंगीं तत्त्वज्ञ व विज्ञान-शास्त्रज्ञहि साहित्यिकाच्या भूमिकेवरून अेकत्र येणें आवश्यक आहे. ब्रिटिश राजवटींत आपणां सर्व शेजारी भाषांच्या साहित्याविषयी फार अुदासीन राहिलों आहोंत. ही अुदासीनता नष्ट होअून भिन्न भिन्न भाषिकां-मध्ये खरा भ्रातृभाव खरी आत्मीयता निर्माण होणें ही आजची सामाजिक व भावनात्मक गरज आहे. भाषावार साहित्य परिषदा व मध्यवर्ति संघटना यांच्याकडून हें काम व्हावें अशी अपेक्षा आहे.

नव्या कक्षा :—

या सर्व विवेचनाने यापुढे साहित्यक्षेत्रांतील समस्या, विचारांच्या कक्षा कशा बदलल्या आहेत याची कल्पना येअू शकेल. शिक्षण, राज्य-कारभार, व्यवहार, व्यापार यांत मातृभाषेचा प्रवेश कसा करावयाचा, हा प्रश्न मतभेदाचा नसून अुपाययोजनेसाठी लागणाऱ्या कालावधीचा आहे.

साहित्यांत प्रमाण काय ? अभिव्यक्ति की आशय ? अश्लीलता म्हणजे काय ? साहित्यांत व्यक्त होणाऱ्या व्यक्तिगत व सामाजिक जाणिवांचें स्वरूप कोणतें ? अित्यादि प्रश्न सनातन महत्त्वाचे प्रश्न म्हणून विचारवंतांच्या व कलावंतांच्या सत्यसंशोधक प्रवृत्तीला अखंड अवसर देणार आहेत. साहित्याचा व लोकजीवनाचा घनिष्ठ संबंध असणें आवश्यक आहे ही गोष्ट विवाद्य राहिलेली नाही. यापुढल्या काळांत भाषाभाषांतील अंतर कसें कमी करतां येईल व सर्वसाधारण सुबुद्ध वा सुसंस्कृत व्यक्ति ही खऱ्या अर्थानें भारतीय साहित्याशी कशी परिचित राहील, या दिशेनें यापुढे अुपाययोजना होणें आवश्यक आहे. साहित्याच्या क्षेत्राच्या व्याप्तीच्या ह्या नव्या भारतीय परिसीमा आहेत. या प्रयत्नांस थोडा प्रारंभहि झालेला दिसतो. गतवर्षीच्या पंजाबी व गुजराती वाङमयाचें समालोचन मराठी वाचकांस मराठींतून अुपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या वर्षी साहित्य परिषदेनें पंजाबचे राज्यपाल सन्मान्य काकासाहेब गाडगीळ यांच्या साहाय्यानें केलेला आहे, व नव्या काळाचीं पावलें ओळखण्याच्या दृष्टीनें तो अतिशय अर्थपूर्ण आहे. साहित्याचें क्षेत्र व्यापक होत होत त्याचा विस्तार कोणत्या दिशेनें होत आहे, हें या विवेचनावरून समजून येअील. भिन्न भिन्न भाषांच्या पलीकडे जाअून 'भारतीय साहित्या'ची अुभारणी करणें हा यापुढल्या साहित्यक्षेत्रांतील महत्त्वाचा प्रश्न आहे.

साहित्यक्षेत्रापुढे आणखी अेक मोठा प्रश्न आहे. भारत हें राष्ट्र नव्यानें जागृत झालेलें राष्ट्र आहे. ह्या नवजात राष्ट्रानें कोणत्यातरी प्रकारच्या ध्येयवादाचा साक्षेपी पुरस्कार केलेला आहे. मानवेतिहासाच्या मंथनांतून निर्माण झालेल्या श्रेष्ठतर मानवी मूल्यांचें परिपालन होअील, व्यक्तीची आणि त्याबरोबर समष्टीची पण प्रतिष्ठा वाढेल, अशा प्रकारची समाजरचना निर्माण करण्यास भारत बद्धपरिकर झालेला आहे. या नवध्येयाचा साक्षात्कार भारतीयांना घडवून आणावयाचा व तो घडवून आणतांना भारतीय अस्मितेशी प्रामाणिक राहायचें, हें महत्त्वाचें कार्य साहित्याला यापुढल्या काळांत करावयाचें आहे व तें अीप्सित कसें साधावयाचें हा यापुढील काळांत विचारवंतांपुढला व साहित्यिकांच्या पुढला मोठा प्रश्न आहे.

नवी समीक्षा :--

साहित्य-समीक्षेपुढेहि असेच नवे नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. साहित्य, कला हा कलावंताच्या अनुभूतीचा विशिष्ट घाटयुक्त व सौंदर्य-प्रतीति करून देणारा आविष्कार आहे, या दृष्टीने कलाकृतीचें परीक्षण आज केलें जातें. कलाकृतीचे विविध घटकावयव, त्यांतून प्रत्ययास येणारी सुसूत्रता वा सुसंगति नि सेंद्रियता वा स्वयंपूर्णता, यांना प्राधान्य देऊन आजचें परीक्षण केलें जातें. ही 'आजची' म्हटली जाणारी दृष्टि आहे.

या दृष्टीला साहित्य-कृति वा कलाकृति ही परिपूर्ण असून व्यक्ति वा समाजनिरपेक्ष अशी वाटते. अनुभूतीला सौंदर्यपूर्ण घाट वा आकार आला की तिला कलाजीवनांत अेक नवेंच अधिष्ठान प्राप्त होतें, नंतर तिचे व्यक्ति जीवनाशी व समष्टि जीवनाशी असलेले संबंध दुरावतात, कलाकृति म्हणून तिचें स्वतंत्र आयुष्य सुरु होतें व चिरंतनत्त्वाच्या दिशेने तिचा प्रवास सुरू होतो. अशी आजच्या साहित्य-समीक्षकाची भूमिका असते. आज साहित्यास जें प्रगल्भत्व प्राप्त झालेलें आहे त्याच्याशी ही भूमिका सुसंगत आहे यांत कांहीच वाद नाही. त्याचप्रमाणे या भूमिकेवरून अितर कोणत्याहि भूमिकेपेक्षा सत्याचें जास्तींत जास्त परिपूर्ण दर्शन घडतें हेंहि खरें आहे. हें सर्व मान्य करूनहि कांही शंका अुद्भवतातच. कला-कृति ही खरोखर हे लोक मानतात अितकी व्यक्ति-निरपेक्ष व समाज-निरपेक्ष असते काय? का ही भूमिका म्हणजे प्राप्त मानसशास्त्रीय वा वैज्ञानिक प्रगतीचा अेक अपरिहार्य परिणाम आहे? ह्या भूमिकेवरून जगांत श्रेष्ठ ठरलेल्या वाङ्मय कृतींचें परिशीलन व्हावयास हवें; तें झालेलें दिसत नाही. कदाचित् तसें झालें तर या भूमिकेच्या मर्यादा अधिक स्पष्ट होतील व साहित्याभ्यासाची नवी भूमिका शोधण्याचा प्रयत्न करावा लागेल. असो, तें काही असलें तरी आजच्या समीक्षण-शास्त्राचें हें अेक नवक्षितिज आहे. ह्या क्षितिजावर यापुढे समीक्षणाचे लहानमोठे अिमले अुभारले जातील.

याच भूमिकेचें अेक अपत्य म्हणजे टीकाशास्त्रांत मनोविज्ञानशास्त्राने पटकावलेलें महत्त्वाचें वा मानाचें स्थान. फ्राअीडच्या कालापासून साहित्याचें क्षेत्र मनोवैज्ञानिक शास्त्राने काबीज करावयास सुरवात केलेली आहे. साहजिकपणें आज असें दिसून येतें की, या भूमिकेवरून लिहिलेलें साहित्य, साहित्याचा प्रांत सोडून मनोविज्ञानशास्त्राच्या प्रांतांत केव्हा प्रवेश करतें

तें समजत नाही. तेव्हां ललित कृतींतील जीवनचित्रणांतील साहित्यिक व मनोवैज्ञानिक अंग यांच्या कक्षांची निश्चिति करणें हा आजच्या समीक्षेपुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

नवें संशोधन :—

आजचें साहित्यिक संशोधनहि असेंच वेगळयाच दिशेने विकसित वा अुत्क्रान्त होत आहे समीक्षाशास्त्राची वाढ कोणत्या दिशेनें होत आहे याचा अुल्लेख आतांच केला. साहित्याचें संशोधन हें भाषा संशोधनाच्या दिशेने आज वृद्धिगत होत आहे. त्यांतहि बोलीभाषा व अुच्चार यांना महत्त्व प्राप्त होत आहे. पुणें विद्यापीठांत व अितर विद्यापीठांत भाषाविज्ञान (Linguistics) हा स्वतंत्र विभाग निर्माण झालेला आहे व भाषेच्या नव्या अभ्यासकास त्या क्षेत्रांत भरपूर वाव आहे. सर्व आधुनिक वैज्ञानिक अुपकरणांच्या आधारें हें भाषा वैज्ञानिक संशोधन मोठया वैभवाने आपला मार्ग आक्रमण करीत आहे. अेका दृष्टीने भारतासारख्या बहुभाषा बोलणाऱ्या देशांत भाषा-विज्ञानाला महत्त्व प्राप्त होणें हें अपरिहार्य आहे. ह्या शास्त्राच्या अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशी भूमि येथेच आहे. याच शास्त्राच्या साहाय्याने भिन्न भाषिकांना अेकत्र आणण्याचे, त्यांच्यांत परस्पर विनिमय सुरू करण्याचे नवे नवे मार्ग निघतील व त्यादृष्टीने नवें भाषाविषयक वातावरण निर्माण होअू शकेल; जें नव्या साहित्याच्या निर्मितीस व परीक्षणास कारक होअू शकेल.

आणि नवें वातावरण :—

साहित्याची अविरत अभिवृद्धि होण्यास तीन गोष्टींची आवश्यकता असते. पहिली गोष्ट म्हणजे लेखकांस व कलावंतांना आर्थिक स्वास्थ्य असावयास हवें. अशा स्वास्थ्याच्या अभावीं अुच्च साहित्याची निर्मिति होणें असंभवनीय आहे. कलावंतांच्या वा साहित्यिकांच्या मागे अुदरनिर्वाहाची विवंचना कमी व्हावयास हवी. राज्यशासनाने समाजवादी रचनेचें ध्येय स्वीकारून सर्व व्यक्तींच्याच मागची ही विवंचना कमी करण्याचा संकल्प सोडला आहे. साहजिकच या पुढच्या काळांत कलावंताला स्वास्थ्य प्राप्त होअील असा दिलासा वाटावा अशी परिस्थिति निर्माण झालेली आहे.

साहित्याच्या प्रगतीस पोषक अशी दुसरी गोष्ट म्हणजे कलावंतास वा साहित्यिकास आपल्या कलाकृतीचें कौतुक होत आहे, लोकांना आपल्या कलेची जाणीव आहे, असा प्रत्यय कलावंतास किंवा साहित्यिकास यावयास हवा. या दृष्टीने पाहूं गेलें असतां सरकारी अुत्तेजनाचें रहस्य समजूं शकेल. सरकारी पारितोषिकें वा मानसन्मान हीं कलावंतांस आर्थिक दृष्टीने व मान्यतेच्या दृष्टीने महत्त्वाचीं ठरतात. आपल्यासारख्या नवस्वतंत्र राष्ट्रास कांही काल (सरकारने कलावंतांचा वा साहित्यिकांचा गौरव करणें) ह्या पद्धतीचा अवलंब करणें आवश्यक आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कलावंताला वा साहित्यिकाला स्वतःचे विचार, भावना, संवेदना अित्यादि व्यक्त करण्याचें स्वातंत्र्य हवें असतें. ह्या स्वातंत्र्याशिवाय कलेची व साहित्याची मौलिक निर्मिति सर्वथा अशक्य आहे. ह्याहि बाबतींत आपणांकडील परिस्थिति मागे म्हटल्याप्रमाणें कलेच्या अभिवृद्धीस मारक आहे असें म्हणतां येणार नाही.

ह्या तीन गोष्टींचा प्रत्यय समाजजीवनांत यापुढच्या कालांत अधिकाधिक उत्कटत्वाने येत जाणार असें म्हणावयास हरकत नाही. अुज्ज्वल भविष्याची ग्वाही देणाऱ्या सुवर्णकिरणांची अूब अुद्याच्या अुंबरठ्यावर अुभे राहिलें असतां भासमान होत आहे.

समारोप :—

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचा मागोवा घेत घेत आपण आपल्या कालापर्यंत आलों असतां आजचें साहित्यविषयक प्रश्न कोणते आहेत व साहित्यक्षेत्राच्या आजच्या चतुःसीमा कोणत्या आहेत तें विशद करण्याच्या हेतूनें हें विवेचन केलें. महाराष्ट्र निर्मितीच्या, प्रभातकालीं नवमहाराष्ट्राच्या चरणीं साहित्यसरितांच्या विविध प्रवाहांतून जमा केलेलें, व मान्यवर अध्यक्ष महोदयांच्या विचारधारांनी पूनित झालेलें हें गंगोदक श्रद्धाभावाने अर्पण करतों. विचारांचीं हीं वेगळीं वेगळीं फुलें ह्या विश्वरूप महाराष्ट्राच्या चरणीं श्री ज्ञानेश्वरांच्या शब्दांत अर्पण करतों.

भरोनि सद्‌भावाची अंजुळी ।
मियां वेचिलीं फुलें मोकळीं
अर्पिली अंघ्रि-युगुलीं । विश्वरूपाच्या ।।

● ● ●

साहित्य संमेलनें
आणि
साहित्यिक प्रश्न

परिशिष्टें--

[अ] मराठी साहित्य संमेलनाचीं
आजपर्यंतचीं अधिवेशनें
व त्यांचे अध्यक्ष

[आ] अध्यक्षीय भाषणांतून
चर्चिले गेलेले विषय

सा...८

परिशिष्ट (अ)

मराठी (महाराष्ट्र) साहित्य संमेलनें

[ज्या क्रमांकाने जें संमेलन साजरें झालें तो क्रमांकच या ठिकाणीं पहिल्या स्तंभांत दिलेला आहे. अैतिहासिक दृष्टीचा अवलंब केला असतां हें धोरण योग्य आहे असें आढळून येअील.]

क्रमांक	अनुक्रम	गांव	अध्यक्ष	महिना	व वर्ष
—	१	पुणें	न्या. मू. म. गो. रानडे	मे	१८७८
—	२	,,	वे. कृष्णशास्त्री रानडे	मे	१८८५
१	३	सातारा	र. पां. करंदीकर	मे	१९०५
२	४	पुणें	गो. वा. कानिटकर	मे	१९०६
३	५	,,	वि. मो महाजनी	मे	१९०७
४	६	,,	चिं. वि. वैद्य	मे	१९०८
५	७	बडोदें	का. र. कीर्तीकर	ऑक्टो.	१९०९
७	८	अकोलें	ह. ना. आपटे	ऑक्टो.	१९१२
८	९	मुंबई	सर गंगाधरराव पटवर्धन	मे	१९१५
९	१०	इंदूर	ग. ज. आगाशे	मार्च	१९१७
१०	११	बडोदें	न. चिं केळकर	नोव्हें.	१९२१
११	१२	मुंबई	माधवराव किबे	मे	१९२६
१२	१३	पुणें	श्री. कृ. कोल्हटकर	मे	१९२७
१३	१४	ग्वाल्हेर	माधव श्री. अणे	एप्रिल	१९२८
१४	१५	बेळगांव	शि. म. परांजपे	मे	१९२९
१५	१६	मडगांव	वा. म. जोशी	मे	१९३०
१६	१७	हैद्राबाद	डॉ. केतकर श्री. व्यं.	मे	१९३१
१७	१८	कोल्हापूर	श्रीमंत सयाजीराव गायकवाड	डिसें.	१९३२
१८	१९	नागपूर	कृ. प्र. खाडिलकर	डिसें.	१९३३

क्रमांक	अनुक्रम	नांव	अध्यक्ष	महिना व वर्ष	
१९	२०	बडोदें	ना. गो. चापेकर	डिसें.	१९३४
२०	२१	इंदूर	श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि	डिसें.	१९३५
२१	२२	जळगांव	डॉ. माधवराव पटवर्धन	नोव्हें.	१९३६
२२	२३	मुंबई	बॅ. वि. दा. सावरकर	एप्रिल	१९३८
२३	२४	अहमदनगर	द. वा. पोतदार	"	१९३९
२४	२५	रत्नागिरी	ना. सी. फडके	मे	१९४०
२५	२६	सोलापूर	वि. स. खांडेकर	एप्रिल	१९४१
२६	२७	नाशिक	प्र. के. अत्रे	ऑक्टो.	१९४२
२७	२८	सांगली	श्री. म. माटे	नोव्हें.	१९४३
२८	२९	धुळें	भा. वि. वरेरकर	डिसें.	१९४४
३०	३०	बेळगांव	* ग. त्र्यं. माडखोलकर	मे	१९४६
३१	३१	हैदराबाद	न. र. फाटक	मे	१९४७
३२	३२	पुणें	शं. द. जावडेकर	मे	१९४९
३३	३३	मुंबई	य. दि. पेंढरकर,	मे	१९५०
३४	३४	कारवार	अ. का. प्रियोळकर	मे	१९५१
३५	३५	अमळनेर	कृ. पां. कुलकर्णी	ऑक्टो.	१९५२
३६	३६	अहमदाबाद	वि. द. घाटे	सप्टें.	१९५३
३७	३७	दिल्ली	लक्ष्मणशास्त्री जोशी	ऑक्टो.	१९५४
३८	३८	पंढरपूर	शं. दा. पेंडसे	डिसें. जाने.	१९५५–५६
३९	३९	औरंगाबाद	अनंत काणेकर	मे	१९५७
४०	४०	मालवण	आ. रा. देशपांडे	मे	१९५८
४१	४१	मिरज	श्री. के. क्षीरसागर	मे	१९५९
४२	४२	ठाणें	रा. श्री. जोग	मे	१९६०

* त्यावेळच्या घटनेप्रमाणें परिषदेचें अध्यक्षपद प्रा. द. वा. पोतदार यांच्याकडे गेलें होतें व ग. त्र्यं. माडखोलकर वाङमय-विभागाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. हा घटनात्मक फरक बाजूला ठेवून या ठिकाणीं ग. त्र्यं. माडखोलकर यांचें नांव संमेलनाध्यक्ष म्हणून समाविष्ट करणें इष्ट वाटलें.

संमेलनांच्या क्रमांकांबाबत—

संमेलनांच्या क्रमांकांबाबत थोडासा खुलासा करणें जरूरीचें आहे. येथे **पहिल्या** स्तंभांत ज्या क्रमांकाने तें संमेलन साजरें झालें तो क्रमांक दिलेला आहे. **दुसऱ्या** रकान्यांत आजच्या संशोधनाच्या आधारें सिद्ध होत असलेला संमेलनाचा क्रमांक दिलेला आहे.

१९४२ त परिषदेचा अितिहास प्रसिद्ध होअीपर्यंत १८८५चें संमेलन हेंच पहिलें संमेलन गणलें जात असे. पहिलीं दोन तीन संमेलनें हे प्रारंभींचे प्रयत्न होते. त्यायोगें क्रमांकाच्या बाबत कोणी विशेष साक्षेप बाळगिलेला दिसत नाही. जुने अुल्लेख पाहतां असें दिसतें की १८८५ नंतर वीस वर्षं संमेलन भरलेंच नाहीं. १९०५ मध्ये साताऱ्यास कांही ग्रंथकार अेकत्र जमले. तेंच पहिलें संमेलन गणलें जाअू लागलें. यापुढे १९०५ पर्यंत सामान्यतः तीं नियमितपणें भरलीं गेलेलीं दिसतात. त्यांना क्रमांक देतांना साताऱ्याच्या संमेलनास पहिलें मानूनच क्रम दिलेले आहेत. १९०९ च्या बडोद्याचा संमेलनवृत्तांत क्रमांकाचा अुल्लेख नाही. पण कांही निबंधांतून आजपर्यंत चार संमेलनें झालीं असा उल्लेख आढळतो. या पूर्वींच्या संमेलनांत साहित्य परिषदेविषयी बोलणीं सुरू झालेलीं होतीं. व तोवेळपर्यंत किती संमेलनें झालीं ह्याचा तपासहि सुरू झालेला असावा. त्या वेळीं १८८५ च्या अधिवेशनाचा शोध लागला असावा. कारण पुढचें १९१२ मधलें संमेलन ६ वें संमेलन म्हणून साजरें न होतां ७ वें संमेलन म्हणून साजरें झालें. प्रख्यात कादंबरीकार हरिभाअू आपटे हे अध्यक्ष होते. हा क्रम पुढे १९४४ पर्यंत चालू होता. परिषदेचा अितिहास लिहितांना १८८५ पूर्वी झालेल्या १८७८ च्या संमेलनाचा (आणखी अेका संमेलनाचा) पुरावा अुपलब्ध झाला आणि त्याची दखल घेअून १९४६ चे वेळगांवचें संमेलन म्हणून २९ वें संमेलन म्हणून साजरें न होतां **तिसरें** अधिवेशन म्हणून साजरें झालें. म्हणजे प्रत्यक्षांत २९ वें अधिवेशन कोठे झालेलेंच नाही. त्यानंतर हा क्रम तसाच आजपर्यंत चालू आहे.

परिशिष्ट (आ)

अध्यक्षीय भाषणांतून आलेल्या विविध विषयांची सूचि

[प्रथम जाड ठशांत विषय दिलेले आहेत. ज्या अध्यक्षांच्या भाषणांत त्याची चर्चा आहे. त्यांचीं नांवें पुढे छापलेलीं आहेत.]

अश्लीलता व पावित्र्य विडंबन : प्र. के. अत्रे, यशवंत, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर.

अनुस्वार-चर्चा व शुद्धलेखन : वि. द. घाटे, शं. दा. पेंडसे, वा. म. जोशी.

अव्यवस्थितप्रज्ञ प्रतिभावंत : आ. रा. देशपांडे.

अध्यक्षीय भाषणांचे प्रकार : आ. रा. देशपांडे.

अलंकार वाङमय : ना. गो. चापेकर.

आधुनिक वाङमयासंबधीच्या निरनिराळ्या गैरसमजाचें निराकरण : ह. ना. आपटे, न. चिं. केळकर.

आंतभारती : लक्ष्मणशास्त्री जोशी, वि. द. घाटे.

आधुनिक राजाश्रय : श्री. के. क्षीरसागर.

ऐहिकतेची महति : श्री. के. क्षीरसागर.

उर्दू भाषेचा परिणाम : न. र. फाटक.

कोकणी मराठी संबध : अ. का. प्रियोळकर.

गीतारहस्य व ज्ञानेश्वरी : कृ. प्र. खाडिलकर.

गोमंतकीय साहित्य-परंपरा : अ. का. प्रियोळकर.

दुर्बोधतेची मीमांसा : यशवंत, आ. रा. देशपांडे.

नवमतवाद : श्रीमंत औंधकर–पंतप्रतिनिधि, ना. गो. चापेकर.

नवकाव्य व नववाङमय-चर्चा : यशवंत, आ. रा. देशपांडे, श्री. के. क्षीरसागर.

नियतकालिकांचें कार्य : न. र. फाटक, यशवंत, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके.

नभोवाणी व मराठी : ग. त्र्यं. माडखोलकर, यशवंत, भा. वि. वरेरकर.
नाट्य वाङ्मयाचें सामर्थ्य : भा. वि. वरेरकर.
नियोजन व साहित्य : श्री. के. क्षीरसागर.
प्रवृत्ति-निवृत्तिवाद : शं. दा. पेंडसे.
ग्रंथ-परीक्षण-योजना : ना. गो. चापेकर, श्री. म. केतकर.
पुरोगामी वाङ्मय : ना. सी. फडके, प्र. के. अत्रे, वि. स. खांडेकर.
फ्रेंच अॅकाडेमी : ग. ज. आगाशे, सयाजीराव गायकवाड, माधवराव किबे. न. र. फाटक.
भारतीय क्रांति व जगत्क्रांति : शं. दा. जावडेकर.
भक्तिमार्गांतून क्रांतिमार्गाकडे : शं. द. जावडेकर.
मानव-धर्म व विश्व-धर्म : शं. दा. पेंडसे, शं. द. जावडेकर.
भाषाशुद्धि व शब्दशुद्धि : ह. ना. आपटे, श्री. कृ. कोल्हटकर, मा. त्रि. पटवर्धन, वि. दा. सावरकर, शि. म. परांजपे, वा. म. जोशी.
भाषावाद : अनंत काणेकर.
भाषा : सत्यदर्शन : अनंत काणेकर.
भाषा व विश्ववादित्व : अनंत काणेकर.
भावनाविष्काराचे भिन्न प्रकार : कृ. पां. कुलकर्णी.
भाषावार रचना : न. चिं. केळकर, द. वा. पोतदार.
भाषा व राज्यसंस्था : श्री. व्यं. केतकर.
मराठी भाषा मुमूर्षु झाली आहे काय ? : श्री. कृ. कोल्हटकर, ह. ना. आपटे.
मराठीचें क्रियापद-दारिद्र्य : वि. द. सावरकर.
मराठी भाषेची पूर्वपीठिका : चिं. वि. वैद्य
मराठी व अिंग्रजी : वि. द. घाटे, श्री, के. क्षीरसागर.
महाराष्ट्र व कर्नाटक : ग. त्र्यं. माडखोलकर.
मराठी व पीएच्. डी. पदवी : न. र. फाटक, वि. द. घाटे.
महाराष्ट्र विद्यापीठ : द. वा. पोतदार, ना. गो. चापेकर, कृ. प्र. खाडिलकर, वि. दा. सावरकर, श्री. म. माटे, भा. वि. वरेरकर, ग. त्र्यं. माडखोलकर, शं. द. जावडेकर.
महाराष्ट्र धर्म : शं. दा. पेंडसे, आ. रा. देशपांडे.

महाराष्ट्रीय संस्कृति व भारतीय संस्कृति : लक्ष्मणशास्त्री जोशी, शं. दा. पेंडसे.
महाराष्ट्राचें अेकीकरण : न. रा. फाटक, शं. दा. पेंडसे, श्री. के. क्षीरसागर.
मुक्तछंद : यशवंत, आ. रा. देशपांडे.
मुसलमानांचा मराठीस लाभलेला हातभार : अ. का. प्रियोळकर.
माध्यम व विषय या दृष्टीने वाङमय-मीमांसा : कृ. पां. कुलकर्णी.
रससंख्या : ना. गो. चापेकर, वा. म. जोशी, न. र. फाटक, न. चिं. केळकर.
ललित वाङमयाची महति : प्र. के. अत्रे, ह. ना. आपटे.
लिपिशुद्धि : ना. गो. चापेकर, वि. द. सावरकर, शि. म. परांजपे.
वाङमय म्हणजे काय : न. चिं. केळकर.
वाङमयानंद-मीमांसा : न. चिं. केळकर, वा. म. जोशी, ना. गो. चापेकर, शि. म. परांजपे.
वाङमयेतिहास-योजना : वि. द. घाटे.
वाङमयांतील वास्तवता : प्र. के. अत्रे, न. र. फाटक, वि. स. खांडेकर, भा. वि. वरेरकर.
विचार-प्रक्षोभक व विकार-प्रक्षोभक साहित्य : भा. वि. वरेरकर.
वृत्तपत्र व साहित्य-संघटना : द. वा. पोतदार, ना. सी. फडके, भा. वि. वरेरकर.
विद्यापीठें व मराठी : ग. ज. आगाशे, न. र. फाटक, शं. द. जावडेकर, कृ. पां. कुलकर्णी. द. वा. पोतदार.
विज्ञान व जीवननिष्ठा : शं. द. जावडेकर.
विदर्भांतील प्रज्ञा व प्रतिभा : शं. दा. पेंडसे.
विनोदाची कैफियत : प्र. के. अत्रे.
शब्दब्रह्म, नादब्रह्म, वाग्ब्रह्म : ह. ना. आपटे.
समकालीन व प्राचीन वाङमयाचें समालोचन नि गुणदोषविवेचन :— ह. ना. आपटे, न. चिं. केळकर, मा. श्री. अणे, शि. म. परांजपे, वा. म. जोशी, ना. गो. चापेकर, द. वा. पोतदार, वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, श्री. म. माटे, भा. वि. वरेरकर, न. र. फाटक, आचार्य जावडेकर, यशवंत, अ. का. प्रियोळकर, कृ. पां. कुलकर्णी, वि. द. घाटे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शं. दा. पेंडसे, आ. रा. देशपांडे व श्री. के. क्षीरसागर.
सत्याग्रह व जीवननिष्ठा : शं. द. जावडेकर.

संयुक्त महाराष्ट्र : ग. त्र्यं. माडखोलकर व १९४६ नंतरच्या प्रत्येक अध्यक्षीय भाषणांत ह्या विषयाचा पुरस्कार आलेला आहे.
सरकार व संमेलन : द. वा. पोतदार
संस्कृताची थोरवी : द. वा. पोतदार
संतसाहित्याचा स्थायीभाव : शं. दा. पेंडसे.
सयमक नियमकप्रवाद : ग. ज. आगाशे, श्रीमंत गंगाधरराव पटवर्धन, मा. श्री. अणे, माधवराव किबे, श्री. कृ. कोल्हटकर.
सविकल्प समाधि : न. चिं. केळकर, वा. म. जोशी.
सत्य शिव सौंदर्य : वा. म. जोशी.
हिंदी व प्रादेशिक भाषा : श्री. के. क्षीरसागर, वि. द. घाटे, वि. दा. सावरकर, लक्ष्मणशास्त्री जोशी.
साहित्य आणि संस्कृति यांच्या परस्पर संबंधाची चर्चा:—
न. र. फाटक, शं. द. जावडेकर, कृ. पां. कुलकर्णी, लक्ष्मणशास्त्री जोशी, शं. दा. पेंडसे.
साहित्य व प्रचार : भा. वि. वरेरकर, वि. स. खांडेकर.
साहित्य व उपजीविका : भा. वि. वरेरकर, प्र. के. अत्रे.
साहित्य व राजकारण : भा. वि. वरेरकर, आ. रा. देशपांडे.
साहित्य संमेलनाचें कार्य व पूर्वपीठिका : न. र. फाटक, शि. म. परांजपे.
साहित्याभ्यास व इतिहासाभ्यास : न. फाटक.
साहित्य-संशोधनाचें स्वरूप : अ. का. प्रियाळकर.
साहित्य-समीक्षा व सौंदर्यशास्त्र : आ. रा. देशपांडे.
सौन्दर्यभावना व नीति : श्री. के. क्षीरसागर.
साहित्य व समकालीन जीवन : भा. वि. वरेरकर.
सामुदायिक अभ्यासयोजना : श्री. म. माटे.
स्वकीयांकडे मोहरा वळणें इष्ट : श्री. म. माटे, श्री. के. क्षीरसागर.
सामाजिक जबाबदारीची जाणीव : श्री. म. माटे, वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	हवें	ऐवजीं
७६	खालून ६ वी	परामर्श	परमार्ष
७८	वरून ५ वी	दशकांत	दतकांत
११४	वरून ८ वी	वे. कृष्णशास्त्री राजवाडे	वे. कृष्णशास्त्री रानडे
१५	वरून १ ली	गांव	नांव
१६	खालून ३ री	तिसावें	तिसरें

मराठी साहित्यदर्शन माला

* प्रा. ना. सी. फडके
* श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
* श्री. गो. नी. दांडेकर
* आचार्य प्र. के. अत्रे
* श्री. व्यंकटेश माडगूळकर
* डॉ. अ. वा. वर्टी
* प्रा. अनंत काणेकर
* श्री. ग. दि. माडगूळकर

विद्वान सर्वत्र पूज्यते

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणें.

किमत साडे तीन रुपये